**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११५५/०२**

**श्री. माधव गजानन देशपांडे,** **------ अपीलकर्ता**
**७, कौस्तुभधाम को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**फ्लॉट नं.२३, संघानी इस्टेट, गावदेवी रोड,**
**घाटकोपर (प.), मुंबई- ४०० ०८६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**संचालक (इ.एस.ॲन्ड पी.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सी.एस.टी.समोर, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सी.एस.टी.समोर, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. माधव गजानन देशपांडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.२.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, मुंबई यांच्याकडे दि.१५.१.२००८ रोजी अर्ज करुन, श्री. गिरीधारीलाल मथुरालाल अगरवाल. सहाय्यक अभियंता यांच्या पदोन्नतीशी संबंधित एकूण ०९ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.३१.१.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास मुद्दा क्र.१ ते ४, ६, ८ प्रमाणे मागितलेली माहिती माहितीच्या अधिकारात येत नाही. मुद्दा क्र.५ मुख्य अभियंता (सिव्हरेज ऑपरेशन) यांचेशी संबंधित असल्याने अर्जाची प्रत त्याच्याकडे पाठविली. डी.एल. ते एम.एस.ची मंजूर प्रत महापालिका आयुक्त यांचेकडे कॅश काऊंटरवर रु.१२/- इतकी रक्कम भरुन प्राप्त करुन घेता येईल, सी.एच.शीटस् गोपनीय असल्यामुळे त्या उपलब्ध करुन देता येणार नाही अशी अपिलकारास मुद्देनिहाय माहिती कळविली.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक,(ई.एस.ॲन्ड पी.),बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याकडे दि.८.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत.

माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, मुंबई यांच्याकडे दि.१५.१.२००८ रोजी अर्ज करुन, श्री. गिरीधारीलाल मथुरालाल अगरवाल. सहाय्यक अभियंता यांच्या पदोन्नतीसंबंधी एकूण ०९ मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. मुद्दा क्र.१ ते ४, ६ व ८ हे प्रश्नार्थक स्वरुपाचे असल्याने उक्त अधिनियमातील कलम-२ मधील उपकलम (च) मध्ये दिलेल्या माहितीच्या व्याख्येनुसार नसल्याने माहिती दिली नाही. अर्जातील मुद्दा क्र.५ हा मुख्य अभियंता (मलनिःस्सारण प्रचालने) या विभागाशी संबंधित असल्याने अर्जदाराच्या अर्जाची प्रत त्या विभागाकडे पाठवून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविण्यांत आले. मुद्दा क्र.७ मधील माहिती योग्य ती फी भरल्यानंतर देण्यांत येईल असे अपिलकारास कळविले. श्री.जी.म.अगरवाल,कार्यकारी अभियंता यांचे अपिलकाराने पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची मागणी केली होती. सदर अहवाल गोपनीय स्वरुपाचे असल्यामुळे माहिती नाकारण्यात आली. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक व नियमानुसार कार्यवाही केली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०३ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११४४/०२**

**श्री. प्रकाश श्रीचंद खटवानी,** **------ अपीलकर्ता**
**निवासस्थान क्र.टाईप IV/ नं.०७,**
**राज्य कामगार विमा योजना रुग्णालय,**
**मरोळ बस डेपोजवळ,**
**अंधेरी (पूर्व.), मुंबई- ४०० ०९३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**राज्य कामगार विमा योजना रुग्णालय,**
**अंधेरी (पूर्व.), मुंबई- ४०० ०९३.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक,**
**राज्य कामगार विमा योजना रुग्णालय,**
**अंधेरी (पूर्व.), मुंबई- ४०० ०९३.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रकाश श्रीचंद खटवानी,, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, मुंबई यांच्याकडे दि. २०.११.२००७ रोजी अर्ज करुन, त्यांचे दि.१.१०.२००७ ते ३१.१०.२००७ पर्यंतची अर्जित रजा मंजूर करण्यात आली असतानासुध्दा त्या तारखांचे वेतन काढण्यात आले नसल्याबाबत एकूण ०९ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१९.१२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास ०९ मुद्दयाबाबत माहिती प्राप्त करुन दिली. योग्य ती माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.१७.१.२००८ रोजी प्रथम अपील दाख्ल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपिलात उपस्थित केलेल्या मुद्याबाबत मुद्देनिहाय माहिती दि.१५.४.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास उपलब्ध करुन दिली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत आदेश पारित केले नाहीत, माहिती दिली नाही या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२०.११.२००७ रोजी अर्ज करुन, त्यांचे दि.१.१०.२००७ ते ३१.१०.२००७ पर्यंतची अर्जित रजा मंजूर करण्यात आली असतानासुध्दा त्या तारखांचे वेतन काढण्यात आले नसल्याबाबत एकूण ०९ मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी योग्य माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले होते. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१५.४.२००८ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती अपिलकारास उपलब्ध करुन दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते. अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-०३ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७०८/०२**

**दि. नायगांव को.ऑप.हौ.सोसायटी लि.** **------ अपीलकर्ता**
**द्वारा-डॉ.जी.एस.आंबेडकर, फ्लॉट नं.६९-बी,**
**पहिला मजला, केळकर बिल्डिंग,**
**एस.एम.जाधव मार्ग,दादर (पूर्व), मुंबई- ४०० ०१४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सह महापालिका आयुक्त, (इम्प्रुव्हमेंट),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**३ रा मजला, रुम नं.३००, महापालिका मार्ग,**
**सी.एस.टी. मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**३ रा मजला, महापालिका मार्ग,**
**सी.एस.टी. मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

नायगांव को.ऑप.हौ.सोसा.लि. यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा, सहाय्यक आयुक्त (मालमत्ता), बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, सी.एस.टी. मुंबई यांच्याकडे दि.५.१.२००६ रोजी अर्ज करुन, मुंबई शहर- दादर नायगांव विभागातील भूकर क्रमांक ४३/६२ व इतर इम्प्रोव्हमेन्ट यो.क्र.६० या योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या जागेबाबतची एकूण पाच मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुद्दा क्र. १, ४ व ५ बाबत विधी विभागाचे अभिप्राय मागविले असल्याचे कळवून, विधी विभागाकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर अपिलकारास माहिती देण्यात येईल, अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, माता रमाबाई आंबेडकर मार्ग, मुंबई यांचेशी संबंधित असल्याचे तसेच मुद्दा क्र.२ बाबत कार्यकारी अभियंता (इ.व का.) ई विभाग यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेशी संपर्क साधण्याबाबत अपिलकारास दि.१०.२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १९.३.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करुन खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

" जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास योजनेतील ६० कागदपत्रांची तपासणी करण्यास अपिलकारास परवानगी द्यावी. त्यानंतर अपिलकाराच्या मागणीप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांच्या फोटोप्रती १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात, असे दि. ७.५.२००७ रोजी आदेश पारित केले. "

जन माहिती अधिका-यांनी योजनेतील ६० कागदपत्रांची तपासणी करण्यास परवानगी दिली नाही. तपासणीकरिता किती शुल्क भरावे लागेल याची माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (मालमत्ता), बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, सी.एस.टी. मुंबई यांच्याकडे दि.५.१.२००६ रोजी अर्ज करुन, मुंबई शहर- दादर नायगांव विभागातील भूकर क्रमांक ४३/६२ व इतर इम्प्रोव्हमेन्ट यो.क्र.६० या योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या जागेबाबतची एकूण पाच मुद्दयांवर माहिती मागितली होती. योजनेतील ६० कागदपत्रांची प्रथम अपिलकारास तपासणी करण्यास परवानगी द्यावी. त्यांनंतर अपिलकाराच्या मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या फोटोप्रती अपिलकारास उपलब्ध करुन द्याव्यात असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिका-यांनी पालन केल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास योजनेतील ६० कागदपत्रांची तपासणी करण्यास परवानगी द्यावी. त्यानंतर अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-०६ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९९७/०२**

**श्री. लेस्ली अल्मेडा,** **------ अपीलकर्ता**
**कासा अल्मेडा, फ्लॅट नं.१०३,**
**१, सेंट जोसेफ रोड, सेंट पॉल रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहमुंबई महाागरपालिका, एच/डब्लू वॉर्ड,**
**सेंट मार्टीस रोड, वांद्रे (प.) मुंबई - ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (Water Works)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/डब्लू वॉर्ड,**
**सेंट मार्टीन्स रोड, वांद्रे (प.) मुंबई - ४०० ०५०.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च ा -**

श्री. लेस्ली अल्मेडा, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनायम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि. १७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जा माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर व्हते.

अपिलकार राहात असलेल्या इमारतीमधील श्री.सेल्वीन अल्मेडा यांचेकडून त्यांच्या डेंटल क्लिनिकसाठी पाण्याचा मोंठया प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे इमारतीमधील इतर रहिवाश्यांना अतिरिक्त पाणी बिलाचा भरणा करावा लागतो. यासंदर्भात अपिलकाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महापालिकेने केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केले होते. जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराच्या अर्जाच्या अनुषंगाने वेळोवेळी माहिती दिली आहे. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१६.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांच्या आदेशानुसार, श्री.सेल्विन अल्मेडा हे त्यांच्या डेंटीस्ट क्लिनिकसाठी पाण्याचा मोठया प्रमाणावर वापर करीत असल्यामुळे इतर रहिवाशांना अतिरिक्त पाणी बिलाचा भरणा करावा लागतो. हा अपिलकाराचा माहितीचा व अपिलाचा मुख्य मुद्दा आहे. यासंदर्भात श्री.सेल्विन अल्मेडा यांना पाण्यासाठी स्वतंत्र कनेक्शन घेण्यास लावावे असा पर्याय अपिलकाराला सुचविण्यात आला. तथापि या बाबी

तांत्रिक स्वरुपाच्या आहेत व त्या Water Dept. शी संबंधित आहेत व जन माहिती अधिका-यांनी याबाबत Dy. Hydraulic Engineer (W.S.) यांचे मत घ्यावे असे नमूद करुन अपील निकाली काढले.

वरील बाबी पहाता माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलकाराला जन माहिती अधिका-यांनी वेळोवेळी माहिती दिली आहे. तक्रारीच्या अनुषंगाने अपिलकारांना असलेल्या पाणी बिलाच्या समस्येबाबत संबंधित विभागाकडे त्यांनी पाठपुरावा करणे आवश्यक आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडू अपेक्षित कार्यवाही पूर्ण झाली असल्यामुळे मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-०३ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९७२/०२**

**श्री. नंदलाल लखुमल रघुवंशी, ------ अपीलकर्ता**
**वाळकेश्वर मंगलकुंज को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**३०१, मंगलकुंज ए, २, भाऊसाहेब हिरे मार्ग,**
**मलबार हिल, मुंबई- ४०० ००६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**इमारत प्रस्ताव (शहर),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई- ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**इमारत प्रस्ताव (शहर),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई- ४०० ००८. ------- उत्तरवादी**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. नंदलाल लखुमल रघुवंशी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१ मे,२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका ई वॉर्ड, भायखळा, मुंबई यांच्याकडे दि.१२.२.२००७ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.३२१,भाऊसाहेब हिरे मार्ग, मलबार हिल, मुंबई येथील वाळकेश्वर मंगलकुंज सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधीची नस्ती क्र.ईबी/६०६१, दि.५.९.७१ व क्र.ईबी/ ५९२१/ दि. ३.१.७३ चा जाणिवपूर्वक शोध घेतला असता नस्ती सापडत नसल्याने माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.३.२००७ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता यांचेकडे दि.४.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची कागदपत्र २० वर्षापूर्वीची जुनी कागदपत्र आहेत. जन माहिती अधिकारी तसेच त्यांच्या कर्मचा-यांनी जाणिवपूर्वक शोध घेऊनही संबंधित नस्ती सापडली नाही. संबंधित नस्तीचा शोध घेण्याकरिता वरळी येथील गोडाऊनमध्ये संबंधित नस्तीचा जन माहिती

अधिका-यांनी संबंधित जबाबदार अधिका-यांच्या मदतीने शोध घ्यावा अशा प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या. त्याप्रमाणे प्रथम अपिलावर दि.११.५.२००७ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकाली काढले.

माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका ई वॉर्ड, भायखळा, मुंबई यांच्याकडे दि.१२.२.२००७ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.३२१,भाऊसाहेब हिरे मार्ग, मलबार हिल, मुंबई येथील वाळकेश्वर मंगलकुंज सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधीची नस्ती २० वर्षापेक्षा अधिक कालावधीची जुनी असल्याने जाणिवपूर्वक शोध घेऊनही सापडत नसल्याचे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. सदर बाब लक्षात घेता मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०३ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११४५/०२**

**श्री. आत्माराम भिकोबा कामथे, ------ अपीलकर्ता**
**सचिव, एकता असो. गौतम को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**फ्लॅट नं.५६, आर.टी.ओ. शेजारी,**
**चार बंगला, अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अप्पर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन),**
**मुंबई उपनगर जिल्हा, पश्चिम उपनगरे,**
**प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन) व**
**सक्षम प्राधिकारी, अंधेरी,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. ------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. आत्माराम भिकोबा कामथे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडे दि.१६.११.२००७ रोजी अर्ज करुन, फेडरेशन ऑफ को.ऑप.हौसिंग सोसायटी, एकता असोसिएशच्या दि.१२.५.२००७ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.६.१२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती अपूर्ण असून, विहित कालावधीत उपलब्ध करुन दिली नाही या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.३.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

अपिलकारास बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली नाही तरी अपिलकाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल करावे असे प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई यांनी दि.२४.१.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-याकडून मागितलेली माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नाही.

दिलेली माहिती अपूर्ण आहे. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिशाभूल करणारे उत्तर दिले. गांभिर्य लक्षात घेतले नाही. या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३१.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१६.११.२००७ रोजी अर्ज करुन, फेडरेशन ऑफ को.ऑप.हौसिंग सोसायटी, एकता असोसिएशच्या दि.१२.५.२००७ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. सर्वे क्र.१११-ड, आंबिवली, अंधेरी येथील भूखंड क्र.४७ ते ५१ या भिंतीस लागू असलेली व कमलादेवी जैन हायस्कूल समोरील मैदानातील लक्ष्मी बिझनेस व झेरॉक्स सेंटर, निसर्ग कॅंटीनला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ३० x ३० एवढया जागेचे अधिकृत वाटप करण्यात आले असेल तर त्या जागा वाटपाच्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत अपिलकाराची मागणी आहे. याबाबत जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलकारा माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०३ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४८३/०२**

**डॉ. गुल कामा,** **------ अपीलकर्ता**
**७/५, रुस्तम बाग, मुंबई- ४०० ०२७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**एमसीजीएम ई वार्ड इमारत, संकली स्ट्रीट,**
**पहिला मजला, भायखळा,**
**१० शेख हफीजउद्दीन मार्ग, मुंबई- ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**एमसीजीएम ई वार्ड इमारत, संकली स्ट्रीट,**
**पहिला मजला, भायखळा,**
**१० शेख हफीजउद्दीन मार्ग, मुंबई- ४०० ००८.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार डॉ. गुल कामा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, भायखळा, मुंबई यांच्याकडे दि.१२.९.२००६ रोजी अर्ज करुन, भायखळा (पूर्व) ७/७, रुस्तम बाग येथे श्री. बेहराम घडीयाली हे विनापरवाना खाद्यपेय व्यवसाय करतात. याबाबत अपिलकाराने दि.१२.९.२००६ च्या पत्रान्वये केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.६.१०.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती अपूर्ण, असंबंध, अनावश्यक असल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.८.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२९.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१६.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१२.९.२००६ रोजी अर्ज करुन, भायखळा (पूर्व) ७/७, रुस्तम बाग येथे श्री. बेहराम घडीयाली हे विनापरवाना खाद्यपेय व्यवसाय करतात. याबाबत अपिलकाराने दि.१२.९.२००६ च्या पत्रान्वये केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी संबंधित जागेची पहाणी करुन मुंबई महापालिका अधिनियमातील कलम ३९४ अंतर्गत कायदेशीर कारवाई केल्याचे कळवून इतर मुद्दयाबाबत " होय / नाही " अशी माहिती दिली. अपिलकाराचा मुख्य मुद्दा विनापरवाना खाद्यपेय व्यवसाय करणा-याविरुध्द कारवाई करण्यासंबंधीचा आहे. जन माहिती अधिका-यांनी कलम ३९४ अंतर्गत कारवाई केली असल्याचे अपिलकारास कळविले असल्याचे सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. यावरुन अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०६ /११/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९९९/०२**

**श्री. पंकज मेहता,** **------ अपीलकर्ता**
**१९४, जवाहर नगर, रोड नं.३,**
**९, शांतीनिकेतन, २ रा मजला,**
**गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग,**
**मिठानगर, म्युनिसिपल स्कूल इमारत,**
**एम.जी.रोड, गोरेगांव (प.) मुंबई- ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (जल कामे),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग,**
**मिठानगर, म्युनिसिपल स्कूल इमारत,**
**एम.जी.रोड, गोरेगांव (प.) मुंबई- ४०० ०६२.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. पंकज मेहता, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जल कामे), बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग, मिठानगर, गोरेगांव, मुंबई यांच्याकडे दि. ३.८.२००७ रोजी अर्ज करुन, गोरेगांव (प.) येथील प्लॉट क्र.१९४, जवाहर नगर, रोड क्र.३, शांतीनिकेतन इमारतीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२४.८.२००७ व २९.८.२००७ च्या पत्रांन्वये माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.१२.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही.यामुळे व्यथित होऊा अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३.८.२००७ रोजी अर्ज करुन, गोरेगांव (प.) येथील प्लॉट क्र.१९४, जवाहर नगर, रोड क्र.३, शांतीनिकेतन इमारतीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. शांतीनिकेतन इमारतीमधील पाण्याच्या बिलाचा भरणा केला नसल्यामुळे पाणी पुरवठा खंडीत केला, अर्जातील (ब) बाबत माहिती दिली. अर्जातील (अ) व (क) बाबत अपिलकारास विशेष अशी कोणती माहिती हवी आहे याबाबत अपिलकाराने स्पष्ट करावे. अर्जातील (ड) बाबत कार्यालयीन कागदपत्रावर नोंद नाही. अर्जातील (इ) (फ) आणि (जी) बाबत जन माहिती अधिका-यांनी दि.२४.८.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. सदर परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०६ /११/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०९१/०२**

**श्री. अविनाश बावकर व श्री.उदय प्रभू, ------ अपीलकर्ता**
**ए/१६, रायगड निकेतन,**
**चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९. ------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. अविनाश बावकर व श्री.उदय प्रभू, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि. ५.१०.२००७ रोजी अर्ज करुन, रायगड निकेतन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या आवारात अनधिकृतरित्या वृक्षतोड झाल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी संस्थेस अनधिकृतरित्या गुलमोहोर झाडाच्या तोडीबाबत अपिलकारास पत्र पाठवून कार्यालयात उपस्थित राहून खुलासा करण्याबाबत कळविले होते. दरम्यान अपिलकाराने पोलिसात तक्रार नोंद केली. पोलिसांनी पंचनामा करुन आवश्यक वैधानिक कारवाई सुरु केली. या प्रकरणी पोलीस ठाण्या कडून करण्यात आलेल्या कारवाईची माहिती जन माहिती अधिका-यांनी ठाणे अंमलदाराकडून मागितली. पोलीस ठाण्याकडून मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी अपिलकारास माहिती देऊ शकले नाहीत. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, अंधेरी, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी, मुंबई यांच्याकडे रायगड निकेतन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या आवारात अनधिकृतरित्या वृक्षतोड झाल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. तत्कालिन उद्यान विद्या सहाय्यक यांनी सदर प्रकरणी केलेल्या पत्रव्यवहाराचा आणि त्यासंदर्भातील कागदपत्राचा शोध घेतला. उपलब्ध कागदपत्रानुसार अपिलकारास दि.१५.१.२००८ रोजी टपालाने माहिती पाठविली असल्याचे उद्यान सहाय्यक, के/पश्चिम विभाग यांनी सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. सदर प्रकरणी अपिलकार यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०७/११/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०९२/०२**

**श्री. अविनाश बावकर व श्री.उदय प्रभू, ------ अपीलकर्ता**
**ए/१६, रायगड निकेतन,**
**चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. अविनाश बावकर व श्री.उदय प्रभू, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि.४.१०.२००७ रोजी अर्ज करुन, मनपा अधिनियमातील कलम ४८९ प्रमाणे रायगड निकेतन गृहनिमर्माण संस्थेची पहाणी करुन इमारतीच्या बळकटीकरणाबाबत केलेल्या कारवाई संबंधीची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी संस्थेची पहाणी करुन, मनपा अधिनियमातील कलम ३५४ प्रमाणे संस्थेस नोटीस देऊन आवश्यक ती इमारत दुरुस्तीची कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या. संस्थेच्या सचिव/ अध्यक्षांनी इमारत दुरुस्ती/ बळकटीकरणाकरिता स्ट्रक्चरल इंजिनियरची नेमणूक करुन इमारतीची संरचना करुन घेणे आवश्यक असल्याची बाब जन माहिती अधिका-यांनी दि.३.९.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. तसेच, जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या नोटीसीप्रमाणे संस्थेच्या सचिव/ अध्यक्षांनी इमारत दुरुस्तीच्या कामास विहित कालावधीत सुरुवात केली नाही तर संस्थेच्या विरोधात मनपा अधिनियमातील कलम ४७५ (अे) प्रमाणे खटला दाखल करण्यात येईल असेही कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांचेकडे दि.१७.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केलीनाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊा अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते..

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी, मुंबई यांच्याकडे मनपा अधिनियमातील कलम ४८९ प्रमाणे रायगड निकेतन गृहनिमर्माण संस्थेची पहाणी करुन इमारतीच्या बळकटीकरणाबाबत केलेल्या कारवाई संबंधीची माहिती मागितली होती. इमारत दुरुस्तीबाबत संस्थेच्या सचिव/ अध्यक्षांनी कारवाई करणे आवश्यक असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३.९.२००७ च्या पत्रान्वये दिलेले उत्तर समर्पक असून, त्यामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०७ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०९३/०२**

**श्रीमती अश्विनी बावकर व श्री.उदय प्रभू, ------ अपीलकर्ता**
**ए/१६, रायगड निकेतन,**
**चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती अश्विनी बावकर व श्री.उदय प्रभू, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि.१७.११.२००७ रोजी अर्ज करुन, रायगड निकेतन सहकारी गृहनिर्माण संस्था सर्वे क्र.२२ (सी), हिस्सा नं.१,२ आणि ४ बाबत अनुषंगिक एकूण ११ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, यांच्याकडे दि.२०.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही यामुळे व्यथित होऊा अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि.१७.११.२००७ रोजी अर्ज करुन, रायगड निकेतन सहकारी गृहनिर्माण संस्था सर्वे क्र.२२ (सी), हिस्सा नं.१,२ आणि ४ बाबत अनुषंगिक एकूण ११ मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-यांविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०७ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०००/०२**

**श्री. पंकज मेहता,** **------ अपीलकर्ता**
**१९४, जवाहर नगर, रोड नं.३,**
**९, शांतीनिकेतन, २ रा मजला,**
**गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**संचालक, (अभि. सेवा आणि प्रकल्प),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**३ रा मजला, विस्तार इमारत,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता (रस्ते आणि पूल),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**पालिराम पथ, अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. पंकज मेहता, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि.२९.५.२००७ रोजी अर्ज करुन, गोरेगांव जवाहर नगर फाटक (जवाहर नगर रोड-२, रेल्वे लेव्हल क्रॉसिंग) वाहतुकीसाठी बंद असल्याने चालू करण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. १३.७.२००७ च्या पत्राने माहिती दिली. जवाहर नगर फाटक रेल्वे लेव्हल क्रॉसिंग पश्चिम रेल्वेच्या प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस सूचना न देता बंद केले आहे. पश्चिम रेल्वेने सबवेचे बांधकाम जवाहर नगर रेल्वे क्रॉसिंगजवळ करावे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने पश्चिम रेल्वेच्या प्राधिकरणाकडे रु.३,२०,०००/-इतकी रक्कम भरणा करुन विनंती केली आहे. पश्चिम रेल्वेकडूनही पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.२३.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि.२९.५.२००७ रोजी अर्ज करुन, गोरेगांव जवाहर नगर फाटक (जवाहर नगर रोड-२, रेल्वे लेव्हल क्रॉसिंग) वाहतुकीसाठी बंद असल्याने चालू करण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत माहिती देण्याची दक्षात घेण्यात यावी अशी जन माहिती अधिका-यांना समज देण्यांत येत आहे. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१० /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८१३/०२**

**श्री. सुनिल रमणलाल व्होरा,** **------ अपीलकर्ता**
**मॉडर्न प्रॉडक्टस्, केसाकाका कंपाऊंड,**
**आय.बी.पटेल रोड, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/साऊथ वॉर्ड,**
**मिठानगर, गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता, (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/साऊथ वॉर्ड,**
**मिठानगर, गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सुनिल रमणलाल व्होरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/दक्षिण विभाग, गोरेंगाव, मुंबई यांच्याकडे दि.३.५.२००७ रोजी अर्ज करुन, गोरेगांव (पूर्व), केसाकाका कंपाऊंड, आ.बी. पटेल रोड, मुंबई येथील जमीन मालक अपिलकार श्री.सुनिल व्होरा यांच्या जागेत त्यांच्या दोन भाडेकरुंनी गाळा क्र.५१ आणि ५२, गाळा क्र.२४ येथे त्यांच्या भाडेकरुकडून अवैधरित्या करण्यांत येत असलेल्या बांधकामाबाबत दि.२.५.२००७ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांचेकडे दि.१०.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३.८.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही.यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.११.२००८ रोजी सेनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचेम्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,बृहन्मुंबई महानगरपालिका, पी /दक्षिण विभाग, गोरेंगाव, मुंबई यांच्याकडे दि.३.५.२००७ रोजी अर्ज करुन, गोरेगांव (पूर्व), केसाकाका कंपाऊंड, आ.बी. पटेल रोड, मुंबई येथील जमीन मालक अपिलकार श्री.सुनिल व्होरा यांच्या जागेत गाळा क्र.५१ आणि ५२, गाळा क्र.२४ येथे त्यांच्या भाडेकरुकडून अवैधरित्या बांधकाम करण्यांत येत असलेल्या बांधकामाबाबत दि.२.५.२००७ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराच्या तक्रारीस अनुसरुन जागेची पहाणी करावी. आवश्यकतेप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमांतर्गत अवैध बांधकामास नोटीस देऊन आवश्यक ती कारवाई करावी. या प्रकरणी करण्यात येत असलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१० /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८६१/०२**

**श्री. व्यंकट गेणू कांबळे,** **------ अपीलकर्ता**
**प्रतिक, अे/८, तांबेनगर,**
**एस.एन.रोड, मुलूंड (प.),मुंबई- ४०० ०८०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (२),**
**कोकण भवन, २ रा मजला, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक सहकारी संस्था टी- विभाग,**
**ए.सी.सी.कंपाऊंड, एस.जी.मार्ग,**
**मुलूंड (प.),मुंबई- ४०० ०८०.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. व्यंकट गेणू कांबळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुलूंड, मुंबई यांच्याकडे दि.६.७.२००७रोजी अर्ज करुन, प्रतिक फ्लॅट क्र.अे-८ च्या हस्तांतरणाबाबत विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी दि.१६.१०.१९९९ च्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत दि.५.२.२००५ च्या पत्रान्वये सूचना दिल्या होत्या. संस्थेच्या दत्परात सभासदाची नोंद प्राधिकृत अधिका-यामार्फत करण्याची विनंती केली होती. अपिलकाराने केलेल्या अर्जावर कार्यवाही करण्यास दप्तर दिरंगाईनुसार किती कालावधी लागेल. दिरंगाईसाठी जबाबदार कर्मचा-याला दोषी धरण्यात यावे का, आणि त्यांना कोणती शिक्षा दिली इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.७.६.२००७ व १४.६.२००७ रोजी सुनावणी घेण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिलेली आहे. परंतु त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती दिलेल्या नाहीत. त्यामुळे अपिलकाराने मागणी केलेल्या उपलब्ध कागदपत्राच्या प्रती सात दिवसात देण्यात याव्यात असे दि.२६.६.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी दि.१.७.२००७ च्या पत्रान्वये असे कळविले की, मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील असल्याने सदर माहिती देण्याबाबत संस्थेला सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुलूंड, मुंबई यांच्याकडे दि.६.७.२००७रोजी अर्ज करुन, प्रतिक फ्लॅट क्र.अे-८ च्या हस्तांतरणाबाबत विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी दि.१६.१०.१९९९ च्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत दि.५.२.२००५ च्या पत्रान्वये सूचना दिल्या होत्या. संस्थेच्या दत्परात सभासदाची नोंद प्राधिकृत अधिका-यामार्फत करण्याची विनंती केली होती. अपिलकाराने केलेल्या अर्जावर कार्यवाही करण्यास दप्तर दिरंगाईनुसार किती कालावधी लागेल. दिरंगाईसाठी जबाबदार कर्मचा-याला दोषी धरण्यात यावे का, आणि त्यांना कोणती शिक्षा दिली इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. सहकारी न्यायालयाचे अंतरिम आदेशात श्री.कांबळे यांना संस्थेचे सभासदत्व देऊ नये असा कोठेही उल्लेख नाही. श्री.कांबळे यांनी दि.१४.६.२००७ च्या पत्रात विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांचेकडील दि.१५.१०.१९९९ च्या आदेशाचे पालन करीत नसल्याचे नमूद केले. सह निबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग यांचे आदेशाचे सत्वर पालन करण्याची कारवाई करावी. तसेच कलम ८० अन्वये योग्य अर्ज सत्वर तहसिलदारांना पाठवावा. संस्था रक्कम स्विकारीत नसेल तर ती बँकेत भरण्याबाबत त्यांना सूचना द्याव्यात. संस्थेवर कलम ७८/१४६ प्रमाणे योग्य कारवाई करावी असे जिल्हा उपनिबंधकांनी दि.१४.६.२००७ च्या पत्रान्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, टी/विभाग, मुंबई यांना कळविले आहे. यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई ,**
**दिनांक :-१० /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९३१/०२**

**श्री. श्रीराम द. देशपांडे,** **------ अपीलकर्ता**
**८, भास्कर अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**पायलीपाडा, मानखुर्द (पूर्व),सायन,**
**ट्रॉम्बे रोड,मुंबई- ४०० ०८८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन),**
**बृहन्मुंबई दुग्ध योजना, दुग्ध व्यवसाय विभाग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक,**
**बृहन्मुंबई दुग्ध योजना, दुग्ध व्यवसाय विभाग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. श्रीराम द. देशपांडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, बृहन्मुंबई दुग्ध योजना, वरळी, मुंबई यांच्याकडे दि.१७.३.२००७ रोजी अर्ज करुन, रोखपाल व लेखापाल/ उपलेखापालास रोख रक्कम हाताळणी भत्ता अनुज्ञेय असून, अदा करण्यांत आलेला नाही. यासंदर्भात उपआयुक्त (प्रशासन),दुग्ध व्यवसाय विभाग यांचे दि.२४.१२.२००७च्या पत्रास पाठविलेल्या उत्तराच्या पत्राच्या प्रतीची तसेच अनुषंगिक माहितीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अंशतः व अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली असल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. २३.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२६.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. अपिलकाराने एकूण तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती. त्यापैकी अनु.क्र.२ ची पूर्तता झाली आहे असे अपिलकाराने मान्य केले. मुद्दा क्र.१ व ३ बाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी दि.१५.७.२००७ पर्यंत द्यावी असे दि.२.७.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, बृहन्मुंबई दुग्ध योजना, वरळी, मुंबई यांच्याकडे दि.१७.३.२००७ रोजी अर्ज करुन, रोखपाल व लेखापाल/ उपलेखापालास रोख रक्कम हाताळणी भत्ता अनुज्ञेय असून, अदा करण्यांत आलेला नाही. यासंदर्भात उपआयुक्त (प्रशासन), दुग्ध व्यवसाय विभाग यांचेकडे केलेल्या तक्रारीसंबंधी पाठविण्यात आलेल्या उत्तराच्या पत्राच्या प्रतीची मागणी केली होती. कामावर आधारित रोख रक्कम हाताळणी भत्ता दर वित्तीय वर्षास प्रशासनाच्या कार्यालयीन आदेशान्वये वैयक्तिक कर्मचा-यास विभाग प्रमुखामार्फत मंजूर करण्यात येत होता. दि.२०.१.२००१ च्या विभागाच्या पत्रान्वये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, ज्या प्रकरणी रोखपालाच्या पदावर थेट नियुक्ती पूर्वकल्पित आहे त्या प्रकरणी विशेष वेतन अनुज्ञेय असणार नाही. स्वतंत्र संवर्ग निर्माण होण्याजोगी विविध श्रेणी मध्ये पुरेशा संख्येत रोखपालांची पदे विभागात/कार्यालयात असतील तर रोखपाल पदास विशेष वेतन मिळणार नाही. सदर प्रकरणी मा.लोकायुक्तांकडे झालेल्या सुनावणीनुसार ज्या कर्मचा-यांना विशेष वेतन अनुज्ञ ोय नसताना ते देण्यात आले आहे अशांकडून अतिप्रदान झालेली रक्कम वसुलीबाबत कार्यवाही करण्यात आली. यासंबंधीची माहिती अपिलकारास देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१० /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११७६/०२**

**श्री. वाय. एस. देसाई,** **------ अपीलकर्ता**
**छत्रपती शाहू सदन, रुम नं.४१,**
**करी रोड, मुंबई- ४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी महाराज इमारत,**
**फलटण रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी महाराज इमारत,**
**फलटण रोड, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. वाय.एस.देसाई, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.४.२००८रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, छत्रपती शिवाजी महाराज इमारत, फलटण रोड, मुंबई यांच्याकडे दि.१२.१०.२००७ रोजी अर्ज करुन, लक्ष्मीदास डोसा कंपाऊंड, केशवराव कायंडे मार्ग, मुंबई येथील सिटी सर्वे क्र.२०१६, १/२०१६ आणि २०१७ भायखळा विभाग येथील मालमत्ता विकसित करण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.३.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊा अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, छत्रपती शिवाजी महाराज इमारत, फलटण रोड, मुंबई यांच्याकडे दि.१२.१०.२००७ रोजी अर्ज करुन, लक्ष्मीदास डोसा कंपाऊंड, केशवराव कायंडे मार्ग, मुंबई येथील सिटी सर्वे क्र.२०१६, १/२०१६ आणि २०१७ भायखळा विभाग येथील मालमत्ता विकसित करण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यां-कडे दि.३.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. सदर आदेशाने अपिलकाराचे समाधान झाले नाही तर द्वितीय अपील आयोगाकडे सादर करण्याचा त्यांचा हक्क अबाधित राहील.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१० /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११७९/०२**

**श्री. प्रमोद शंकर थळी,** **------ अपीलकर्ता**
**प्रमोदानंद प्रतिष्ठान, शापारिआ इमारत,**
**पहिला मजला, कामाबाग समोर,**
**७४, राजाराममोहन रॉय मार्ग,**
**चर्नीरोड (पूर्व), मुंबई- ४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग,**
**जोबानपुत्र कंपाऊंड, नाना चौक,मुंबई- ४०० ००७.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग,**
**जोबानपुत्र कंपाऊंड, नाना चौक,मुंबई- ४०० ००७.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. प्रमोद शंकर थळी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग, नानाचौक, मुंबई यांच्याकडे दि.५.१०.२००७ रोजी अर्ज करुन, हॉटेल कल्पनाने केलेले अनधिकृत बांधकाम तोडण्याबाबत केलेली कारवाई, नुतनीकरणासाठी दिलेली परवानगी पत्राची प्रत तसेच अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, मुंबई यांच्याकडे दि.१९.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

"अपिलकाराने अपिलातील उल्लेखिलेली कागदपत्रे, त्याच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन नियमानुसार शुल्क आकारुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती द्यावी असे आदेश पारित केले. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी परित केलेल्या आदेशानुसार विहित कालावधीत जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दि.१०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग, नानाचौक, मुंबई यांच्याकडे दि.५.१०.२००७ रोजी अर्ज करुन, हॉटेल कल्पनाने केलेले अनधिकृत बांधकाम तोडण्याबाबत केलेली कारवाई, नुतनीकरणासाठी दिलेली परवानगी पत्राची प्रत तसेच अनुषंगिक माहिती मागितली होती. कल्पना हॉटेलचे अनधिकृत, अवैध बांधकाम अपिलकाराच्या घरामध्ये येणारा ऊजेड, हवा अडविणारे आहे. सदर अनधिकृत बांधकाम तोडण्याबाबत मनपा अधिनियमातील कलम-४७५ प्रमाणे कारवाई करुन केलेल्या कारवाईची माहिती देण्याबाबत अपिलकाराची मागणी आहे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१० /११/२००८.**

**राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ ,मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र.२००८/अपील- ११४०/०२**

**श्री.उ.द. वाळूंज ,**
**अवर सचिव, वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२** **------- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव (का-१४),**
**सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (का-१४),**
**सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई -४०० ०३२** **-------- उत्तरवादी**

## - विवेचन-

श्री. उ.द.वाळूज, मुंबई यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १९ (३) अन्वये आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक १०/११/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व उत्तरवादी उपस्थित होते.

अपीलकाराने कक्ष अधिकारी या संवर्गाचा कोटा ब्रेक डाऊन झाल्याच्या संदर्भात शासानाने निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची प्रत, कक्ष अधिका-यांच्या दि.१३/३/२००० च्या ज्येष्ठता सूचीतील अनु.क्र. १ ते २५३ वरील अधिका-यांचा ज्या अंतिम ज्येष्ठता सूचीमध्ये केला त्याची प्रत, तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या काही - नस्तींच्या टिप्पणीच्या प्रती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिका-यांनी पूर्ण माहिती न पुरविल्यामुळे व दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलकारांनी प्रथम अपीलीय प्राधिका-यांकडे अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेतली व दि. १ फेब्रुवारी २००८ रोजी आदेश पारित केले. तथापि, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने समाधान न झाल्याने अपिलकारांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराचे व्दितीय अपीलामध्ये खालील मुख्य मुद्दे आहेत.

१. कक्ष अधिकारी संवर्गाचा कोटा ब्रेक डाऊन झाल्याच्या संदर्भात शासनाने निर्गमित केलेले प्रमाणपत्र मिळाले नाही.
२. कक्ष अधिका-यांच्या दि.१३.३.२००० च्या ज्येष्ठता सूचीतील अनुक्रमांक १ ते २५३ वरील अधिका-यांचा समावेश ज्या अंतिम ज्येष्ठता सूचीत करण्यात आला आहे त्याची प्रत उपलब्ध करून दिली नाही.

३. कक्ष अधिकारी या संवर्गाच्या दि. १२.११.९२ व ३१.१०.९४ च्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूची ज्या आदेशान्वये अंतिम केली आहे अशा आदेशाच्या प्रती मागितल्या होत्या. मात्र अशा अंतिम ज्येष्ठतासूच्या प्रसिद्ध करण्यात आल्या नाहीत, असे अपीलीय प्राधिका-यांनी सुनावणी दरम्यान तोंडी सांगितले. मात्र आदेशामध्ये अभिलेखात प्रत उपलब्ध नाही असे कळविले. याबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती कळवावी.

प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी खुलाशाचे अवलोकन केले असता तसेच सुनावणीदरम्यान उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट होतात.

अपीलकाराला मुद्दा क्रमांक १ येथे नमूद केलेले कोटा नियम ब्रेक डाऊन झाल्याच्या संदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची प्रत दिलेली नाही. कक्ष अधिका-यांच्या दि. १३.३.२००० च्या ज्येष्ठता सूचीतील अनुक्रमांक १ ते २५३ वरील अधिका-यांची नावे, दि. १३/३/२००८ नंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या कक्ष अधिका-यांच्या ज्येष्ठता सूचीमधून वगळण्यात आली आहेत. असे अपीलीय प्राधिका-यांनी आयोगाला दिलेल्या लेखी खुलाशामध्ये दिले आहे. मात्र आपल्या आदेशामध्ये मात्र अशी ज्येष्ठता सूची अपिलकाराला उपलब्ध करून दिली असल्याचे म्हटले आहे. अधिका-यांचा समावेश ज्या अंतिम ज्येष्ठता सूचीत करण्यात आला आहे त्याची प्रत उपलब्ध करून दिलेली नाही. या माहितीमध्ये विसंगती आहे. मुद्दा क्रमांक ३ बाबत प्रथम अपीलीय प्राधिका-यांच्या म्हणण्यानुसार या प्रती अभिलेखात उपलब्ध नाहीत.

वरील विवेचन लक्षात घेऊन मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

उपरोक्त मुद्दा क्रमांक १ वर नमूद प्रमाणपत्र जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराला विनाशुल्क उपलब्ध करून दयावे. मुद्दा क्रमांक २ बाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती लेखी स्वरूपात अपीलकाराला उपलब्ध करून दयावी. तसेच मुद्दा क्र.२ बाबतची वस्तुस्थिती व प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी अपीलकाराला प्रथम अपीलाच्या आदेशामध्ये कळविलेली संबंधित माहिती यामध्ये विसंगती असेल तर त्याबाबत लेखी खुलासा आयोगाला सादर करावा. मुद्दा क्रमांक ३ बाबतची वस्तुस्थिती लेखी स्वरूपात अपीलकर्त्याला जन माहिती अधिका-यांनी / अपीलीय प्राधिका-यांनी कळवावी.

ही सर्व कार्यवाही हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आंत जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिका-याांनी पूर्ण करावी. कालमर्यादेचे तंतोतंत पालन होईल याची जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी दक्षता घ्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांकः-१०/११/२००८**

E:\Matte\comisoner -Tiwari\NOVEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८३८/०२**

**श्री. मिल्टन गोन्साल्वीस,** **------ अपीलकर्ता**
**सेंट विसेंट डी पॉल,**
**२० वा रोड, खार (प.),मुंबई- ४०० ०५२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड**
**हिल रोड समोर, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड**
**हिल रोड समोर, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**कार्यकारी अभियंता (इमारती प्रस्ताव),**
**एच वेस्ट वॉर्ड, भाभा हॉस्पिटलजवळ,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

श्री. मिल्टन गोन्साल्वीस, मुंबई यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १९ (३) अन्वये आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक १०/११/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) (जन माहिती अधिकारी) उपस्थित होते.

अपिलकाराच्या माहिती अर्जातील बहुतांशी मुद्दयांना या कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नाही असे उत्तर जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराला कळविले आहे. या माहितीने समाधान न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराला योग्य उत्तर द्यावे असे आदेश दिले. परंतु त्यानंतरही माहिती वा उत्तर जन माहिती अधिका-यांकडून प्राप्त न झाल्याने अपिलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. या प्रकरणाशी कार्यकारी अभियंता (इमारती प्रस्ताव) संबंधित असल्याने त्यांना सुनावणीसाठी उपस्थित रहाण्याबाबत आयोगाने कळविले होते. तथापि, नोटीस देऊनदेखिल ते सुनावणीसाठी उपस्थित राहिले नाहीत. अपिलकाराला अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने खार (प.) मुंबई येथील चित्रकार धुरंधर मार्गावरील सेंट विन्सेंट डी पॉल को.ऑप. हौसिंग सोसायटीमधील गार्डन होम्स येथील क्र.१ व २ मधील बंगल्यामध्ये चालू असलेल्या बांधकामासंदर्भात काही मुद्दयांची माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती देण्याबाबत आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे जन माहिती अधिका-यांविरुध्द दंडात्मक कारवाई करावी असा अपिलकाराने सुनावणीच्यावेळी मुद्दा उपस्थित केला. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीपैकी बरीचशी माहिती जन माहिती अधिका-याकडे नव्हती. अशा परिस्थितीत जन माहिती अधिका-यास दंडित करण्याचा अपिलकाराचा मुद्दा मान्य करता येत नाही. सबब, कार्यकारी अभियंता (इमारती प्रस्ताव), एच/वेस्ट वॉर्ड, वांद्रे (प.) यांनी अपिलकाराच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांकः-१०/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२१४/०२**

**श्री. बाझ ई मोहम्मदी,** **------ अपीलकर्ता**
**जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग,**
**अंबर प्रसाद बिल्डिंगच्या समोर,**
**रेक्लमेशन, वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता, (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. बाझ ई मोहम्मदी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट विभाग, वांद्रे (प.), मुंबई यांच्याकडे दि.७.२.२००८ रोजी अर्ज करुन, अपिलकार यांनी दि.२०.१०.२००७ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अतिपलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१५.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट विभाग, वांद्रे (प.), मुंबई  यांच्याकडे दि.७.२.२००८ रोजी अर्ज करुन,  अपिलकार यांनी दि.२०.१०.२००७ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती मागितली होती.   अपिलकाराने अर्जात नमूद केलेली जमीन म्हाडाच्या अखत्यारितील असल्याने अपिलकाराचा अर्ज म्हाडाकडे पुढील आवश्यक कारवाईकरिता पाठविण्यांत आला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.२९.२.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली.  यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०६ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२१६/०२**

**श्री. जयेश शांताराम झगडे,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा- नामदेव रघुनाथ रहाटे,**
**२/६, दोशी इस्टेट, सुंदर बाग, इंदिरानगर,**
**कमानी, कुर्ला (प.) मुंबई- ४०० ०७०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माएण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**साल्पादेवी सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**सेंटर मेरी शाळेजवळ, पी.के.रोड,**
**मुलूंड (प.), मुंबई- ४०० ०८०.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. जयेश शांतराम झगडै, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा साल्पादेवी सहकारी गृहनिर्माण संस्था, मुलूंड (प.), मुंबई यांच्याकडे दि. १६.८.२००७ रोजी अर्ज करुन, साल्पादेवी को.ऑप.हौ.सोसायटी, मुलूंड (प.) या संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, यांच्याकडे दि.१.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी /जन माहिती अधिकारी हजर नव्हते. अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा साल्पादेवी सहकारी गृहनिर्माण संस्था, मुलूंड (प.), मुंबई यांच्याकडे दि. १६.८.२००७ रोजी अर्ज करुन, साल्पादेवी को.ऑप.हौ.सोसायटी, मुलूंड (प.) या संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. साल्पादेवी को.ऑप.हौसिंग सोसायटीत श्री.दत्तात्रय राघो झगडे यांच्या एकूण किती सदनिका आहेत याची सदनिका क्रमांकनिहाय माहिती, संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, श्री.दत्तात्रय झगडे यांनी किती सदनिका विकल्या, सदनिका विकत घेणा-यांची संपूर्ण नांवे, संस्थेशी झालेला सर्व कागदोपत्री व्यवहार इ. अनुषंगिक माहिती अपिलकाराने मागितली होती. सहाय्यक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे यांनी संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी व ती अपिलकार यांना हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१० /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११६४/०२**

**श्री. रमाकांत मनमोहन पावसकर,** **------ अपीलकर्ता**
**२/२५, अब्दुल रझाक बिल्डिंग,**
**जेरबाई वाडीया रोड, परेल, मुंबई- ४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विधी अधिकारी,**
**कायदा विभाग, एम.सी.जी.एम.**
**विस्तार इमारत, महापालिका मार्ग,मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप विधी अधिकारी,**
**कायदा विभाग, एम.सी.जी.एम.**
**विस्तार इमारत, महापालिका मार्ग,मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. रमाकांत मनमोहन पावसकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप विधी अधिकारी, कायदा विभाग, महापालिका मार्ग, मुंबई यांच्याकडे दि.१७.१.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.सी.एच.मोहोम्मद आणि श्री.ए.आर.पांडे, यांचा पत्ता व संपर्क क्रमांक इ.बाबत एकूण १४मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.५.२.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिशाभूल करणारी माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.२५.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२९.३.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी मांडण्यात आलेल्या मुद्दयाच्या विरुध्द आदेश पारित केल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी जन माहिती अधिकारी तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप विधी अधिकारी, कायदा विभाग, महापालिका मार्ग, मुंबई यांच्याकडे दि.१७.१.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.सी.एच.मोहोम्मद आणि श्री.ए.आर.पांडे, यांचा पत्ता व संपर्क क्रमांक इ.बाबत एकूण १४मुद्दयांवर माहिती मागितली होती. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असलयाने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०७ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११६६/०२**

**श्रीमती रंजना परेश बेहेर, ------ अपीलकर्ता**
**मु.पो.विरदेल, ता. सिंदखेडा,**
**जिल्हा- धुळे.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सॉलिसिटर-नि-सह सचिव,**
**विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सॉलिसिटर-नि-सह सचिव,**
**विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती रंजना परेश बेहेर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सॉलिसिटर-नि-सह सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, श्री.संभाजी भिलाजीराव देवकर यांची जिल्हा सरकारी वकील, जिल्हा सरकारी अभियोक्ता व सहाय्यक सरकारी वकील अशा विविध पदावर नेमणूक करण्यात आली होती. वेळोवेळी देवकर यांनी सादर केलेल्या अर्जाच्या /प्रतिज्ञापत्राच्या साक्षांकित प्रती, त्यांचे पोलीस व्हेरिफिकेशन याबाबतची अनुषंगिकमाहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेल्या माहितीपैकी सन १९९६ ची कागदपत्रे जन माहिती अधिका-यांकडे उपलब्ध नसल्याने माहिती पुरविता येत नसल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. सन १९९९ नंतरची कागदपत्रे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिका-यांनी संपूर्ण माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.११.२००८ रोजी

सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकारातर्फे त्यांचे प्रतिनिधी हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सॉलिसिटर-नि-सह सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, श्री.संभाजी भिलाजीराव देवकर यांची जिल्हा सरकारी वकील, जिल्हा सरकारी अभियोक्ता व सहाय्यक सरकारी वकील अशा विविध पदावर नेमणूक करण्यात आली होती. वेळोवेळी देवकर यांनी सादर केलेल्या अर्जाच्या /प्रतिज्ञापत्राच्या साक्षांकित प्रती, त्यांचे पोलीस व्हेरिफिकेशन याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली संपूर्ण माहिती देण्याकरिता जन माहिती अधिंका-यांनी संबंधित फाईल्सचा शोध घ्यावा. सदर फाईल अपिलकारास तपासणीकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर अपिलकारास मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या प्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०७ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११६८/०२**

**श्री. गिरीश मित्तल,** **------ अपीलकर्ता**
**१३०३, ध्रूव, अशोकवन,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्तांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/नॉर्थ वॉर्ड,**
**दहिसर (प.), मुंबई- ४०० ०६८.**

**जन माहिती अधिकारी तथा हॉल्टिकल्चर असिस्टंट,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/नॉर्थ वॉर्ड,**
**दहिसर (प.), मुंबई- ४०० ०६८.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. गिरीश मित्तल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा हॉल्टिकल्चर सहाय्यक, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/नॉर्थ वॉर्ड, दहिसर, मुंबई यांच्याकडे दि. २५.१२.२००७ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.२३९५/सी दहिसर गाव येथे आरक्षित असलेल्या भूखंडाबाबत अनुषंगिक चार मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. अपिलकाराने जन माहिती अधिका-याविरुध्द प्रथम अपिलीय अधिका-यांकडे उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अपील दाखल करणे आवश्यक होते. परंतु, अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा हॉल्टिकल्चर सहाय्यक, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/नॉर्थ वॉर्ड, दहिसर, मुंबई यांच्याकडे दि. २५.१२.२००७ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.२३९५/सी दहिसर गाव येथे आरक्षित असलेल्या भूखंडाबाबत अनुषंगिक चार

मुद्दयांवर  माहिती मागितली होती.  जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील  कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०७ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११७०/०२**

**श्री. रविंद्र शिंदे,** **------ अपीलकर्ता**
**प्रथमेश अपार्टमेंट, बी विंग, फ्लॅट नं.३०४,**
**मिलिंद नगर, माटुंगा लेबर कॅम्प,**
**टाटा पॉवर हाऊस समोर,माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. रविंद्र शिंदे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.९.३.२००७ रोजी अर्ज करुन, मिलिंदनगर, माटुंगा लेबर कॅम्प येथील प्रथमेश अपार्टमेंट या इमारतीचे बांधकाम प्रथमेश कन्स्ट्रक्शन कं. यांनी केले. सदर बांधकाम मनपाने मंजूर केलेल्या आराखडयाप्रमाणे केले. त्या आराखडयाची प्रत, भोगवटा प्रमाणपत्र इ.संबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.९.३.२००७ रोजी अर्ज करुन, मिलिंदनगर, माटुंगा लेबर कॅम्प येथील प्रथमेश अपार्टमेंट या इमारतीचे बांधकाम प्रथमेश कन्स्ट्रक्शन कं. यांनी केले. सदर बांधकाम मनपाने मंजूर केलेल्या आराखडयाप्रमाणे केले. त्या आराखडयाची प्रत, भोगवटा प्रमाणपत्र इ.संबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. वास्तुशास्त्रज्ञ/ विकासक यांनी रेल्वे प्राधिकरणाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केले नाही. जन माहिती अधिका-यांनी रेल्वे प्राधिकरणास पत्र पाठवून प्रकल्पास ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत विनंती केली आहे. विकासक तसेच वास्तुशास्त्रज्ञांनी रेल्वे प्राधिकरणाकडे ना हरकत प्रमाणपत्राकरिता विनंती केली आहे. सदर बाबीसंबंधी रेल्वे प्राधिकरणाकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचे अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.०१.४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांकडून करण्यात येत असलेली/ केलेली अद्ययावत माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०७ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०८७/०२**

**श्री. अर्नेस्ट सुटले, सचिव** **------ अपीलकर्ता**
**चेंबूर इलेव्हन हेवन को.ऑप.हौ.सोसायटी,**
**इमारत क्र.११, सहकार नगर-३,**
**चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पश्चिम विभाग,**
**शरदभाऊ आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत प्रस्ताव),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पश्चिम विभाग,**
**शरदभाऊ आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री.अर्नेस्ट सुटले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगपालिका, एम/पश्चिम विभाग, चेंबूर, मुंबई यांच्याकडे दि.५.११.२००७ रोजी अर्ज करुन, साईकृपा गृहनिर्माण संस्थेत निवासी सदनिका क्र. ३३० मध्ये बेकायदेशीररित्या बांघण्यात आलेल्या मंदिराबाबत मनपाने दिलेल्या लेखी परवानगीची प्रत मागितली होती.

जन माहिती अधिका-याने दि. ४.१२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२.१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. निवासी वापरासाठी असलेल्या सदनिकेमध्ये गृहनिर्माण संस्थेने मंदिर बांधलेले आहे. मनपा कार्यालयाने याकरिता कोणतीही परवानगी दिलेली नाही. अशा प्रकारची परवानगी कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांच्या कार्यालयात मिळू शकते. म्हणून अपिलकाराचा अर्ज कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठविण्यात यावा असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी जन माहिती

अधिका-यांना आदेश दिले. सदर कारवाई आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत करुन अर्जदारास उत्तर पाठविण्याबाबत नमूद करुन प्रथम अपील निकालात काढण्यात आले.

मंदिर बांधण्यास दिलेल्या परवानगीची प्रत मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि.५.११.२००७ रोजी जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन, साईकृपा गृहनिर्माण संस्थेत निवासी सदनिका क्र. ३३० मध्ये बेकायदेशीररित्या बांघण्यात आलेल्या मंदिराबाबत मनपाने दिलेल्या लेखी परवानगीची प्रत मागितली होती. साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेस सदनिकेमध्ये मंदिर बांधण्यास दिलेल्या परवानगी पत्राची प्रत, जन माहिती अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता (इमारती प्रस्ताव) यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी व हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-१०/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०९६/०२**

**श्री. संजय गंगाराम पवार,** **------ अपीलकर्ता**
**हनुमान मित्र मंडळ, परळ, अंबा वाडी चाळ,**
**जहाँगीर मेरवानजी पथ, परळ, मुंबई-४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

**- विवेचन -**

श्री. संजय गंगाराम पवार, मुंबई, यानी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर दि.२४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता उत्तरवादी तसेच अपिलकार हजर नव्हते.

अपिलकाराने महालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने नगर भूकर क्र. १३८-बी-१/७४ (भाग) परळ शिवडी विभाग येथे राबविण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत एकूण ४ मुद्दयांवर माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. अपिलकाराने मागितलेली माहिती प्रश्नोत्तर व अभिप्राय स्वरुपाची असल्यामुळे देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी कळविले. अपिलकाराने दि.१२.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केले. अपिलकाराने सादर केलेल्या दोन्ही अर्जावर या अपिलामध्ये एकत्रित विचार केला गेला. अर्जदाराच्या दि.१२.९.२००७ च्या अर्जावर जन माहिती अधिका-याकडून महालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. ची कागदपत्र मिळाली असल्याचे अपिलकाराने सुनावणी दरम्यान सांगितले. जी माहिती अभिप्राय स्वरुपाची आहे ती अधिनियमातील तरतुदीनुसार देता येत नाही. या जन माहिती अधिका-यांच्या भूमिकेशी सहमत असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आपल्या आदेशामध्ये नमूद केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार संज्ञेच्या माहिती या संज्ञेत बसत नसल्यामुळे जन माहिती अधिका-यांनी दि. २९.८.२००७ च्या पत्रान्वये माहिती नाकारली. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१२.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित मुदतीत म्हणजे प्रथम अपील दाखल केल्यापासून ४५ दिवसात प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. विहित कालावधी उलटून गेल्यानतर दि.३.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. " अभिप्राय स्वरुपाची माहिती ही केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) मधील "माहिती " या संज्ञेत बसत नसल्यामुळे अपिलकार यांच्या विनंतीचा विचार करता येत नाही," असे नमूद करुन अपील निकाली काढले. सदर प्रथम अपिलावर सुनावणी व आदेश पारित करण्याची कारवाई विलंबाने केली. याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांविरुध्द खातेनिहाय चौकशी का प्रस्तावित करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत प्रथम अपिलीय अधिका-यांनी राज्य माहिती आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१०/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११७७/०२**

**श्री. प्रमोद लक्ष्मण कदम, ------ अपीलकर्ता**
**१६/डी-३, श्री. साई को.ऑप.हौ.सोसायटी,**
**एस.व्ही.पी. नगर, अंधेरी (प.),मुंबई- ४०० ०५३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक,**
**रुम नं.३६९, म्हाडा, २ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**रुम नं.३६९, म्हाडा, २ रा मजला,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रमोद लक्ष्मण कदम, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.२६.१२.२००७ रोजी अर्ज करुन, वर्सोवा अंधेरी, श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. प्लॉट नं.१६,एस.व्ही.पी.नगर, अंधेरी, नोंदणी क्र.बी.ओ.एम.(डब्लू के/वेस्ट)एच.एस.जी.(टी.ओ.) ६५८६, सन १९९२-९३ या गृहनिर्माण संस्थेशी निगडित एकूण २४ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्थेने अपिलकारास दि,१५.२.२००८ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.४.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनाावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, म्हाडा, गृहनिर्माण भवन,, वांद्रे, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, वर्सोवा अंधेरी, श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. प्लॉट नं.१६,एस.व्ही.पी.नगर, अंधेरी, नोंदणी क्र.बी.ओ.एम.(डब्लू के/वेस्ट) एच.एस.जी.(टी.ओ.) ६५८६, सन १९९२-९३ या गृहनिर्माण संस्थेशी निगडित एकूण २४ मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील असल्याने संस्थेने दि.१५.२.२००८ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती अपिलकारास उपलब्ध करुन दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. यावरुन अपिलकाराने मागणी केलेली माहिती संस्थेने उपलब्ध करुन दिली असल्याने या प्रकरणी मी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११७८/०२**

**श्री. देविदास संपत,** **------ अपीलकर्ता**
**गीतांजली, ३५, युनियन पार्क,**
**फ्लॅट नं.५, ३ रा मजला, चेंबूर, मुंबई- ४०० ०७१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**वाहतूक विभाग, ८७ पोचखानवाला रोड,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**वाहतूक विभाग, ८७ पोचखानवाला रोड,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. देविदास संपत, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वाहतूक विभाग, वरळी, मुंबई यांच्याकडे दि.१४.३.२००८ रोजी अर्ज करुन, मार्ग ओलांडताना फार त्रास सहन करावा लागत असल्यामुळे मेत्री पार्क ट्रॅफिक सिग्नल व झेब्रा क्रॉसिंग पट्टया इ. बाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वाहतूक विभाग, वरळी, मुंबई  यांच्याकडे दि.१४.३.२००८ रोजी अर्ज करुन, मार्ग ओलांडताना फार त्रास सहन करावा लागत असल्यामुळे मेत्री पार्क ट्रॅफिक सिग्नल व झेब्रा क्रॉसिंग पट्टया इ. बाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.  जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते.  अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.  या परिस्थितीत मी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात  येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११९४/०२**

**श्री. वाय. एस. देसाई,** **------ अपीलकर्ता**
**छत्रपती शाहू सदन,**
**रुम नं.४१, करी रोड, मुंबई- ४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**शेख हफिजउद्दीन मार्ग, मुंबई- ४०० ०१३.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**शेख हफिजउद्दीन मार्ग, मुंबई- ४०० ०१३.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. वाय.एस.देसाई, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.४.२००८रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, मुंबई यांच्याकडे दि.२८.१.२००८रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.२०१६, १/२०१६ आणि २०१७ भायखळा विभाग, लक्ष्मीदास दोसा कंपाऊंड, केशवदास कायंडे मार्ग, मुंबई येथील मालमत्तेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.६.५.२००८ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.२०.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.२०१६, १/२०१६ आणि २०१७ भायखळा विभाग, लक्ष्मीदास दोसा कंपाऊंड, केशवदास कायंडे मार्ग, मुंबई येथील मालमत्तेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहितीपोटी रु.१६/-एवढे शुल्क भरण्याबाबत अपिलकारास दि.१६.९.२००८ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे अपिलकाराने सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांते येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११८७/०२**

**श्री. प्रकाश बी. इंगळे,** **------ अपीलकर्ता**
**सागर संगम, २७/६३, ६ वा मजला,**
**के.सी.रोड, वांद्रे रेक्लमेशन,**
**वांद्रे (पूर्व),, मुंबई- ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जनरल मॅनेजर, (इनस्पेक्शन, जी.अे.डी.),**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**कॉर्पोरेट ऑफीस, प्रकाशगड, ४ था मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**आस्थापना अधिकारी /वैयक्तिक( जी.अे.डी.),**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**कॉर्पोरेट ऑफीस, प्रकाशगड, ४ था मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. प्रकाश बी.इंगळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.२५.१०.२००७ रोजी अर्ज करुन, नागपूर नागरी झोन मधील कार्यकारी अभियंत्याची किती पदे किती महिन्यांपासून रिक्त होती, सदर कार्यकारी अभियंत्यांची पदे भरण्याकरिता कोणती पात्रता आवश्यक होती इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही, आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी उपस्थित नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या. वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, नागपूर नागरी झोन मधील कार्यकारी अभियंत्याची किती पदे किती महिन्यांपासून रिक्त होती, सदर कार्यकारी अभियंत्यांची पदे भरण्याकरिता कोणती पात्रता आवश्यक होती इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११८६/०२**

**श्री. के. चित्त रासन, ------ अपीलकर्ता**
**द्वारा- श्री. ए. कृष्णन,**
**रुम नं.१२, न्यू चाळ, रामबाग, पोयसर,**
**बोरीवली (प.), मुंबई- ४०० ०९२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/मध्य विभाग,**
**महापालिका मंडई इमारत, २ रा मजला,**
**एस.व्ही.रोड,बोरीवली (प.), मुंबई- ४०० ०९२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/मध्य विभाग,**
**महापालिका मंडई इमारत, २ रा मजला,**
**एस.व्ही.रोड,बोरीवली (प.), मुंबई- ४०० ०९२ ------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. के. चित्त रासन, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/मध्य विभाग, बोरीवली, मुंबई यांच्याकडे दि.२४.१.२००८ रोजी अर्ज करुन, डॉ.आंबेडकर नगर विकास सोसायटीचे चेअरमन श्री.टी.वेल्लुस्वामी हे रहात असलेल्या रावजी चाळ, रुम नं.२, ११२, सेंट ॲन्थोनी रोड, पोयसर, कांदिवली या जागेत अनधिकृतरित्या करण्यात येत असलेल्या बांधकामावर कारवाई करण्याबाबत अपिलकाराने दि.१२.७.२००७, २१.८.२००७, १३.९.२००७ रोजी दिलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अनधिकृत बांधकामाविरुध्द बृ.मुं.म.न.पा.कलम ३५१ अन्वये कायदेशिररित्या पाठपुरावा करण्यात येत असल्याबाबत अपिलकारास दि.५.२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.२७.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.७.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित

करण्यात आली. तक्रारीत नमूद केलेल्या अनधिकृत बांधकामावर मनपा कायदा १९८८, कलम ३५१ अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे. पुढील कारवाई करण्यांत येत आहे. अपिलकारास कलम ३५१ च्या नोटीसीची प्रत देण्यात यावी असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.७.३.२००८ रोजी आदेश पा ारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार यांचे प्रतिनिधी हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/मध्य विभाग, बोरीवली, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, डॉ.आंबेडकर नगर विकास सोसायटीचे चेअरमन श्री.टी.वेल्लुस्वामी हे रहात असलेल्या रावजी चाळ, रुम नं.२, ११२, सेंट ॲन्थोनी रोड, पोयसर, कांदिवली या जागेत अनधिकृतरित्या करण्यात येत असलेल्या बांधकामावर कारवाई करण्याबाबत अपिलकाराने दि.१२.७.२००७, २१.८.२००७, १३.९.२००७ रोजी दिलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. अनधिकृत बांधकामाविरुध्द मनपा अधिनियम कलम ३५१ अन्वये नोटीस दिली. नोटीशीची प्रत अपिलकारास उपलब्ध करुन दिली. अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत केलेल्या कारवाईची माहिती अपिलकारास उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अनधिकृत बांधकामाविरुध्द मनपा अधिनियमातील कलम ३५१ अन्वये नोटीस देऊन त्यापुढील केलेल्या कारवाईची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०७०/०२**

**श्री. सुरदास तुकाराम डोके,** **------ अपीलकर्ता**
**शिवशक्ती सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**आगरबाजार, एस.के.बोले रोड,**
**दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त, (बाजार),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महात्मा ज्योतीबा फुले मंडई, १ ला मजला,**
**डॉ.डी.एन.रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अधिक्षक (बाजार-२),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महात्मा ज्योतीबा फुले मंडई, १ ला मजला,**
**डॉ.डी.एन.रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**नगररचना (अंमलबजावणी),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग, मुंबई.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.सुरदास तुकाराम डोके, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक, बाजार-२, बृहन्मुंबई महानगरपालिका, महात्मा ज्योतीबा फुले मंडई, मुंबई यांच्याकडे दि.२७.११.२००७ रोजी अर्ज करुन, सीटी सर्वे क्र.६८/६९, माहीम डिव्हीजन वरील राखीव जागेवरील हक्कदारापैकी श्री.रामदास तु.डोके त्यांचे नांवे दुकाने कोणत्या पुराव्यावर दिली याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले की, कागदपत्राचा बाजार विभागात कसून शोध घेतला असता संबंधित कागदपत्र उपलब्ध होऊ शकली नाहीत. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि.१५.३.२००७ रोजी प्रथम अपिलीय

अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २७.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक, बाजार-२ यांनी पुन्हा एकदा बाजार विभागातील अभिलेखाचा शोध घ्यावा व १५ दिवसांच्या आत अपिलकारास आवश्यक माहिती उपलब्ध असल्यास देण्यात यावी असे नमूद करुन दि.४.५.२००७ रोजी आदेश पारित केले. कोठल्याही प्रकारचे कागदपत्र मिळाले नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सीटी सर्वे क्र.६८/६९, माहीम डिव्हीजन वरील राखीव जागेवरील हक्कदारापैकी श्री.रामदास तु.डोके त्यांचे नांवे दुकाने कोणत्या पुराव्यावर दिली याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची कागदपत्र कसून शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकली नाहीत यामुळे अपिलकारास माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. संबंधित कागदपत्राचा पुन्हा एकदा शोध घ्यावा. कागदपत्र उपलब्ध झाल्यास अपिलकारास माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-याचे आदेश आहेत. तरीही अपिलकारास आवश्यक ती माहिती अद्याप प्राप्त झाली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (बाजार) श्री.दिपक वासुदेव कामत यांनी या प्रकरणी कागदपत्र उपलब्ध होत नसल्याबाबत जाणिवपूर्वक निर्णय घेऊन तसे अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत कळवावे.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७३५/०२**

**श्री. रवि नामदेव जोशी,** **------ अपीलकर्ता**
**नारळी आग्रीपाडा, १९ वा रस्ता,**
**रामको चाळ, रुम नं.४,**
**खार (प.), मुंबई- ४०० ०५२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम कार्यालय,**
**अंधेरी (प.), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता, (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम कार्यालय,**
**अंधेरी (प.), मुंबई.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. रवि नामदेव जोशी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, मुंबई यांच्याकडे दि. १४.१२.२००६ रोजी अर्ज करुन, माऊली हाऊस, गावठाण क्र.२, जुहू चर्च रोड, जुहू विलेपार्ले, मुंबई-५६ येथील अनधिकृत बांधकामाकरिता मनपा कार्यालयाकडून परवानगी घेण्यात आली होती काय, असल्यास परवानगी पत्राची प्रत व इतर अनुषंगिक १६ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१७.१.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१२.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.३.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी सात दिवसाचे आत अपिलकारास सुधारित माहिती द्यावी, असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.३.२००७ रोजी आदेश पारित केले. तरीही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, माऊली हाऊस, गावठाण क्र.२, जुहू चर्च रोड, जुहू विलेपार्ले, मुंबई-५६ येथील अनधिकृत बांधकामाकरिता मनपा कार्यालयाकडून परवानगी घेण्यात आली होती काय, असल्यास परवानगी पत्राची प्रत व इतर अनुषंगिक १६ मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशाप्रमाणे सुधारित उत्तर दिलेले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्राची तपासणी करण्याकरिता प्रथम परवानगी द्यावी. त्यानंतर अपिलकारास उपलब्ध कागदपत्राच्या प्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२०३/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,** **------ अपीलकर्ता**
**२०४, राजबाग, भालचंद्र मार्ग,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप प्रमुख अभियंता, शहर,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग**
**३ रा मजला, भायखळा, मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, (इ.प्र.) शहर-२,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग**
**३ रा मजला, भायखळा, मुंबई-४०० ००८.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. प्रकाश गोविंद नवाथे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई यांच्याकडे दि.६.८.२००७ रोजी अर्ज करुन, आर्किटेक्ट करानी ॲन्ड सन्स यांनी राजबागसाठी मनपाकडे सादर केलेले बी.सी.सी.बाबत अनुषंगिक तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२४.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.२.२००८ रोजी आदेश पारित केले. अपिलकारास अर्जातील मुद्दा क्र.१ व २ बाबत स्थळ निरीक्षण करुन सात दिवसाच्या आत अहवाल सादर करण्याबाबत सूचना दिल्या. अपिलकाराने सादर केलेल्या इतर दोन प्रथम अपिलात प्रश्नोत्तर स्वरुपाची माहिती मागितली. सदर बाब उक्त अधिनियमातील कलम-२ (च) मध्ये बसत नसल्याने माहिती नाकारण्यात आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, आर्किटेक्ट करानी अॅन्ड सन्स यांनी राजबागसाठी मनपाकडे सादर केलेले बी.सी.सी.बाबत अनुषंगिक तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती. पार्किंगची परवानगी ही पाण्याच्या टाकीवर कोणत्या डि.सी.रुलप्रमाणे देण्यात आली अशी अपिलकाराने विचारणा केली असता, डि.सी.रुल हे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये असल्याने व त्याची उपलब्धता शासकीय मुद्रणालय येथे असल्याचे अपिलकारास कळविले होते. बांधकाम पूर्ततेच्या दाखल्याच्या अभिलेखामध्ये पार्किंगची जागा ही पाण्याच्या टाकीवर दर्शविली आहे. परंतु पाण्याच्या टाकीवर वॉशिगची जागा दर्शविलेली नाही. अपिलकाराने मूळ अर्जात सदर बाबतीत प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती मागितली असल्याने ही बाब उक्त अधिनियमातील कलम-२ (एफ) मध्ये बसत नाही असे आदेशात नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२०४/०२**

**श्री. महावीर प्रसाद सैनी,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा- हॉटेल प्रेसिडंट, महाराष्ट्र नगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. महावीर प्रसाद सैनी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.५.२००८रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे मुंबई यांच्याकडे दि.१३.९.२००७ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र नगर/ आंबेडकर नगर, सी.टी.एस.नंबर ६२९ येथील पुनर्वसनाबाबत मे.गजराज हौसिंग निर्माण प्रा.लि.राजेश मूलचंद शहा यांना विकासासंबंधीच्या झो.पु.प्रा.नी दिलेले आवश्यक असलेल्या फायलीचे निरीक्षण करण्याबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.८.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२९.२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.१४.३.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्याचे मान्य केले. अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडून माहिती प्राप्त करावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. जोडपत्र-ब अनुसार अपील अर्जामुळे देण्यात आलेली माहिती दिशाभूल करणारी व खोटी असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र नगर/ आंबेडकर नगर, सी.टी.एस.नंबर ६२९ येथील पुनर्वसनाबाबत मे.गजराज हौसिंग निर्माण प्रा.लि.राजेश मूलचंद शहा यांना विकासासंबंधीच्या झो.पु.प्रा.नी दिलेले आवश्यक असलेल्या फायलीचे निरीक्षण करण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने अपिलकाराचे समाधान झाले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीची कागदपत्र प्रथम अपिलकारास पहाणीकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर अपिलकारास उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत द्याव्यात.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२०७/०२**

**श्री. मनोहर बाबुराव आव्हाड,** **------ अपीलकर्ता**
**वृंदावन २/बी/ ३०५,**
**रहेजा टाऊनशीप,**
**मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०९७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र लोकसवो आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सचिव,**
**महाराष्ट्र लोकसवो आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत, मुंबई-४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. मनोहर बाबूराव आव्हाड, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्याकडे दि.३.९.२००७ व १२.९.२००७ रोजी अर्ज करुन, सन १९९८ मधील पोलीस उपनिरीक्षकाच्या मर्यादित विभागीय स्पर्धा परिक्षेबाबत अनुषंगिक १२ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.३१.१.२००८ च्या पत्राने अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२५.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२.४.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील फेटाळले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, सन १९९८ मधील पोलीस उपनिरीक्षकाच्या मर्यादित विभागीय स्पर्धा परिक्षेबाबत अनुषंगिक १२ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. अपिलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र.१ ते ३ उक्त अधिनियमातील कलम-८ (एच) नुसार माहिती देण्यात आली नाही. मुद्दा क्र.४, ५ व ६ बाबत उत्तरपत्रिका/ उत्तरपुस्तिका एसीबीच्या ताब्यात आहेत. त्यामुळे कलम ८(१) (ई) नुसार उत्तर पुस्तिकेच्या प्रती देता येणार नाहीत. मुद्दा क्र.७, ८ बाबत शासन परिपत्रक/ आदेशाची प्रत अपिलकारास देण्यात आली. मुद्दा क्र.९, १० बाबत एसीबीला सादर करण्यात आलेल्या अहवालाची झेरॉक्स प्रत देण्यात आली. अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधीचे प्रकरणी एसीबीकडे चौकशी चालू आहे. मागितलेली माहिती ही क्रिमिनल गुन्हयासंबंधीच्या चौकशीची निगडीत आहे. उपलब्ध माहिती अपिलकारास देण्यात आली आहे. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२११/०२**

**श्री. हरिष परळकर, ------ अपीलकर्ता**
**पहिला मजला, ब्लॉक २, क्षत्रिक्य,**
**अनंत पाटील मार्ग, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**के.यु.क्लब, वनमाळी हॉल,**
**७० डी, छबीलदार रोड, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**के.यु.क्लब, वनमाळी हॉल,**
**७० डी, छबीलदार रोड, दादर, मुंबई- ४०० ०२८. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. हरिष परळकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.४.२००८रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, के.यु.क्लब, वनमाळी हॉल,दादर, मुंबई यांच्याकडे दि.१९.२.२००८ रोजी अर्ज करुन, क्षत्रिक्य इमारतीच्या बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२७.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, के.यु.क्लब, वनमाळी हॉल,दादर, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, क्षत्रिक्य इमारतीच्या बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती संस्था स्तरावरील असल्याने खाजगी संस्थां माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्याने मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२०९/०२**

**श्री. धोंडिराम दासा जाधव,** **------ अपीलकर्ता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**खार भांडार दुरुस्ती खाते, दुसरी हसनाबाद लेन,**
**खार (प.) दादर, मुंबई- ४०० ०५२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टीन रोड, वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टीन रोड, वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. धोंडीराम दासा जाधव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग, वांद्रे (प.) मुंबई यांच्याकडे दि.१६.१२.२००७ रोजी अर्ज करुन, प्लंबिंगचे काम करण्यासाठी चार्जिंग केलेल्या जॉब स्लिपची छायांकित प्रत, भांडारा दुरुस्ती खात्याच्या मुकादमाचे जुलै, २००७ या महिन्याचे हजेरी मस्टर मधील शेवटच्या पानाच्या प्रती, भांडार दुरुस्ती खात्यामधून सब इंजिनियर यांच्याकडे पाठविलेल्या दि.२८.७.२००७ च्या दैनंदिन प्रोग्रॅमची छायांकित प्रत इ. माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१८.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग, वांद्रे (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, प्लंबिंगचे काम करण्यासाठी चार्जिंग केलेल्या जॉब स्लिपची छायांकित प्रत, भांडारा दुरुस्ती खात्याच्या मुकादमाचे जुलै, २००७ या महिन्याचे हजेरी मस्टर मधील शेवटच्या पानाच्या प्रती, भांडार दुरुस्ती खात्यामधून सब इंजिनियर यांच्याकडे पाठविलेल्या दि.२८.७.२००७ च्या दैनंदिन प्रोग्रॅमची छायांकित प्रत इ. माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.१.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दिली. भविष्यात जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कारवाई करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२०८/०२**

**श्री. प्रमोद एच.रुंगठा,** **------ अपीलकर्ता**
**फ्लॅट नं.५, यशोधन, प्लॉट नं.२४१,**
**सेक्टर-३, आरडीपी-५, चारकोप,**
**कांदिवली (प.) मुंबई- ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह निबंधक,**
**विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक,**
**विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. प्रमोद एच.रुंगठा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडे दि. २४.१०.२००७ रोजी अर्ज करुन, दि.२१.९.२००७ च्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२२.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराचा अर्ज विहित नमुन्यात नाही. अपील कोणत्या माहिती अधिका-याविरुध्द तसेच कोणत्या मागणी अर्जाबाबत केलेले आहे याचा बोध होत नाही. माहितीच्या अधिकारान्वये अपील करावयाचे असल्यास अपिलामध्ये नमूद केलेल्या बाबीची पूर्तता करण्यात यावी. जेणेकरुन त्यावर कार्यवाही करणे शक्य होईल असे अपिलकारास दि. ११.१.२००८ च्या पत्रान्वये कळवून अपिलकाराचा दि.२२.१२.२००७ चा अर्ज पूर्ततेसाठी परत करण्यांत आला. प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे

द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, दि.२१.९.२००७ च्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.११.१.२००८ च्या पत्रान्वये समर्पक उत्तर दिले असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२०२/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,** **------ अपीलकर्ता**
**२०४, राजबाग, भालचंद्र मार्ग,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप प्रमुख अभियंता, शहर,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग**
**३ रा मजला, भायखळा, मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, (इ.प्र.) शहर-२,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग**
**३ रा मजला, भायखळा, मुंबई-४०० ००८.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. प्रकाश गोविंद नवाथे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई यांच्याकडे दि.१०.९.२००७ रोजी अर्ज करुन, राजबागच्या बेसमेंटमध्ये किती कार पार्किंगची परवानगी देण्यात आली आहे. प्रत्येक कारसाठी किती चौ.फू.एरिया दिला आहे, कार पार्किंग एरिया कोणाच्या नावावर आहे, त्या कारचे नंबर कोणते आहेत इ.अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि. १२.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१०.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.२.२००८ रोजी अपिलकाराने मागितलेली माहिती ही प्रश्नोत्तराच्या स्वरुपात असल्याने ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कायद्याच्या कलम २ (च) मध्ये बसत नसल्याने सदरची माहिती ज्या स्वरुपात विचारली आहे त्या स्वरुपात देता येत नाही, असे आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०६.११.२००८

रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, राजबागच्या बेसमेंटमध्ये किती कार पार्किंगची परवानगी देण्यात आली आहे. प्रत्येक कारसाठी किती चौ.फू.एरिया दिला आहे, कार पार्किंग एरिया कोणाच्या नावावर आहे, त्या कारचे नंबर कोणते आहेत इ.अनुषंगिक माहिती मागितली होती. साठलेल्या पाण्याच्या जागी डेंगू, चिकन गुनिया वगैरे डासांचा प्रादूर्भाव होतो. असे असताना पाण्याच्या टाकीवर कार पार्किंगची आणि वॉशिंग या गोष्टींना मनपाकडून कशी संमत्ती देण्यात आली याबाबत अपिलकाराने माहिती मागितली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. आरोग्याच्या दृष्टीने अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११७३/०२**

**श्री. संतोष जिवाजी दळवी,** **------ अपीलकर्ता**
**बी. डी.डी. चाळ नं.२, खोली नं.२८,**
**पहिला मजला, ना.म.जोशी मार्ग,**
**मुंबई- ४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सह मुख्य अधिकारी-१,**
**पणन, मुंबई मंडळ, तळमजला,**
**म्हाडा, वांद्रे, मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक,**
**पणन, मुंबई मंडळ, तळमजला,**
**म्हाडा, वांद्रे, मुंबई-४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. संतोष जिवाजी दळवी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा संचालक, पवन, मुंबई मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.१७.१.२००८ रोजी अर्ज करुन, पोलिसांना प्रतिक्षानगर येथे निवासी गाळे देणार असल्याबाबत सन २००५ मध्ये म्हाडा कार्यालयाने प्रसिध्द केलेल्या आदेशाची/ निर्णयाची छायाप्रत व इतर ६ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१६.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा संचालक, पवन, मुंबई मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, पोलिसांना प्रतिक्षानगर येथे निवासी

गाळे देणार असल्याबाबत सन २००५ मध्ये म्हाडा कार्यालयाने प्रसिध्द केलेल्या आदेशाची/ निर्णयाची छायाप्रत व इतर ६ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकार श्री.संतोष जिवाजी दळवी यांनी दि.५.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगास असे कळविले आहे की, अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.११.२००८ रोजी म्हाडा कार्यालयात बोलावून मागितलेली माहिती दिली. तरी आता या प्रकरणी कोणतीही तक्रार नाही. त्यांनी केलेले द्वितीय अपील रद्द करावे अशी विनंती केली आहे.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५ /११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११७४/०२**

**श्री. माधव गजानन देशपांडे, ------ अपीलकर्ता**
**७, कौस्तुभधाम को.ऑप.हौ.सोसायटी लि.**
**प्लॉट नं.२३, संघानी इस्टेट,गावदेवी रोड,**
**घाटकोपर (प.),मुंबई- ४०० ०८६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप आयुक्त (अभियांत्रिक),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१. ------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. माधव गजानन देशपांडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, बृहन्मुंबई महापालिका मुख्यालय, फोर्ट, मुंबई यांच्याकडे दि. १५.१.२००८ रोजी अर्ज करुन, महानगरपालिकेचा मलनिस्सा:रण प्रकल्प अनधिकृत बांधकामामुळे बाधित होत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.११.२.२००८ व १२.२.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.२१.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१५.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन, अपिलकाराने मागितलेली माहिती सात दिवसात उपलब्ध करुन दयावी असे दि.१८.३.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, बृहन्मुंबई महापालिका मुख्यालय, फोर्ट, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, महानगरपालिकेचा मलनिस्सा:रण प्रकल्प अनधिकृत बांधकामामुळे बाधित होत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल सादर करुन अपिलकाराने मागणी केलेल्या १ ते ६ मुद्दयांबाबत माहिती दिली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**सबब, निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७६४/०२**

**श्री. चंद्रकांत दिगंबर कारखानीस, ------ अपीलकर्ता**
**१५/१९, अक्षय महासागर गणेश मंदिरासमोर,**
**के.सी.मार्ग, रेक्लमेशन,**
**वांद्रे (प.),मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ वॉर्ड,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ वॉर्ड,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२८. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. चंद्रकांत दिगंबर कारखानीस, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक, बृहन्मुंबई महापालिका मुख्यालय, जी/नॉर्थ विभाग, मुंबई यांच्याकडे दि.१४.२.२००७ रोजी अर्ज करुन, सद्‌गुरु हॉस्पिटल प्रसुतीगृहाजवळ आणि टिळक ब्रिज जवळ पदपथावर, छबिलदास शाळेसमोर/ टिळक ब्रिजजवळील प्लॉट विषयी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.९.२.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि.८.३.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.५.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून षेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक, बृहन्मुंबई महापालिका मुख्यालय, जी/नॉर्थ विभाग, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, सद्गुरु हॉस्पिटल प्रसुतीगृहाजवळ आणि टिळक ब्रिज जवळ पदपथावर, छबिलदास शाळेसमोर/ टिळक ब्रिजजवळील प्लॉट विषयी अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११६३/०२**

**श्री. उमेश नामदेव शिंदे,** **------ अपीलकर्ता**
**२०४/२०५, अरुणोदय को.ऑप.हौ.सोसायटी,**
**कॅन्सर हॉस्पिटल प्लॉट, मरोळ मरोशी रोड,**
**अंधेरी (पूर्व.),मुंबई- ४०० ०५९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा,**
**संचालक (वै.शि.व संशोधक),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के.इ.एम.रुग्णालय व सेठ गो.सु.वै.महाविद्यलाय,**
**परेल, मुंबई-४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहआ, वैद्यकीय शिक्षण व आ.**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के.इ.एम.रुग्णालय व सेठ गो.सु.वै.महाविद्यलाय,**
**परेल, मुंबई-४०० ०१२.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. उमेश नामदेव शिंदे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहआ, वै.शि.व आ. बृहन्मुंबई महापालिका मुख्यालय, के.ई.एम.रुग्णालय, परेल मुंबई यांच्याकडे दि. ६.१२.२००७ रोजी अर्ज करुन, दि.३१.५.२००७ रोंजी महाराष्ट्र टाईम्स या मराठी दैनिकात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमधील अनु.क्र.४६ मधील कनिष्ठ भौतिकोपचार तज्ञाच्या आरक्षित पदाकरिता भज (ब) संवर्गातील मुलाखतीकरिता एकूण किती उमेदवार आले होते व त्यापैकी कोणत्या उमेदवारास नियुक्ती देण्यात आली याबाबत एकूण १० मुद्दयावर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१५.१२.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती असमाधानकार, अपुरी व दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२१.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२१.२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी आयोजित करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२८.२.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेली

माहिती असमाधानकारक असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहआ, वै.शि.व आ. बृहन्मुंबई महापालिका मुख्यालय, के.ई.एम.रुग्णालय, परेल मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, दि.३१.५.२००७ रोंजी महाराष्ट्र टाईम्स या मराठी दैनिकात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमधील अनु.क्र.४६ मधील कनिष्ठ भौतिकोपचार तज्ञाच्या आरक्षित पदाकरिता भज (ब) संवर्गातील मुलाखतीकरिता एकूण किती उमेदवार आले होते व त्यापैकी कोणत्या उमेदवारास नियुक्ती देण्यात आली याबाबत एकूण १० मुद्दयावर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीमध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११६७/०२**

**श्री. अर्जुनलाल एम. छाब्रिया, ------ अपीलकर्ता**
**बेले विस्टा, फ्लॅट नं.१५, ३ रा मजला,**
**एल.आय.सी. ऑफीस समोर,**
**एस. व्ही. रोड, वांद्रे (प.),मुंबई- ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**म्हाडा कार्यालय, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**म्हाडा कार्यालय, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. अर्जुनलाल छाब्रिया, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व० पुनर्रचना मंडळ, म्हाडा, वांद्रे, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, सारंग रोड मुंबई येथील चायना बाजार डिपार्टमेंटल स्टोअर्स येथील अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर बांधकामाकरिता ना हकरत प्रमाणपत्र दिले नसल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने दाखल केलेले प्रथम अपील कालबाहय झाले असल्याने ते प्रथम अपिलीय अधिका-यांनी निकालात काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडा, वांद्रे मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, सारंग रोड मुंबई येथील चायना बाजार डिपार्टमेंटल स्टोअर्स येथील अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२००/०२**

**श्री. सुदेश अनंत नलावडे,** **------ अपीलकर्ता**
**बी-२३०/०३, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सुदेश अनंत नलावडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, समान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दि.२३.१.२००८ रोजी अर्ज करुन, सामान्य प्रशासन विभागामार्फत देण्यात येणा-या सदनिका मुंबई पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांना केलेल्या वाटपासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील माहितीच्या व्याख्येत येत नसल्याने मागणी केल्यानुसार माहिती उपलब्ध करुन देणे सकृतदर्शनी शक्य नाही. कार्यासनात उपलब्ध असलेल्या सन १९९८ ते २००७ या कालावधीतील आदेशाच्या प्रती विहित शुल्क भरुन प्रती स्वीकारण्याची आपली तयारी आहे किंवा कसे, असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास शुल्क भरुन आदेशाच्या प्रती प्राप्त करुन देण्याची तयारी दर्शविली. अपिलकाराने मागितलेली माहिती विहित कालावधीत न मिळाल्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२३.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. आदेशाच्या प्रती प्राप्त झाल्या, परंतु ज्या विषयांतर्गत माहिती मागितली आहे, ती माहिती हेतुपुरस्सर टाळाटाळ केली. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, समान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, सामान्य प्रशासन विभागामार्फत देण्यात येणा-या सदनिका मुंबई पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांना केलेल्या वाटपासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराच्या दि.२२.२.२००८ च्या पत्रास अनुसरुन माहिती देण्यात आलेली आहे. उर्वरित माहितीकरिता रु.१८९६/-एवढी रक्कम भरण्याकरिता अपिलकारास दि.१५.२.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी लेखी अहवाल देऊन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने जन माहिती अधिका-यांनी कळविल्यानुसार माहिती प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आंत माहिती द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११८४/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे,** **------ अपीलकर्ता**
**२०४, राजबाग, भालचंद्र मार्ग,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप प्रमुख अभियंता, ( इ.प्र.),शहर-२**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग**
**३ रा मजला, भायखळा, मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, (इ.प्र.) शहर-२,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग**
**३ रा मजला, भायखळा, मुंबई-४०० ००८.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. प्रकाश गोविंद नवाथे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, मुंबई यांच्याकडे दि.२६ व २७.९.२००७ रोजी अर्ज करुन, म.न.पा.क्र.ई.ई.बी.पी./६४८६/एफ.एप./ए. दि.१६.९.२००४ या आराखडयाचे अवलोकन करुन यातील ब्लॉक नं.२०४ मध्ये दाखविलेल्या दोन बाल्कनी अंदाजे २०० चौ.फूट असून दोन्ही बाल्कनीच्या तीन बाजू बंद असताना एवढया मोठया खोल्यांना बाल्कनी संबोधण्यास कोणत्या डी.सी.रुलप्रमाणे मंजुरी देण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१२.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२९.१०.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आराखडे विकास नियंत्रण नियमावली (डी.सी.रुल) अंतर्गत कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव (शहर) यांच्यामार्फत मंजूर केलेले आहे. त्या कार्यालयाशी विचारणा केल्यास आपणास माहिती मिळू शकेल असे नमूद करुन अपील निकालात काढले. दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी. तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, म.न.पा. क्र.ई.ई.बी.पी./६४८६/एफ.एप./ए. दि.१६.९.२००४ या आराखडयाचे अवलोकन करुन यातील ब्लॉक नं.२०४ मध्ये दाखविलेल्या दोन बाल्कनी अंदाजे २०० चौ.फूट असून दोन्ही बाल्कनीच्या तीन बाजू बंद असताना एवढया मोठया खोल्यांना बाल्कनी संबोधण्यास कोणत्या डी.सी.रुलप्रमाणे मंजुरी देण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. मंजूर आराखडे हे विकास नियंत्रण नियमावली १९९१ (कलम क्र.३८८ (२२) नुसार मंजूर करण्यांत आले आहे. विकास नियंत्रण नियमावली ही शासकीय मुद्रणालय, नेताजी सुभाषचंद्र रोड, चर्नीरोड येथे उपलब्ध होऊ शकेल असे जन माहिती अधिका-यांनी दि.१०.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास उत्तर दिले. अपिलकाराने मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहरे यांच्या ई विभाग कार्यालयातून उपलब्ध होईल असेही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११९८/०२**

**श्री. काशिराम आत्माराम कालेकर, ------ अपीलकर्ता**
**४/४४, अे विंग, शिवकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**विवेकानंद नगर, वाकोला ब्रिज,**
**सांताक्रूझ, मुंबई- ४०० ०५५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. काशिराम आत्माराम कालेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.२.४.२००७ रोजी अर्ज करुन, शिवकृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील वाकोला ब्रिज प्लॉट ११६/ब मधील किती झोपडीधारकांना पात्र केले व अतिरिक्त किती झोपडीधारकांना पात्र केली यासंबंधीची संपूर्ण परिशिष्ट-२ ची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२८.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.१२.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती शासकीय माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, यांनी अपिलकारास माहिती पुरवावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २.१.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नसल्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे

द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता . अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, शिवकृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील वाकोला ब्रिज प्लॉट ११६/ब मधील किती झोपडीधारकांना पात्र केले व अतिरिक्त किती झोपडीधारकांना पात्र केली यासंबंधीची संपूर्ण परिशिष्ट-२ ची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संपूर्ण परिशिष्ट-२ ची माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ ची काटेकारेपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा, जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११८३/०२**

**श्रीमती साईप्रिया नामदेव मळीक, ------ अपीलकर्ता**
**११/५५३, सरदार नगर नं.१,**
**सरदार नगर, प्रांजल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**विवेकानंद नगर, वाकोला ब्रिज,**
**सायन, मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती साईप्रिया नामदेव मळीक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि. ३.७.२००७ रोजी अर्ज करुन, म्हाडाच्या सरदार नगर क्र.१ मधील इमारत क्र.११, सरदार नगर, प्रांजल सहकारी गृहनिर्माण संस्था, सायन, कोळीवाडा या संस्थेची अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती ही संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घेण्यात यावी तशा सूचना संस्थेला देण्यांत येत आहेत असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२७.७.२००७ च्या पत्राने कळविले. जन माहिती अधिका-यांनी सूचना देऊनही संस्थेने अपिलकारास माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२४.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि..१२.९.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. संस्थेचे सभासद तथा अपिलकार श्रीमती मळीक यांनी मागितलेली माहिती १५ दिवसाचे आत देऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.१०.२००७ रोजी आदेश पारित केले. माहिती मिळाली

नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१९.१२.२००७ रोजी पुन्हा अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२१.१.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. श्री.वसंत शिंदे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली. प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेकडून एक महिन्याच्या आत माहिती घेऊन ती अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी असे दि.७.२.२००८ रोजी आदेश पारित केले. माहिती प्राप्त झाली नसल्याने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, म्हाडाच्या सरदार नगर क्र.१ मधील इमारत क्र.११, सरदार नगर, प्रांजल सहकारी गृहनिर्माण संस्था, सायन, कोळीवाडा या संस्थेची अनुषंगिक माहिती मागितली होती. प्रांजल सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या डागडुजीसाठी वास्तुविशारदाची नेमणूक करावी. त्यांच्याकडून इमारतीचे परिक्षण करुन कॉलम, बीम, छत तसेच बाहेरील बाजूने प्लॅस्टर व ड्रेनेजचे काम करण्यासाठी किती खर्च येईल व एकूण खर्चाचा अहवाल त्यांनी दिल्या नंतरच प्रत्येक सभासदास ते पैसे विभागून दिल्यानंतर पैसे वसूल करावेत. इमारतीच्या दुरुस्तीसाठी किती खर्च होईल त्याबाबतचा वास्तुविशारद/ठेकेदार यांच्याकडून अहवाल नसताना सभासदाकडून पैसे वसूल करणे बेकायदेशीर आहे, याबाबत अपिलकाराने संस्थेकडे मागितलेली माहिती प्राप्त झाली नाही. अपिलकाराने मागितलेली माहिती देण्याकरिता प्रथम अपिलीय अधिका-यांनी श्री.वसंत शिंदे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक केली. सदर प्राधिकृत अधिका-यांनी संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलकारास दिल्याचे दिसून येत नाही. इमारतीच्या डागडुजीबाबत संस्थेने वेळीच कारवाई करणे संस्थेच्या सभासदांच्या जिवीताच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने अपिलकाराने मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत श्री.वसंत शिंदे, प्राधिकृत अधिकारी यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-१७/११/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\NOVEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११९३/०२**

**श्री.विलासराव बाबूराव देशमुख, ------ अपीलकर्ता**
**खोली नं.ए/१, श्री गुरुकृपा चाळ,**
**हनुमान टेकडी, काजूपाडा,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अप्पर जिल्हाधिकारी (अति/ निष्का.),**
**पश्चिम उपनगर यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
**पश्चिम उपनगर यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. विलासराव बाबूराव देशमुख, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, प्रशासकीय इमारत, ७ वा मजला, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.२५.२.२००८ रोजी अर्ज करुन, श्रीमती क्लेरादास लुडस यांनी हनुमान टेकडी, काजूपाडा, बोरीवली, मंबई येथील त्यांच्या राहत्या झोपडयालगत सन १९९६ सोजी सहा नवीन झोपडया बांधून तेथे भाडेकरु ठेवून भाडेकरुंकडून भाडे वसूल करीत आहेत. ती खाजगी जमीन मालमत्ता आहे. सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत अपिलकराने मागणी केली होती.

उक्त मिळकत ही गलिच्छ वस्ती घोषित झाल्यानंतर त्या ठिकाणी होणारे अनधिकृत बांधकाम निष्कासन करण्याची जबाबदारी ही संबंधित विभाग अधिकारी, महानगरपालिका यांच्या कार्यालयाची आहे. याकरिता संबंधित विभाग अधिकारी, महानगरपालिका कार्यालयाशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी दि.१८.३.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.३१.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १०.४.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित

केली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास अर्जावर दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.१३.३.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, प्रशासकीय इमारत, ७ वा मजला, वांद्रे, मुंबई , यांच्याकडे अर्ज करुन, श्रीमती क्लेरादास लुडस यांनी हनुमान टेकडी, काजूपाडा, बोरीवली, मंबई येथील त्यांच्या राहत्या झोपडयालगत सन १९९६ सोजी सहा नवीन झोपडया बांधून तेथे भाडेकरु ठेवून भाडेकरुंकडून भाडे वसूल करीत आहेत. ती खाजगी जमीन मालमत्ता आहे. सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत अपिलकराने मागणी केली होती. मागणी केलेली माहिती अन्य प्राधिकरणाकडून मिळाली असल्याने सदरहू अपिलाबाबत सुनावणी होण्याचे कारणच राहिलेले नाही. यास्तव आयोगाने अपील निकाली काढावे अशी विनंती दि.५.११.२००८ च्या पत्राने अपिलकाराने आयोगास विनंती केली आहे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११९२/०२**

**श्री. तन्मय दत्तात्रय वाळके,** **------ अपीलकर्ता**
**सी- ७०३, सिध्दीविनायक ॲनेक्स,**
**सिताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई- ४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**बृहन्मंबई महानगरपालिका,**
**जी/दक्षिण विभाग, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मंबई महानगरपालिका,**
**जी/दक्षिण विभाग, मुंबई.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. तन्मय दत्तात्रय वाळके, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(इमारत/कारखाने), बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/ दक्षिण विभाग, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन, सिध्दीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिका-यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराने केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (इमारत/कारखाने), बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/ दक्षिण विभाग, मुंबई, यांच्याकडे अर्ज

करुन, सिध्दीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिका-यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने माहितीच्या अधिकारात अर्ज करुन, मनपाचे कर्मचारी असलेल्या संस्थेच्या पदाधिका-यावर महानगरपालिकेने अनधिकृत बांधकाम केल्याबाबत एम. आर.टी.पी.५५ अंतर्गत नोटीस बजाविल्याचे नमूद करुन प्रशासकीय कार्यवाही करण्याची विनंती केली. तसेच या कर्मचा-यांनी इमारतीच्या टेरेसवर समारंभाचे जेवण बनवित नसल्याची खोटी माहिती देऊन महापालिकेची दिशाभूल केली. तरी याबाबत कर्मचा-यावर केलेली प्रशासकीय कार्यवाही दर्शविणा-या पत्राची प्रत किंवा कार्यवाही न केल्यास ती न करण्याची कारणे दाखविणा-या पत्राची प्रत मागितली होती. सदर प्रकरणी मनपाच्या अधिका-यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाच्या निरीक्षण अहवालाची प्रत, ज्या मनपाच्या कर्मचा-याने अनधिकृत बांधकाम केले याबाबत त्यांना लावण्यात आलेले चार्जेस याबाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११८९/०२**

**श्री. सुदर्शन सदानंद मंडलिक,** **------ अपीलकर्ता**
**६/१४, ६/१५, उपेंद्रनगर, एस.बी.मार्ग,**
**दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त (बाजार),**
**बृहन्मंबई महानगरपालिका, ११ वा मजला,**
**महात्मा ज्योतीबा फुले मंडई,**
**डी.एन.रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (बाजार),**
**बृहन्मंबई महानगरपालिका, ११ वा मजला,**
**महात्मा ज्योतीबा फुले मंडई,**
**डी.एन.रोड, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुदर्शन सदानंद मंडलिक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (बाजार), बृहन्मुंबई महानगरपालिका, महात्मा ज्योतीबा फुले मंडई, मुंबई-१, यांच्याकडे दि.२२.१.२००८ रोजी अर्ज करुन, क्र.एसी/एमकेटी/७७७/एईएम, दि.१३.४.२००७ च्या परिपत्रकाचा मसूदा कोणी तयार केला, त्यामध्ये बदल करुन मान्यता देण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि. २०.२.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.३.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. क्र.एसी/एमकेटी/७७७/एईएम, दि.१३.४.२००७ चे परिपत्रक कार्यालयात उपलब्ध असल्यास त्याची प्रत अपिलकारास द्यावी. सदर परिपत्रकाचा मसूदा कोणी तयार केला त्या अधिका-याचे नावही अपिलकारास उपलब्ध करुन द्यावे असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१८.३.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर

आदेशाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,(बाजार), बृहन्मुंबई महानगरपालिका, महात्मा ज्योतीबा फुले मंडई, मुंबई-१, यांच्याकडे अर्ज करुन, क्र.एसी/एमकेटी/७७७/एईएम, दि.१३.४.२००७ च्या परिपत्रकाचा मसूदा कोणी तयार केला, त्यामध्ये बदल करुन मान्यता देण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. परिपत्रक क्र.सआ/बाजार/७७७/ सअबा, दि.१३.४.२००७ बाबतचे मसूदा पत्र विभागात शोध घेऊनसुध्दा आढळले नाही. यामुळे मसुदा परिपत्रकाच्या छायांकित प्रती अपिलकारास उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१०.४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (बाजार) यांनी कागदपत्र उपलब्ध होत नसल्याबाबत जाणिवपूर्वक निर्णय घेऊन अपिलकारास हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११९०/०२**

**श्री. गिरीश गोतेछा,** **------ अपीलकर्ता**
**अध्यक्ष, मालाड व्यापारी संघ,**
**३, गोतेछा इस्टेट, साईनाथ रोड,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त,**
**बृहन्मंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग,**
**लिवर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग,**
**लिवर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. गिरीश गोतेछा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग, मालाड, मुंबई, यांच्याकडे दि.२४.१२.२००७ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.६१०, पटेल शॉपिंग सेंटर, मालाड (प.) समोरील इमारत, सहाना मॉलचे बांधकाम अधिकृत की अनधिकृत आहे, जर अनधिकृत असल्यास काय कारवाई करण्यात आली, याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२३.१.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास ो मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता (इमारती प्रस्ताव), पी आणि के विभाग, कांदिवली यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेकडे संपर्क साधावा असे कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग, मालाड, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.६१०, पटेल शॉपिंग सेंटर, मालाड (प.) समोरील इमारत, सहाना मॉलचे बांधकाम अधिकृत की अनधिकृत आहे, जर अनधिकृत असल्यास काय कारवाई करण्यात आली, याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने) यांनी माहिती गोळा करुन हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपिलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती १५ दिवसाचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११९५/०२**

**श्री. वाय. एस. देसाई,** **------ अपीलकर्ता**
**छत्रपती साहू सदन, रुम नं.४१,**
**करी रोड, मुंबई- ४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मंबई महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी महाराज बिल्डिंग,**
**फलटण रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**बृहन्मंबई महानगरपालिका,**
**छत्रपती शिवाजी महाराज बिल्डिंग,**
**फलटण रोड, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. वाय. एस. देसाई, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, छत्रपती शिवाजी महाराज बिल्डिंग, फलटण रोड, मुंबई, यांच्याकडे दि. २४.१.२००८ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.२०१६, १/२०१६ आणि २०१७, २००० आणि १/२०००, भायखळा विभाग, लक्ष्मीदास दोसा कंपाऊंड आणि रसूल जिवा कंपाऊंड येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या विकासासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२८.२.२००८ च्या पत्रान्वये पुनर्विकासाच्या प्रकल्पासंबंधीच्या कागदपत्राची कार्यालयात येऊन पाहणी केल्यानंतर आवश्यक ती माहिती देण्यात येईल असे अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.५.३.२००८ प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांचे प्रतिनिधी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, छत्रपती शिवाजी महाराज बिल्डिंग, फलटण रोड, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.२०१६, १/२०१६ आणि २०१७, २००० आणि १/२०००, भायखळा विभाग, लक्ष्मीदास दोसा कंपाऊंड आणि रसूल जिवा कंपाऊंड येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या पुर्नविकासासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली कागदपत्र उपलब्ध करुन देणे सोयीचे व्हावे म्हणून जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कार्यालयातील संबंधित नस्तीची पाहणी करण्याकरिता दि.२८.२.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. अपिलकार ज्येष्ठ नागरिक आहेत. नस्तीची पाहणी करण्याची आवश्यकता नाही. मागणी केलेली माहिती विशिष्ट प्रकारची असल्याने संबंधित कागदपत्राच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. नस्तीची पाहणी करण्याकरिता बोलावू नये असे अपिलकाराने जन माहिती अधिका-यांना दि.२५.१.२००८ च्या पत्रान्वये कळविल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते.सदर बाब लक्षात घेता मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत आवश्यक त्या कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास द्याव्यात.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११८५/०२**

**श्री. विशाल रामदास भोगे, ------ अपीलकर्ता**
**रुम नं.३०६, बिल्डिंग नं.१०१,**
**न्यू म्हाडा कॉलनी, मानखुर्द,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, मुंबई- ४०० ०८३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य अभियंता (स्थापत्य),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**कलानगर, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**कलानगर, वांद्रे (पूर्व),मुंबई- ४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विशाल रामदास भोगे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि. १३.१२.२००७ रोजी अर्ज करुन, श्री.ॲन्थोनी सॅबेस्टिन यांनी रोड क्र.१२, चेंबूर, मुंबई-७१ येथील म्हाडाच्या जागेत दुरुस्ती किंवा बांधकामासाठी ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे का, याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.७.१.२००८च्या पत्रान्वये अपिलकारास माहितीपोटी एकूण रु.१७४/-इतकी रक्कम कार्यालयात भरुन माहिती घेण्याबाबत कळविले.अपिलकाराने मागणी केलेल्या टिप्पणीच्या छायाप्रती जन माहिती अधिका-याने दि.३१.३.२००८च्या पत्रासोबत अपिलकारास उपलब्ध करुन दिल्या. त्या व्यतिरिक्त कोणतीही कागदपत्र कार्यालयात उपलब्ध नाहीत असेही अपिलकारास कळविले. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.४.२.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२५.३.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकाराने अपील अर्जात नमूद केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध झाल्यास सदर माहिती १५

दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी. माहिती उपलब्ध न झाल्यास तसे अपिलकारास कळवावे, असे नमूद करुन आदेश पारित केले. अपुरी व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री.ॲन्थोनी सॅबेस्टिन यांनी रोड क्र.१२, चेंबूर, मुंबई-७१ येथील म्हाडाच्या जागेत दुरुस्ती किंवा बांधकामासाठी ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे का, याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिका-यांनी दि.३१.३.२००८ च्या पत्रासोबत अपिलकारास उपलब्ध करुन दिल्या. त्या व्यतिरिक्त कार्यालयात कोणतीही कागदपत्रं उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास पाहणी करिता संबंधित नस्ती उपलब्ध करुन द्यावी. त्यानतर अपिलकाराच्या मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायापती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९०६/०२**

**श्री. वा. वि. चव्हाण, ------ अपीलकर्ता**
**विशेष कार्यकारी अधिकारी,**
**७६/ई, लोको.क.भवानी गेट,**
**र.अ.किडवाई मार्ग, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप नियंत्रक (शिधावाटप),**
**ई परिमंडळ, वढाळा, मुंबई- ४०० ०३१.**

**जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,**
**ई परिमंडळ, वढाळा, मुंबई- ४०० ०३१. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. वा.वि.चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, ई परिमंडळ, वडाळा, मुंबई, यांच्याकडे दि.२३.४.२००७ रोजी अर्ज करुन, रेशन कार्ड क्रमांक १९६३३१, शिधावाटप दुकान क्र.३१ ई/३, या शिधा पत्रिकेत १९९१ साली नमूद असलेल्या कौटुंबिक व्यक्तिच्या नावाची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.३१.५.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास असे कळविले की, सन १९९१ साली दिलेल्या शिधा पत्रिकेचा अभिलेख नष्ट करण्यात आल्यामुळे मागितलेली माहिती देता येत नाही. तथापि, अपिलकाराने सदर शिधापत्रिका धारकाच्या विरोधात केलेल्या तक्रार अर्जानुसार संबंधित शिधापत्रिका रद्द करण्यात आली असल्याचे कळविले. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.९.७.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. श्री.ओझी पॅरोश फर्नांडीस यांच्या अपील अर्जात नमूद केलेल्या शिधापत्रिकेची छायाप्रत अपिलकारास उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. सदर आदेशाने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

.सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, ई परिमंडळ, वडाळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, रेशन कार्ड क्रमांक १९६३३१, शिधावाटप दुकान क्र.३१ ई/३, या शिधा पत्रिकेत १९९१ साली नमूद असलेल्या कौटुंबिक व्यक्तिच्या नावाची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१६.७.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपुरी दिशाभूल करणारी माहिती दिली असा अपिलकाराचा दावा आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकारास कार्यालयातील संबंधित कागदपत्र पाहणीकरिता जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर मागणीप्रमाणे अपिलकारास आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्याव्या.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११६१/०२**

**श्री. आर.एस.मांद्रेकर,** **------ अपीलकर्ता**
**६ मानाजी ब्लॉक्स, तुकाराम जावाजी रोड,**
**मुंबई- ४०० ००७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक,**
**को.ऑपरेटीव्ह हौ.सो.मुंबई, मल्होत्रा हाऊस,**
**सहकारी संस्था, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**को.ऑपरेटीव्ह हौ.सो.मुंबई, मल्होत्रा हाऊस,**
**सहकारी संस्था, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. आर.एस.मांद्रेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, को.ऑप.हौ.सो.मुंबई, मल्होत्रा हाऊस, सहकारी संस्था, जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.६.२.२००८ रोजी अर्ज करुन, शांती सहकारी गृहनिर्माण संस्था, मोगल लेन, माहीम, मुंबई या संस्थेच्या कमिटीच्या सदस्यांनी सादर केलेल्या इंडीम्नीटी बॉंडस्ची प्रत मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, को.ऑप.हौ.सो.मुंबई, मल्होत्रा हाऊस, सहकारी संस्था, जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.१३.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ०७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, को.ऑप.हौ.सो.मुंबई, मल्होत्रा हाऊस, सहकारी संस्था, जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.६.२.२००८ रोजी अर्ज करुन, शांती सहकारी गृहनिर्माण संस्था, मोगल लेन, माहीम, मुंबई या संस्थेच्या कमिटीच्या सदस्यांनी सादर केलेल्या इंडीम्नीटी बाँडस्‌ची प्रत मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई करण्यांत येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र .२००८/१०८४/०२**

**श्री. राजू व्हटकर, सचिव,** **------ अपीलकर्ता**
**एकता सामाजिक संस्था (रजि.),**
**२१ पालकर चाळ, धारावी क्रॉस रोड,**
**धारावी, मुंबई-४०० ०१७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,, वांद्रे (पूर्व),मुंबई४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. राजू व्हटकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडे दि.३०.७.२००७ रोजी अर्ज करुन, सायन प्रतिक्षा नगर येथील संक्रमण शिबिरातील टी-३८ या इमारती मधील रुम नं.३०३, ३०४ व ३०८ या रुमधारकाचे कोठून स्थलांतर करण्यात आले. स्थलांतर आदेशाची प्रत , वॉर्ड अहवालाची प्रत, भाडे पावतीची प्रत, संस्थेची नावे, सदनिका धारकांची नावे, रुम नंबर, चाळ नंबर, रुम संबंधीची संपूर्ण कागदपत्राची एकूण चार अर्जान्वये माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेल्या माहितीचे संकलन करण्याचे काम चालू असून माहिती प्राप्त झाल्यानंतर माहिती कळविण्यांत येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. १३.८.२००७ च्या एकूण चार पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे दि. २२.८.२००७, ११.९.२००७, (२अपील) १९.१०.२००७ रोजी एकूण चार अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करण्यांत आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अर्जातील तांत्रिक त्रुटी अपिलकाराच्या निदर्शाास आणून माहिती देता येत नसल्याबाबत अपिलकारास दि.१.११.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय

अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक २३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्राची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने सायन प्रतिक्षा नगर येथील संक्रमण शिबिरातील टी-३८ या इमारती मधील रुम नं..३०३, ३०४ व ३०८ या रुमधारकाचे कोठून स्थलांतर करण्यात आले. स्थलांतर आदेशाची प्रत , वॉर्ड अहवालाची प्रत, भाडे पावतीची प्रत, संस्थेची नावे, सदनिाका धारकांची नांवे, रुम नंबर, चाळ नंबर रुम संबंधीची संपूर्ण कागदपत्राची एकूण चार अर्जान्वये माहिती मागितली होती. तरी सदरहू माहिती अपिलकाराने कार्यालयात जाऊन प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास तात्काळ माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२१८/०२**

**श्री. कैलाशप्रसाद जे. अग्रवाल,** ------ **अपीलकर्ता**
**१०७/ सी, सोहनी मेन्शन, दु.क्र.४, गाळा क्र.२,**
**ऑगस्ट क्रान्ती मार्ग, मुंबई- ४०० ०३६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,**
**अ परिमंडळ, खन्ना कन्स्ट्रक्शन इमारत,**
**सहकारी संस्था, जीपीओ समोर,**
**पहिला मजला, वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,**
**मुंबई रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,**
**चर्चगेट, मुंबई- ४०० ०२०.** ------- **उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. कैलाशप्रसाद जे.अग्रवाल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई, यांच्याकडे दि.८.११.२००७ रोजी अर्ज करुन, उपनियंत्रक शिधावाटप अधिका-यांनी कोणत्याही प्रकरणात निर्णय घेतल्यानंतर सदर निर्णय ते रद्द करु शकतात यासंबंधाने असलेल्या कायद्याच्या/आदेशाची प्रमाणित छायाप्रतीची मागणी केली होती.

अपिलकारास कोणत्या प्रकारची माहिती/ कागदपत्र अभिप्रेत आहेत याबाबत स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करुन कार्यालयात कळवावे म्हणजे माहिती देणे शक्य होईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.२०.११.२००७ च्या पत्राने अपिलकारास कळविले. उपनियंत्रकांनी घेतलेला कोणताही निर्णय त्यांना रद्द करता येतो का, या नियमाची छायाप्रत मिळण्यासाठी अपिलकाराने पुन्हा दि.४.१२.२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अधिका-यांकडे मागणी केली. अपिलकाराने

मागितलेली माहिती "माहिती" या व्याख्येत येणारी माहिती मागितल्यास ती देणे शक्य होईल. तरी देखिल स्थायी आदेशाबाबतची अपिलकारास संचिका पहावयाची असल्यास ती दाखविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१५.१२.२००७ च्या पत्राने कळविले. अपिलकाराने दि.१९.१२.२००७ च्या पत्रान्वये एकूण तीन मुद्दयांवर माहिती मागितली. जन माहिती अधिका-यांनी दि.९.१.२००८ च्या पत्रान्वये माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता शुल्क भरण्याबाबत कार्यालयास संपर्क साधण्याबाबत कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलकाराने नप्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील फेटाळण्यात आल्याचे आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, चर्चगेट, मुंबई, यांच्याकडे उपनियंत्रक शिधावाटप अधिका-यांनी कोणत्याही प्रकरणात निर्णय घेतल्यानंतर सदर निर्णय ते रद्द करु शकतात यासंबंधाने असलेल्या कायद्याच्या/ आदेशाची प्रमाणित छायाप्रतीची मागणी केली होती. अपिलकाराने त्यांच्या दि.८.११.२००७ च्या अर्जान्वये अ परिमंडळ कार्यालयाने त्यांचे आदेश ज्या नियमाच्या आधारे रद्द केले त्याची छायाप्रत मागितली होती. त्यानुसार प्रधान कार्यालयाच्या दि.६.१२.२००६ च्या परिपत्रकाची छायाप्रत अपिलकारास देण्यात आली. दि.६.१२.२००६ च्या परिपत्रकानुसार अधिकृत शिधावाटप दुकानास कायमस्वरुपी शिधापत्रिका जोडावयाच्या असल्यास सदर प्रस्तावास मा.नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु, शिधा पत्रिका तात्पुरत्या स्वरुपात जोडावयाच्या असल्या त्याबाबत परिमंडळ

कार्यालयाचे उप नियंत्रक, शिधावाटप हे निर्णय घेऊ शकतात. सदर प्रकरणी अधिकृत शिधावाटप दुकान क्र.११-अ-७० या दुकानास ११-अ-१२ च्या शिधा पत्रिका तात्पुरत्या स्वरुपात जोडावयाच्या असल्यामुळे उपनियंत्रक, शिधावाटप, अ परिमंडळ हे या प्रकरणी निर्णय घेण्यास सक्षम असल्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. यावरुन अर्जोवर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास समर्पक व नियमानुसार माहिती दिली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यानी पारित केलेल्या दि.१८.२.२००८ च्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११९७/०२**

**श्री. सुधीर रामजी घेडीया,** **------ अपीलकर्ता**
**१५९, माहीम तुरा मार्ग,**
**एस.व्ही.पी.रोड, मुंबई- ४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य अधिकारी (डब्लू),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मिळकत व्यवस्थापक (डब्लू),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सुधीर रामजी घेडीया, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.१७.१.२००८ रोजी अर्ज करुन, वर्सोवा संदिप सरोवर सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील सभासदत्वासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१८.२.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी पुरविलेली माहिती दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२५.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (डब्लू) यांनी अपिलकाराने मागितलेली माहिती १० दिवसाचे आत देण्याबाबत दि.९.४.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१०.४.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. अपिलकारास पुरविण्यात आलेली माहिती अप्रस्तुत असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वर्सोवा संदिप सरोवर सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील सभासदत्वासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेली माहिती अप्रस्तुत असल्याचे अपिलकाराने सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थिती मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित नस्ती पाहणीकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास देण्यात याव्यात.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९२८/०२**

**श्री. सी.एम.दोर्डी,** **------ अपीलकर्ता**
**फ्लॅट नं.१४, मिनू मॅन्शन,**
**सी.एच.एस.लि. ७९९, जामे जमशेद रोड,**
**दादर, मुंबई- ४०० ०१४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था-१ (शहर),**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, एफ/ एन विभाग,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सी.एम. दोर्डी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एफ/एन विभाग, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.३.७.२००७ रोजी अर्ज करुन, सदनिका क्र.२ चे सभासद श्रीमती दोर्डी यांच्या सभासदत्वासंबंधी एकूण सात मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१.८.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३.९.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अर्जावर शासकीय माहिती अधिका-यांनी कार्यवाही केल्याचे नमूद करुन अपील फेटाळण्यात आले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एफ/एन विभाग, फोर्ट,मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सदनिका क्र.२ चे सभासद श्रीमती दोर्डी यांच्या सभासदत्वासंबंधी एकूण सात मुद्दयांवर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलकारास दिली. अपिलकाराने मागितलेली काही माहिती संस्था स्तरावरील असल्याबाबत कळविले. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२१७/०२**

**श्री. डी. टी. चाफे,** **------ अपीलकर्ता**
**६०-सी, भुपेन चेंबर्स, ४ था मजला,**
**९, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर,**
**जुने जकात घर, तळमजला,**
**शहीद भगतसिंग मार्ग,, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक,**
**राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर,**
**जुने जकात घर, तळमजला,**
**शहीद भगतसिंग मार्ग,, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. डी.टी.चाफे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.१९.११.२००७ रोजी अर्ज करुन, मे. मुंबई रेस्टॉरंट आणि बारबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२५.१.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले की, संबंधित कागदपत्र उपलब्ध झाल्यास आपणास कळविण्यांत येईल. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२.२.२००८ च्या पत्रान्वये कळविले की, संबंधित कागदपत्राची पडताळणीकरिता कार्यालयात उपस्थित रहाण्याबाबत कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.३१.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, मे. मुंबई रेस्टॉरंट आणि बारबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती उपलब्ध दिली असल्याचे अपिलकाराने सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र पडताळणीकरिता उपलब्ध करुन द्यावेत. त्यानंतर मागणीप्रमाणे अपिलकारास उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८१०/०२**

**श्री. ज. सु. बांदोडकर,** **------ अपीलकर्ता**
**१९, गुरुप्रसन्न को.ऑप.हौसिंग सोसा.लि.**
**४ था मजला, सेंट फ्रान्सिस रोड,**
**विलेपार्ले (प.), मुंबई- ४०० ०५६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**संचालक, (अभियांत्रिकी सेवा आणि प्रकल्प),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**विस्तारीत इमारत, ३ रा मजला, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता,**
**इमारत प्रस्ताव, पश्चिम उपनगरे,**
**आर.के. पाटकर मार्ग, वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. ज. सु. बांदोडकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता, इमारत प्रस्ताव, पश्चिम उपनगरे, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२९.५.२००७ रोजी अर्ज करुन, अपिलकाराने गुरुप्रसन्न को.ऑप.हौ.सोसायटी लि.च्या इमारत प्रस्तावाच्या फाईलची पडताळणी करण्याकरिता मागणी केली होती.

अपिलकाराने मागितलेल्या माहिती संबंधीची कागदपत्र उपलब्ध होत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.१७.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता, इमारत प्रस्ताव, पश्चिम उपनगरे, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अपिलकाराने गुरुप्रसन्न

को. ऑप.हौ.सोसायटी लि.च्या इमारत प्रस्तावाच्या फाईलची पडताळणी करण्याकरिता मागणी केली होती. गुरुप्रसन्न को.ऑप.सोसायटीच्या निवासी इमारतीतील तळमजल्यावर दुकानाच्या गाळयास महापालिकेने मंजुरी दिली किंवा नाही याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहितीची मागणी केली. मागणी केलेल्या माहिती संबंधीची नस्ती अपिलकारास पडताळणी करण्याकरिता जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन दिली होती. त्यानंतर मागणीप्रमाणे कागदपत्र जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास यापूर्वीच दिली आहेत. अपिलकारास पुन्हा फाईलचे निरीक्षण करावयाचे असल्यास फाईल उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिका-यांनी मागणी प्रमाणे अर्ध्किच्या कागदपत्राच्या छायाप्रती द्याव्यात असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास कळविले आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीत कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. याबाबत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८११/०२**

**श्री. चेतन कोठारी,** **------ अपीलकर्ता**
**३०३, अंजली बिल्डिंग,**
**फ्रेंच ब्रिज, ऑपेरा हाऊस, मुंबई- ४०० ००७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता (कमर्शियली साऊथ),**
**बी.ई.एस.टी.इलेक्ट्रीक हाऊस, २ रा मजला,**
**सिनियर ए.ओ.एस. कार्यालयासमोर आणि मराठी विभाग,**
**कुलाबा, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (कन्झुमर्स) एस.**
**३ रा मजला, विद्युत भवन,**
**जी.टी.हॉस्पिटलसमोर, टिळक रोड,**
**पाठकवाडी, मुंबई- ४०० ००२.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. चेतन कोठारी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,विद्युत भवन. जी.टी.हॉस्पिटलसमोर, मुंबई, यांच्याकडे दि.६.६.२००७ रोजी अर्ज करुन, विद्युत मीटर क्र.०६२४६२९ चा वीज पुरवठा दि.१५.२.२००७ पासून खंडीत केलेला असताना चुकीचे विद्युत देयक देत असल्याबाबत अनुषंगिक आठ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.५.७.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,विद्युत भवन. जी.टी.हॉस्पिटलसमोर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, विद्युत मीटर क्र.०६२४६२९ चा वीज पुरवठा दि.१५.२.२००७ पासून खंडीत केलेला असताना चुकीचे विद्युत देयक देत असल्याबाबत अनुषंगिक आठ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. विद्युत मीटर करिता फिक्स अशी रु.१५०/- एचढी रक्कम मार्च, २००७ करिता आकारल्याचे, त्यानंतर रु.६७.८० एवढे क्रेडिट दिले असल्याचे विद्युत देयकावरुन दिसून येते अशी जन माहिती अधिका-यांनी दि.५.७.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली असल्याचे सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८०९/०२**

**श्री. चंद्रकांत बाळू कोयंडे,** **------ अपीलकर्ता**
**१४, भगवती निवास, समर्थनगर,**
**क्वारी रोड, भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनियंत्रक,**
**शिधावाटप यांचे कार्यालय, ई परिमंडळ,**
**चंचल स्मृती, १ ला मजला,**
**वडाळा, मुंबई- ४०० ०३१.**

**जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,**
**शिधावाटप यांचे कार्यालय, ई परिमंडळ,**
**चंचल स्मृती, १ ला मजला,**
**वडाळा, मुंबई- ४०० ०३१. .** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. चंद्रकांत बाळू कोयंडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, ई परिमंडळ, वडाळा, मुंबई, यांच्याकडे दि.१६.३.२००७ रोजी अर्ज करुन, श्री. देवेंद्र केशरीनाथ केणी यांच्या शिधापत्रिका क्र.०७०८०८४ बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास श्री.देवेंद्र केशरीनाथ केणी यांच्या शिधापत्रिकेबाबत माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन दि.८.६.२००७ रोजी आदेश पारित करुन जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन अपील निकालात काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी, ई परिमंडळ, वडाळा, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री. देवेंद्र केशरीनाथ केणी यांच्या शिधापत्रिका क्र.०७०८०८४ बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे..

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२०५/०२**

**श्री. संजय देवराम निकुंबे, ------ अपीलकर्ता**
**१७/१४, वरळी पोलीस कॅम्प,**
**सर पोचखानवाला रोड,वरळी, मुंबई- ४०० ०३०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपसचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ००१. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. संजय देवराम निकुंबे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई-०१ यांच्याकडे दि.१२.९.२००७ रोजी अर्ज करुन, अेसीबी सीआर क्र.३३/०२ मधील आरोपी फारुक काडगे यांचेकडून जप्त केलेली हार्डडिक्स (निरीक्षणार्थ) व त्यामध्ये उपलब्ध असलेल्या तपशिलाची/अहवालाबाबत एकूण १० मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.१.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२.४.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई-०१, यांच्याकडे अर्ज करुन, अेसीबी सीआर क्र.३३/०२ मधील आरोपी फारुक काडगे यांचेकडून जप्त केलेली हार्डडिक्स (निरीक्षणार्थ) व त्यामध्ये उपलब्ध असलेल्या तपशिलाची/अहवालाबाबत एकूण १० मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली मुद्दा क्र.१ ते ६ मुद्दयांबाबतची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आहे व प्रकरण चौकशीखाली असल्याने माहिती देता येत नसल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.१.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अर्जातील मुद्दा क्र.७, ८, ९ व १० याबाबतची अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली आहे. मुद्दा क्र.१ ते ३ बाबतची माहिती ही गुन्हयासंदर्भात चौकशी चालू असताना इतर संस्थांनी माहिती गोळा केली होती व ती चौकशीशी निगडित आहे. मुद्दा क्र.४ ते ६ संदर्भातील माहितीसुध्दा चौकशीशी निगडित आहे. असे दि.२.४.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशात नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकाराचे अपील फेटाळले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२०६/०२**

**श्री. बाळकृष्ण गणपत शिंदे,** **------ अपीलकर्ता**
**१/१४, घाटकोपर पोलीस क्वॉर्टर्स,**
**चिटानगर, घाटकोपर, (प.) मुंबई- ४०० ०८६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपसचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. बाळकृष्ण गणपत शिंदे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई-०१ यांच्याकडे. अर्ज करुन, एसीबी सीआर क्र.३३/०२ मधील आरोपी फारुख काडगे यांचेकडून जप्त केलेली हार्डडिस्क (निरीक्षणार्थी) व त्यमध्ये उपलब्ध असलेल्या तपशिलाची/अहवालाबाबत एकूण १० मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२५.१.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२७.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२.४.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ६.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई-०१, यांच्याकडे अर्ज करुन, एसीबी सीआर क्र.३३/०२ मधील आरोपी फारुक काडगे यांचेकडून जप्त केलेली हार्डडिक्स (निरीक्षणार्थ) व त्यामध्ये उपलब्ध असलेल्या तपशिलाची/अहवालाबाबत एकूण १० मुद्दयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेली मुद्दा क्र.१ ते ६ मुद्दयांबाबतची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आहे व प्रकरण चौकशीखाली असल्याने माहिती देता येत नसल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.१.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अर्जातील मुद्दा क्र.७, ८, ९ व १० याबाबतची अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली आहे. मुद्दा क्र.१ ते ३ बाबतची माहिती ही गुन्हयासंदर्भात चौकशी चालू असताना इतर संस्थांनी माहिती गोळा केली होती व ती चौकशीशी निगडित आहे. मुद्दा क्र.४ ते ६ संदर्भातील माहितीसुध्दा चौकशीशी निगडित आहे. असे दि.२.४.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशात नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकाराचे अपील फेटाळले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२१९/०२**

**श्री. दिपक नलावडे,** **------ अपीलकर्ता**
**२/५, के.के.मोदी चाळ, ,**
**टी.जे.रोड, शिवडी, मुंबई- ४०० ०१५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग,**
**२ रा मजला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,**
**परेल नाका, परेल, मुंबई- ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग,**
**२ रा मजला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,**
**परेल नाका, परेल, मुंबई- ४०० ०१२.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. दिपक नलावडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.५.२००८रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग, परेल नाका, परेल, मुंबई, यांच्याकडे दि. १७.१२.२००७ रोजी अर्ज करुन, टी.जे.रोड, शिवडी (प.) मुंबई येथील स्टॅटर्ड मिलच्या समोरील के.के.मोदी चाळ येथील करण्यात येत असलेल्या दुरुस्तीच्या बांधकामाबाबतची एकूण ८ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१२.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती देण्याबाबत दि.२५.३.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग, परेल नाका, परेल, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, टी.जे.रोड, शिवडी (प.) मुंबई येथील स्टॅटर्ड मिलच्या समोरील के.के.मोदी चाळ येथील करण्यात येत असलेल्या दुरुस्तीच्या बांधकामाबाबतची एकूण ८ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. तत्कालिन जन माहिती अधिकारी, मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.८६/२००६ मध्ये दिलेल्या आदेशानुसार अतिक्रमण काढून टाकण्याच्या कामात व्यस्त राहिल्यामुळे विहित कालावधीत अपिलकारास माहिती देऊ शकले नाहीत. अपिलकाराने मागणी केलेली माहिती तयार करुन सदर माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत अपिलकारास दुरध्वनी वरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु संपर्क झाला नसल्याने माहिती देता आली नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची जन माहिती अधिका-यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२२०/०२**

**श्री. गणेश के. कोपले,** **------ अपीलकर्ता**
**४/६६, गीतांजली, समता नगर,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपाध्यक्ष आणि सीईओ, म्हाडा,**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अन्वेषण अधिकारी, दक्षता विभाग,**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. गणेश के.कोपले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.११.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अन्वेषण अधिकारी, दक्षता विभाग, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि.२७.१.२००६ रोजी अर्ज करुन, आदेश क्र.व्हीपी-डब्लू आर क्र.६७/१६-३-२०००/सीओ/एमबी आणि दक्षता पथकाने म्हाडातील भ्रष्टाचाराबाबत केलेल्या चौकशी अहवालाची प्रत मागितली होती.

म्हाडामध्ये गाळे हस्तांतरण व इतर गैरप्रकारात भ्रष्टाचार होत असल्याबाबतच्या तक्रारीची चौकशी दक्षता विभागाकडून झाली असून, चौकशी अहवालाची प्रत पुरविण्यास दक्षता विभाग तयार आहे. माहितीपोटी रु.८२/-इतके शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.२.२००६ च्या पत्राने कळविले. माहितीपोटी रु.८२/-इतकी रक्कम भरुनही दक्षता अधिका-यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.३.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दि. १२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अन्वेषण अधिकारी, दक्षता विभाग, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुनआदेश क्र.व्हीपी-डब्लू आर क्र.६७/१६-३-२०००/सीओ/एमबी आणि दक्षता पथकाने म्हाडातील भ्रष्टाचाराबाबत केलेल्या चौकशी अहवालाची प्रत मागितली होती. अपिलातील कागदपत्राची तपासणी केली असता माहितीपोटी अपिलकाराने रु.८२/-इतक्या रकमेचा भरणा करुनही अपिलकारास दक्षता विभागाने केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अपिलकारास दिली नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१००६/०२**

**श्री. संजय गंगाराम पवार,** **------ अपीलकर्ता**
**हनुमान मित्रमंडळ, अंबा चाळवाडी,**
**जहाँगीर मैरवानजी पथ,परळ, मुंबई- ४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा माळा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा माळा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. संजय गंगाराम पवार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१, यांच्याकडे दि.२६.७.२००७ रोजी अर्ज करुन, अंबाचाळीतील रहिवाशंच्यावतीने सचिव, गृहनिर्माण भवन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार अर्ज सादर केला असता सदर अर्ज त्यांच्याकडून दि.२०.२.२००७ रोजी जन माहिती अधिका-यांकडे चौकशीसाठी पाठविण्यांत आला. मात्र याबाबत जन माहिती अधिका-यांकडून काय कार्यवाही करण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२८.८२००७ च्या पत्रान्वये अपिलकाराने मागणी केलेली माहिती प्रश्न स्वरुपाची असल्याने माहिती या संज्ञेत बसत नाही. यामुळे माहिती पुरविता येत नाही असे अपिलकारास कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२७.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२९.९.२००७ रोजी आदेश पारित केले. अपिलकारास मुदतीत उत्तर देण्यात आले. अर्जात समाविष्ट नसलेल्या बाबींसंबंधी अपिलकाराने स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार करणेबाबत अपिलकारास कळविण्यांत आले, असे नमूद करुन प्रथम अपिलीय

अधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१, यांच्याकडे अर्ज करुन, अंबाचाळीतील रहिवाशंच्यावतीने सचिव, गृहनिर्माण भवन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार अर्ज सादर केला असता सदर अर्ज त्यांच्याकडून दि.२०.२.२००७ रोजी जन माहिती अधिका-यांकडे चौकशीसाठी पाठविण्यांत आला. मात्र याबाबत जन माहिती अधिका-याकडून काय कार्यवाही करण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. दि.९.२.२००७ रोजीच्या परिशिष्ट-२ च्या यादीची पुनर्पडताळणी करण्यास सहाय्यक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग यांस केलेल्या आदेशानुसार सदर पुनर्पडताळणीचे काम चालू आहे. मात्र सदर जागेवर दि.१.१.१९९५ पूर्वीपासून वास्तव्यास असणारे, ज्यांची शासनामार्फत झोपडी सर्वेक्षण गणना झाली आहे अशा झोपडीधारकांना सदर योजनेत सामावून घेतले नसल्याने त्यांना या योजनेत सामावून घेण्यास त्यांच्याकडील पुराव्यांची खातरजमा करण्याकरिता सदर कागदपत्रे जन माहिती अधिका-याकडे सादर करावीत की, सहाय्यक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग यांच्याकडे सादर करावीत याची शहानिशा करुन माहिती देण्याबाबत विनंती केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२८.८.२००७ च्या पत्रान्वये दिलेले उत्तर समर्पक असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२९.९.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११०५/०२**

**श्री. प्रमोद राजाराम पवार,** **------ अपीलकर्ता**
**१२०/बी/६०, राजगड, एमयुटीपी, एसआरए,**
**टाटानगर रोड, मानखुर्द, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह महानगर आयुक्त,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. प्रमोद राजाराम पवार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.११.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१, यांच्याकडे दि.१८.१२.२००७ रोजी अर्ज करुन, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, लल्लूभाई कंपाऊंड, आर ॲन्ड आर पुनर्वसन व पुनर्वसाहत, मानखूर्द साईट संपूर्ण कॉलनीचे परिशष्ट-२ च्या ख-या प्रमाणित नक्कलची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली अर्जातील ३-ब व ३-क बद्दल माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नाही मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मानखूर्द येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजना, मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, मुंबई यांनी मंजूर केलेली असल्याने कार्यालयात माहिती उपलब्ध नाही असे दि.२३.१.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी कळविले. दरम्यान, अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१, यांच्याकडे अर्ज करुन, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, लल्लूभाई कंपाऊंड, आर ॲन्ड आर पुनर्वसन व पुनर्वसाहत, मानखूर्द साईट संपूर्ण कॉलनीचे परिशिष्ट-२ च्या ख-या प्रमाणित नक्कलची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलकारास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती अन्य प्राधिकरणाशी संबंधित असल्यास अपिलकाराचा माहितीचा अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमातील कलम-६(एक) अनुसार हस्तांतरित करुन अपिलकाराने मागितलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधितांना कळवावे व सदर बाब अपिलकारास अवगत करावी. सदर कार्यवाही हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत करण्यात यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११०३/०२**

**श्री. मन्सूर हुसेन अहमद,** **------ अपीलकर्ता**
**सहाय्यक अभियंता, ३ रा मजला,**
**प्रकाशगड, एम.एस.ई.बी.**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त झोन-२,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ईस्ट वॉर्ड,**
**आझाद रोड, अंधेरी (पूर्व),मुंबई- ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक करनिर्धारक आणि जिल्हाधिकारी,**
**के/ईस्ट वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**आझाद रोड, अंधेरी (पूर्व),मुंबई- ४०० ०६९.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. मन्सूर हुसेन अहमद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक आणि जिल्हाधिकारी, के/ईस्ट वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, आझाद रोड, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे दि.१४.१.२००८ रोजी अर्ज करुन, वॉर्ड क्र.केई-४२६९ (४) प्लॉट क्र.२ येथील के.जी.एस.संस्थेचे मंदार अपार्टमेंटच्या मालमत्तेच्या निर्धारित कर व कार पार्कींगबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१९.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास पूर्वी दिलेल्या उत्तराची प्रत तात्काळ द्यावी. अधिक माहिती कागदपत्रावरुन चार दिवसाचे आत

उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक आणि जिल्हाधिकारी, के/ईस्ट वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, आझाद रोड, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वॉर्ड क्र.केई-४२६९ (४) प्लॉट क्र.२ येथील के.जी.एस.संस्थेचे मंदार अपार्टमेंटच्या मालमत्तेच्या निर्धारित कर व कार पार्कींगबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. मंदार अपार्टमेंट येथे १० कार पार्किंगचा प्रस्ताव होता. प्रत्यक्षात चार कार पार्किंगचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. कार पार्किंगच्या प्रस्तावा साठी आकारण्यात आलेली अधिकची रक्कम परत करण्यात यावी किंवा समायोजित करण्यांत यावी. याबाबत सहाय्यक करनिर्धारण आणि जिल्हाधिकारी यांनी याबाबतची नस्ती तयार करुन सदर प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशमः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०९५/०२**

**श्री. संजय गंगाराम पवार,** **------ अपीलकर्ता**
**हनुमान मित्रमंडळ, अंबा चाळवाडी,**
**जहाँगीर मैरवानजी पथ,परळ, मुंबई- ४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा माळा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी सहाय्यक निबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा माळा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. संजय गंगाराम पवार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१, यांच्याकडे दि. १२.९.२००७ रोजी अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या महालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था, शिवडी विभाग याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.१०.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास मााहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दि.१२.९.२००७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती विहित कालावधीत दिली नाही. उशिराने दि.२३.१०.२००७ रोजी माहिती दिली. दरम्यानच्या कालावधीत अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१५.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१३.१२.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकारास माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिका-या कडून कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही, अभिप्राय स्वरुपाची माहिती माहिती या संज्ञेत बसत नसल्यामुळे अपिलकार यांच्या विनंतीचा विचार करता येत नाही असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२०.१२.२००७ रोजी आदेश पारित करुन अपील निकाली काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य

माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१, यांच्याकडे अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या महालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था, शिवडी विभाग याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही, विलंबाने दि.२३.१०.२००७ रोजी माहिती पुरविण्यात आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. ५० दिवसानंतर सुनावणी आयोजित केली असे अपिलकाराने सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी सर्वंकष बार्बीचा विचार करता जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही विहित कालावधीत केली नसल्याचे दिसून येते. दोन्ही अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ ची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, विलंबास जन माहिती अधिकारी हे जबाबदार असल्याने त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष भेटून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११०२/०२**

**श्री. एन. बी. म्हात्रे,** **------ अपीलकर्ता**
**२२/७, ओशिवरा साग अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो.**
**न्यू लिंक रोड, कामत क्लबजवळ,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग,**
**प्लॉट क्र.९६, भाऊ दाजी मार्ग,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग,**
**प्लॉट क्र.९६, भाऊ दाजी मार्ग,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. एन.बी.म्हात्रे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग, भाऊ दाजी मार्ग, माटुंगा, मुंबई, यांच्याकडे दि.८.९.२००७ रोजी नागरी सुविधा केंद्रातील सॅप प्रणाली तांत्रिक बिघाडामुळे कार्यरत नसल्यामुळे रोख रक्कम स्वीकारली नसल्याबाबत अर्ज सादर केला होता.

याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.१०.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती दिशाभूल करणारी असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१४.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.१.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली व दि.१०.१.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग, भाऊ दाजी मार्ग, माटुंगा, मुंबई, यांच्याकडे नागरी सुविधा केंद्रातील सॅप प्रणाली तांत्रिक बिघाडामुळे कार्यरत नसल्यामुळे रोख रक्कम स्वीकारली नसल्याबाबत अर्ज सादर केला होता. सदर अर्जास जन माहिती अधिका-यांनी दि.५.१०.२००७ च्या पत्राने सविस्तर उत्तर दिले. सदर अर्जास उत्तर देण्याची कार्यवाही सुरु असतानाच अपिलकाराने दि.१४.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. बृहन्मुंबई महापालिकेत सॅप प्रणाली एप्रिल, २००७ पासून प्रथमच कार्यान्वित करण्यांत आली. विभागामार्फत सदर प्रणाली राबविताना ब-याचशा बाबी या विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्राबाहेरील असल्यामुळे त्या बाबीवर नियंत्रण ठेवणे विभाग कार्यालयास शक्य नव्हते. तरीही नागरी सुविधा केंद्रामार्फत जास्तीत जास्त सुविधा देण्याचा प्रयत्न विभाग कार्यालयाकडून करण्यात आला असल्याचे नमूद करुन, दि.१०.१.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील निकाली काढले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११२६/०२**

**श्रीमती आनंदी रामचंद्रन,** **------ अपीलकर्ता**
**बिल्डिंग २९/अे-२२, तक्षशिला, २ रा मजला,**
**महाकाली केव्हज रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के /पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०६९.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्रीमती आनंदी रामचंद्रन, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, के /पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे दि. ०.१.०१.२००८ रोजी अर्ज करुन, अनधिकृत बांधकामाबाबत मनपा अधिनियमातील कलम ३५१ अनुसार अनधिकृत बांधकामास नोटीस देणेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मााहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले. सदर आदेशाने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२७.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अनधिकृत बांधकामाबाबत मनपा अधिनियमातील कलम ३५१ अनुसार अनधिकृत बांधकामास नोटीस देणेबाबत अनुषंगिक

माहिती मागितली होती. अपिलकाराने संस्थेतील इमारतीतील अनधिकृत बांधकामाबाबत तक्रार केली होती. इमारत क्र.२९ मध्ये दुरुस्तीचे काम करण्यात येत होते. सदर दुरुस्ती कामास मनपा अधिनियमानुसार परवानगी घेणे आवश्यक आहे. यामुळे सदर अनधिकृत बांधकामाचे जन माहिती अधिका-यांनी निरीक्षण करणेबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१०.४.२००७ रोजी आदेश पारित केले. दरम्यानच्या कालावधीत मनपा अधिनियमातील कलम-३५१ अनुसार अनधिकृत बांधकामाबाबत नोटीस देवून आवश्यक ती कारवाई करणेबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२८.९.२००७ रोजी आदेश पारित केले असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार अनधिकृत बांधकामाविरुध्द नोटीय निर्गमित करुन पुढील केलेल्या कार्यवाहीबाबत अपिलकारास माहिती दिली असल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास अनधिकृत बांधकामाबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१९/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८४२/०२**

**श्री.सूर्यकांत गंगाराम चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**३९/२/३, नवजीवन हौसिंग सोसायटी,**
**इंदिरानगर पोलीस चौकीसमोर,**
**सर्विस रोड, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच /पूर्व विभाग,**
**प्रभात कॉलनी, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.**

**जन माहिती अधिकारी म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, एच /पूर्व विभाग, प्रभात कॉलनी, सांताक्रूझ, मुंबई, यांच्याकडे दि. १६.६.२००७ रोजी अर्ज करुन, नेहरु रोड, शांतिकुंज व डॉ.व्होरास डेंटल केअर सेंटर यांच्या मध्यभागी असलेल्या २४/१९०, जुने आनंद नगर या ठिकाणी चालू असलेल्या व्यावसायिक तळमजला + पहिल्या मजल्याच्या बांधकामाविषयीची माहिती साक्षांकित प्रतीसह मिळणेबाबत मागणी होती केली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मााहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२०.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका,एच /पूर्व विभाग, प्रभात कॉलनी, सांताक्रूझ, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, नेहरु रोड, शांतिकुंज व डॉ.व्होरास डेंटल केअर सेंटर यांच्या मध्यभागी असलेल्या २४/१९०, जुने आनंद नगर या ठिकाणी चालू असलेल्या व्यावसायिक तळमजला + पहिल्या मजल्याच्या बांधकामाविषयीची माहिती साक्षांकित प्रतीसह मिळणेबाबत मागणी होती केली होती. जन माहिती अधिका-यांनी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास एच/पूर्व मनपा कार्यालयाच्या हद्दीत, प्रभात कॉलनी, सांताक्रूझ, मुंबई या ठिकाणी चालू आलेल्या व्यावसायिक बांधकामाबाबत माहिती दिली नसल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की,जन माहिती अधिकारी,बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग, प्रभात कॉलनी,सांताक्रूझ (पूर्व), मुंबई यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७८२/०२**

**श्री. देवेंद्र एम शहा ,** **------ अपीलकर्ता**
**१३२- डी, १३, पहिला मजला,**
**भगतवाडी, भोलेश्वर रोड, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग,**
**चंदनवाडी, मुंबई-४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग,**
**चंदनवाडी, मुंबई-४०० ००२.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. देवेंद्र एम शहा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, चंदनवाडी, मुंबई, यांच्याकडे दि.१८.४.२००७ रोजी अर्ज करुन, १३२-डी, भगतवाडी, भुलेश्वर येथील मालमत्तेबाबत (रुम बाबत) अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुद्दा क्र.१ व ३ बाबत माहिती दिली. जनमााहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.५.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. दरम्यान सहाय्यक अभियंता तथा जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.२५.५.२००७ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली. पूर्ण माहिती विहित कालावधीतनंतर दिली, प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, चंदनवाडी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, १३२-डी, भगतवाडी, भुलेश्वर येथील मालमत्तेबाबत (रुम बाबत) अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती सहाय्यक अभियंता, तथा जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.५.२००७ च्या पत्राने विलंबाने दिली असल्याचे दिसून येते. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आतआयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७८३/०२**

**श्री. देवेंद्र एम शहा ,** **------ अपीलकर्ता**
**१३२- डी, १३, पहिला मजला,**
**भगतवाडी, भोलेश्वर रोड, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग,**
**चंदनवाडी, मुंबई-४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक,(अनुज्ञापन),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग,**
**चंदनवाडी, मुंबई-४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी ,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. देवेंद्र एम शहा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, चंदनवाडी, मुंबई, यांच्याकडे दि.९.४.२००७ रोजी अर्ज करुन, निवासी इमारतीत सोन्या चांदीचे दागिने बनविणा-या व्यापा-यांचे नाव, पत्ते, निरीक्षण अहवालाची प्रत, व्यापा-याकडून ज्वलंत रसायनाचा करण्यात येणारा वापर याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.९.५.२००६ च्या पत्रान्वये मााहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२४.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल

केले. सदर अपिलावर दि.१७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग, चंदनवाडी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, निवासी इमारतीत सोन्या चांदीचे दागिने बनविणा-या व्यापा-यांचे नाव, पत्ते, निरीक्षण अहवालाची प्रत, व्यापा-याकडून ज्वलंत रसायनाचा करण्यात येणारा वापर याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्या वेळी लेखी निवेदन सादर करुन, असे प्रतिपादन केले की, अपिलकाराच्या तक्रारीसंदर्भात भगतवाडी येथील चारही इमारतीमध्ये कारवाई करण्यांत आली. त्यावेळेस एक अनधिकृत सुवर्ण कारागीर आस्थापनावर कारवाई महानगरपालिका अधिनियम, ३९४ अन्वये करण्यांत आली. या इमारतीमध्ये अन्य कोठेही गॅस सिलेंडर आढळून आले नाही. दि,१.१०.२००८ पासून लोकमान्य टिळक मार्ग पोलीस स्टेशनच्या मदतीने सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने), वरिष्ठ अनुज्ञापन निरीक्षक व वरिष्ठ निरीक्षक (दुकाने व तत्सम संस्था) असे स्वतंत्र पथक निर्माण करुन, रोज अनधिकृत सुवर्ण कारागिरांच्या आस्थापनाविरुध्द संपूर्ण भुलेश्वर व काळबादेवी परिसरात कारवाई करण्यांत येते. या कारवाईमध्ये आतापर्यंत ५३ गॅस सिलिंडर जप्त करण्यात आली असल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१७.११.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२६२/०२**

**श्री. अशोक नरेश कुंचीकोरवे,** **------ अपीलकर्ता**
**एम.पी.नगर, ढोरवाडा, बसवेश्वर क्रॉस रोड,**
**रुम नं.बी/८०, रामा केबलवाल्याच्या मागे,**
**धारावी, मुंबई- ४०० ०१७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सिनियर पर्सनल ऑफीसर,**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कर्मचारीय अधिकारी (मावक),**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम,**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, मुंबई-४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. अशोक नरेश कुंचीकोरवे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कर्मचारीय अधिकारी, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, मुंबई, यांच्याकडे दि.८.४.२००८ रोजी अर्ज करुन, श्री. सम्राट भिकाजी कदम यांचे मासिक वेतन बी.एस.टी.मध्ये कोणत्या पदावर, कोणत्या विभागात कार्यरत आहेत याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी उक्त अधिनियमातील कलम ८ (जी), (एच), आणि (जे) अनुसार माहिती नाकारली. या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ०४.६.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अाेिका-यांनी अपील फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कर्मचारीय अधिकारी, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री. सम्राट भिकाजी कदम यांचे मासिक वेतन बी.एस.टी.मध्ये कोणत्या पदावर, कोणत्या विभागात कार्यरत आहेत याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम, ४ (१), (ख) मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचा-यांची कार्य व कर्तव्ये यांचा तपशील, त्यांना मिळणारे मासिक वेतन इ. बाबतची माहिती देणे आवश्यक आहे. यामुळे अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७८०/०२**

**श्री. नेहल के. विरा,** **------ अपीलकर्ता**
**२३९/६२१२ आनंद भैरवी कौ.ऑ.हौ.सो.लि.**
**पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपमुख्य अभियंता व सहमुख्य अधिकारी,**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. नेहल के.विरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता व सहमुख्य अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई, यांच्याकडे दि. १६.३.२००७ रोजी अर्ज करुन, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथील इमारत क्र.२३२ ते २३७ आणि २३८ ते २४३ मधील मोकळया जागेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती कार्यकारी अभियंता, गृहनिर्माण घाटकोपर विभाग यांचेशी संबंधित असलयाने अपिलकाराचा अर्ज त्यांच्याकडे पाठविला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.६.२००७ च्या पत्राने कळविले. अपिलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र.४, ५ व ६ बाबत माहिती देण्याकरिता एक महिन्याचा कालावधी वाढवून देण्याबाबत तसेच अर्जातील मुद्दा क्र.१, २, ३ व ७ वास्तुशास्त्रज्ञ शाखा/ एमबी आणि लेखा शाखा/एमबी शी संबंधित असल्याने संबंधितांकडून माहिती घेण्याबाबत तसेच अपिलकाराने मागितलेली माहिती धोरणात्मक स्वरुपाची असल्याने याबाबत ज्यावेळी धोरण निश्चित करण्यात येईल त्यानुसार अपिलकारास माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.२१.७.२००७ च्या पत्राने कळविले. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.८.२००७ च्या पत्रान्वये मुद्दा क्र.४, ५, ६

आणि ८ मुद्दयाबाबत माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३०.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता व सहमुख्य अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथील इमारत क्र.२३२ ते २३७ आणि २३८ ते २४३ मधील मोकळया जागेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने ज्या कॉलनीच्या बांधकामाबाबत माहिती मागितली आहे ते बांधकाम ३० वर्षापूर्वीचे असल्याने संबंधित कागदपत्र आढळून येत नाहीत. सदर संस्थेमध्ये मंदिर बांधकामासाठी परवानगी देण्यात आलेली नाही. मुद्दा क्र.८ बाबत मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळाने धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर माहिती देता येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.७.२००७ च्या पत्रान्वये कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी त्यांच्याशी संबंधित मुद्दयाची माहिती तसेच मागणी अर्जातील ज्या अन्य मुद्दयांचा संबंध इतर शाखांशी असेल त्यांची मदत घेऊन माहिती प्राप्त करुन घ्यावी. हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अर्जातील मुद्दा क्र.१ ते ६ बाबत एकत्रित माहिती अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२५८/०२**

**श्री. शिरीष गोतेच्छा, ------ अपीलकर्ता**
**अध्यक्ष, मालाड व्यापारी संघ,**
**३, गोतेच्छा इस्टेट,**
**मालाड (प.) मुंबई- ४०० ०६४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**संचालक, (ई.एस.ॲन्ड पी.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**विस्तारित इमारत, ३ रा मजला,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (मेन),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी /नॉर्थ वॉर्ड,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी,**
**मालाड,(प.), मुंबई- ४०० ०६४. ------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. शिरिष गोतेच्छा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ वॉर्ड, मालाड, मुंबई, यांच्याकडे दि. २८.२.२००८ आणि ०४.३.२००८ रोजी अर्ज करुन, स्टेशन रोड व आनंद रोड येथील हनुमान मंदिराच्या क्षेत्रफळाबाबत, रस्ता रुंदीकरणाकरिता सदर मंदिर पाडण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

हनुमान मंदिर फार पूर्वीपासून अस्तित्वात असून, जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयाने सदर मंदिराच्या दुरुस्तीकरिता, नुतनीकरणाकरिता परवानगी दिली नसल्याचे दि.११.३.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्यास अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१०.४.२००८ व दि.२८.४.२००८ रोजी दोन अपील दाखल केली. सदर अपिलाबाबत केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम २ अनुसार अपिलकाराने अर्जात नमूद केलेल्या मुद्दयावर जन माहिती अधिका-याचे अभिप्राय मागता येत नाहीत असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि. ८.५.२००८ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले

नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जिल्हा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ वॉर्ड, मालाड, मुंबई, यांचेकडे अर्ज करुन, स्टेशन रोड व आनंद रोड येथील हनुमान मंदिराच्या क्षेत्रफळाबाबत, रस्ता रुंदीकरणाकरिता सदर मंदिर पाडण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.११ मार्च,२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि. ८.५.२००८ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली. तसेच अपिलकाराने अर्जात उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत उक्त अधिनियमानुसार अभिप्राय मागता येत नाहीत असेही दि. ८.५.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अर्जावर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२६०/०२**

**श्री. शिरीष गोतेच्छा, ------ अपीलकर्ता**
**अध्यक्ष, मालाड व्यापारी संघ,**
**३, गोतेच्छा इस्टेट,**
**मालाड (प.) मुंबई- ४०० ०६४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/वेस्ट वॉर्ड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी /नॉर्थ वॉर्ड,**
**मालाड,(प.), मुंबई- ४०० ०६४. ------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. शिरिष गोतेच्छा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ वॉर्ड, मालाड, मुंबई, यांच्याकडे दि.२५.४.२००८ रोजी अर्ज करुन, साईनाथ रोड, आनंद रोड आणि स्टेशन रोडच्या नकाशाची प्रत, दुरुस्ती अंतर्गत असलेल्या पाच दुकानास कलम ३१४ अन्वये दिलेल्या नोटीसीची प्रत, एम.एम. मिठाईवाला, दिल्ली स्वीट यांना दिलेली कलम ३१४ ची नोटीसीची प्रत इ. माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधी माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जिल्हा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ वॉर्ड, मालाड, मुंबई, अर्ज करुन, साईनाथ रोड, आनंद रोड आणि स्टेशन रोडच्या नकाशाची प्रत, दुरुस्ती अंतर्गत असलेल्या पाच दुकानास कलम ३१४ अन्वये दिलेल्या नोटीसीची प्रत, एम.एम. मिठाईवाला, दिल्ली स्वीट यांना दिलेली कलम ३१४ ची नोटीसीची प्रत इ. माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सर्व्हे विभागाकडून माहिती गोळा करुन अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२७१/०२**

**श्री. शिरीष गोतेच्छा,** **------ अपीलकर्ता**
**अध्यक्ष, मालाड व्यापारी संघ,**
**३, गोतेच्छा इस्टेट,**
**मालाड (प.) मुंबई- ४०० ०६४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/वेस्ट वॉर्ड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी /नॉर्थ वॉर्ड,**
**मालाड,(प.), मुंबई- ४०० ०६४.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. शिरिष गोतेच्छा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ वॉर्ड, मालाड, मुंबई, यांच्याकडे दि.२.६.२००८ रोजी अर्ज करुन, आनंद रोड, मालाडच्या रुंदीकरणाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मााहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जिल्हा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ वॉर्ड, मालाड, मुंबई, अर्ज करुन, आनंद रोड, मालाडच्या रुंदीकरणाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/११/२००८.**

**.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२६४/०२**

**श्री. पी. जी. मांद्रेकर,** **------ अपीलकर्ता**
**९, रचना, मास्टर विनायक क्रॉस रोड,**
**वांद्रे, (प.) मुंबई- ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३),**
**पश्चिम उपनगरे, गृहनिर्माण भवन,**
**तळमजला, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**को.ऑपरेटीव्ह सोसायटी, एच/डब्लू वॉर्ड,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. पी. जी. मांद्रेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, को.ऑप. सोस. एच/डब्लू वॉर्ड, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि.४.१२.२००७ रोजी अर्ज करुन, रचना सहकारी गृहनिर्माण संस्था, सोमनाथ लेन, वांद्रे (प.) मुंबई या संस्थेच्या समिती सभासदाकडून महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ चा भंग केल्याबाबत करण्यात आलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मााहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.७.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१०.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, को.ऑप. सोस. एच/डब्लू वॉर्ड, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, रचना सहकारी गृहनिर्माण संस्था, सोमनाथ लेन, वांद्रे (प.) मुंबई या संस्थेच्या समिती सभासदाकडून महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ चा भंग केल्याबाबत करण्यात आलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिली नसल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही.या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२६७/०२**

**श्री. विलास मनोहर सोमण,** **------ अपीलकर्ता**
**डायरेक्टर, आयडीयल इन्स्टीटयूट प्रा.लि.**
**१ ला मजला, राघव निवास, २७/२९ पिकेट रोड,**
**आर.एस.सप्रे मार्ग, काळबादेवी, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**संचालक, (अभियांत्रिकी सेवा आणि प्रकल्प),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, ३ रा मजला,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रमुख अभियंता (विकास नियोजन),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, ४ था मजला,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विलास मनोहर सोमण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि.२५.५.२००८ रोजी अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.५८६ आणि सिटी सर्वे क्र.५५१ येथील पेस्टम सागर लेआऊट, एम.वॉर्ड, चेंबूर मुंबई बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती फार जुनी असल्याने माहिती उपलब्ध नसल्याने देता येत नसल्याबाबत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.५.४.२००८ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सिटी सर्वे क्र.५८६ आणि सिटी सर्वे क्र.५५१ येथील पेस्टम सागर लेआऊट, एम.वॉर्ड, चेंबूर मुंबईबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत उपलब्ध करुन दिली नाही. मुख्य अभियंता यांनी अपिलकारास ५.४.२००८ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२६९/०२**

**श्री. मिलिंद श. मुळे,** **------ अपीलकर्ता**
**२८४/१२, बांदेकर सदन,**
**न.चि.केळकर मार्ग, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका उपाआयुक्त,(z III),**
**के/पूर्व वॉर्ड, आझाद रोड, गुंदवली,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका उपाआयुक्त,(z III),**
**के/पूर्व वॉर्ड, आझाद रोड, गुंदवली,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. मिलिंद शरद मुळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका उपआयुक्त (zIII) के/पूर्व वॉर्ड, गुंदवली, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे दि. ७.३.२००८ रोजी अर्ज करुन, नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या रजा रोखीकरणासंबंधीची एकत्रित माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिका-यांकडून उपलब्ध करुन घेण्याबाबत कळवून संबंधित जन माहिती अधिका-यांचे दि.१०.३.२००८ च्या पत्रान्वये पत्ते कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन, दि.१३.५.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन अपिलकाराने प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका उपआयुक्त (zIII) के/पूर्व वॉर्ड, गुंदवली, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या रजा रोखीकरणासंबंधीची एकत्रित माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती अधिक्षक, के/पूर्व विभाग, अधिक्षक, एच/पश्चिम विभाग, अधिक्षक, एच/पूर्व विभाग या कार्यालयाशी संबंधित असून, त्या कार्यालयातील सर्व संबंधित जन माहिती अधिका-यांकडून अपिलकाराने माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२६८/०२**

**श्री. सुमिर मनोहरलाल डेंबला,** **------ अपीलकर्ता**
**अे-२०२, गोदावरी, शांतिवन,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक,**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई,**
**शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई,**
**शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुमिर मनोहरलाल डेंबला, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, शासकीय दंत महाविद्यलाय, सेंट जॉजै हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई, यांच्याकडे दि.२५.२.२००८ रोजी अर्ज करुन, वैद्यकीय पदव्युत्तर सीईटी परिक्षेच्या गेल्या पाच वर्षातील प्रश्नपत्रिकेच्या छायाप्रती तसेच नमुना उत्तर पत्रिकेच्या प्रती इ. बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

मा. उच्च न्यायालयाचा निकाल विचारात घेता अर्जदाराची प्रश्नपत्रिका/ नमुना उत्तर पत्रिकाच्या प्रती उपलब्ध करुन देण्याची मागणी मान्य करता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१३.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २०.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, शासकीय दंत महाविद्यलाय, सेंट जॉजै हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वैद्यकीय पदव्युत्तर सीईटी परिक्षेच्या गेल्या पाच वर्षातील प्रश्नपत्रिकेच्या छायाप्रती तसेच नमुना उत्तर पत्रिकेच्या प्रती इ. बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. मा. उच्च न्यायालयाचा निकाल विचारात घेता अर्जदाराची प्रश्नपत्रिका/ नमुना उत्तर पत्रिकाच्या प्रती उपलब्ध करुन देण्याची मागणी मान्य करता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१३.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पकउत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२१/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९५५/०२**

**श्री. मोहम्मद ताज कुरेशी,** **------ अपीलकर्ता**
**५७, जमनादास बिल्डिंग, २ रा मजला, रुम नं.३०,**
**सोफिया झुबरे रोड, नागपाडा, मुंबई- ४०० ००८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वॉर्ड,**
**पालिराम पथ, अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वॉर्ड,**
**पालिराम पथ, अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. मोहम्मद ताज कुरेशी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वॉर्ड, मुंबई यांच्याकडे दि.३.५.२००७ रोजी अर्ज करुन, श्रीमती मरुफा महम्मद आयुब शेख, ४५०, आदर्श नगर, न्यू लिंक रोड, अंधेरी (प.) मुंबई यांनी अवैधरित्या घराच्या पाठीमागे रिकाम्या जागेत, पक्के बांधकाम, घराची उंची वाढविल्याबाबत आणि निवासी परिसरा व्यापारी कामाकरिता वापरत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलकारास कळविले. यामुळे समाधान न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१८.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १४.८.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली . जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १८.८.२००७ रोजी आदेश पारित करुन अपील निकालात काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १२.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वॉर्ड, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, अवैधरित्या घराच्या पाठीमागे रिकाम्या जागेत, पक्के बांधकाम, घराची उंची वाढविल्याबाबत आणि निवासी परिसर व्यापारी कामाकरिता वापरत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याने जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. सदर बाब योंग्य नाही. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीच्या कागदपत्राचा जाणिवपूर्वक शोध घ्यावा. कागदपत्र उपलब्ध झाल्यास अपिलकारास विनाशूल्क माहिती द्यावी. अन्यथा, कागदपत्र उपलब्ध होत नसल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, के/पश्चिम विभाग यांनी जाणिवपूर्वक निर्णय घेऊन तसे अपिलकारास कळवावे. सदर कारवाई हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत करण्यात यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७६६/०२**

**श्री. गुलाम ख्वाजा हमतुले,** **------ अपीलकर्ता**
**एम.एस.जरीवाला चाळ, ४/३३,**
**हरियाला व्हिलेज, टागोरनगर, ग्रूप नं.४,**
**विक्रोळी (पूर्व), मुंबई- ४०० ०८३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. गुलाम ख्वाजा हमतुले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.१६.७.२००७ रोजी अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे यांनी एस. एस. व्ही. बिल्डरवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मााहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.४.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २५.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे प्रतिपादने म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा झ ोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे यांनी एस. एस. व्ही. बिल्डरवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. पुनर्वसन योजनेचे काम मिळण्यासाठी ३०० चौ.फूट जागेचे लालच देवून काम घेणे आणि सर्वेमध्ये अफरातफर करणे याबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित का ालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२२७/०२**

**श्रीमती अनिता मालचंदानी,** **------ अपीलकर्ता**
**बी-१०६, राहुल क्लासिक बिल्डिंग,**
**काळे कॉलेजसमोर, साईबाबा नगर,**
**बोरीवली (प.) मुंबई- ४०० ०९२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई,**
**६ वा मजला, मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, आर विभाग,**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई,**
**६ वा मजला, मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती अनिता मालचंदानी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, आर विभाग, सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर, फोटै, मुंबई, यांच्याकडे दि.२५.२.२००८ रोजी अर्ज करुन, राहूल क्लासिक को.ऑ. हौ.साोसायटी लि. साईबाबा नगर, बोरीवली (प.), मुंबई या संस्थेच्या कामकाजा संदर्भात विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.०७.०३.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले की, " माहितीच्या अधिकारात कागदपत्राच्या प्रतीची मागणी करणे अभिप्रेत आहे. अपिलकाराने दि.२५.२.२००८ च्या पत्रात अशी मागणी केली नाही. यामुळे अपिलकाराचा अर्ज निकाली काढण्यात आला." यामुळे अपिलकाराने दि.१८.३.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २२.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली.. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, आर विभाग, सहकारी संस्था, मुंबई विभाग,मुंबई मल्होत्रा हाऊस, जीपीओ समोर, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, राहूल क्लासिक को.ऑ. हौ.सोसायटी लि. साईबाबा नगर, बोरीवली (प.), मुंबई या संस्थेच्या कामकाजा संदर्भात विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी विभागीय सहनिबंधक यांच्याकडे दि.२९.१.२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२२८/०२**

**श्री. दिपक अमृतलाल राठोड,** **------ अपीलकर्ता**
**रुम नं.जी-९, पारशी चाळ,**
**नरीमन रोड, विलेपार्ले,(पूर्व) मुंबई- ४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.दिपक अमृतलाल राठोड, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे दि. ३१.१२.२००७ रोजी अर्ज करुन, ओम सिध्दीविनयक इमारतीमधील श्री. पुरुषोत्तम वाघेला, रुम नं.३०३ आणि त्यांना मिळालेले दुकान, श्री. ईश्वर भगवानदास चौहान, रुम नं.११० आणि त्यांना मिळालेले दुकान, श्री. धीरज यशवंत मिस्त्री, रुम नं. १०२ व त्यांना मिळालेले दुकान, अरविंद मोहनलाल मवानी, यांना १०२ व २०३ रुम कोणत्या कारणास्तव मिळाले. दिनेश जीवराज सोलंकी, रुम नं.१०३ व त्यांना मिळालेले दुकान, श्री.संजय शंकर मोडक यांना कोणत्या कारणास्तव रुम मिळाला इ.अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.३०.१.२००८ च्या पत्राने अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २०.२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन, अपिलकाराने मागणी केलेल्या ११ सभासदांच्या पात्रतेसंबंधी आवश्यक ती माहिती अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्यावी असे दि. २६.२.२००८ रोजी आदेश पारित केले. तरीही जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय

अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग, गुंदवली, अंधेरी, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, ओम सिध्दीविनयक इमारतीमधील श्री. पुरुषोत्तम वाघेला, रुम नं.३०३ आणि त्यांना मिळालेले दुकान, श्री. ईश्वर भगवानदास चौहान, रुम नं.११० आणि त्यांना मिळालेले दुकान, श्री. धीरज यशवंत मिस्त्री, रुम नं. १०२ व त्यांना मिळालेले दुकान, अरविंद मोहनलाल मवानी, यांना १०२ व २०३ रुम कोणत्या कारणास्तव मिळाले. दिनेश जीवराज सोलंकी, रुम नं.१०३ व त्यांना मिळालेले दुकान, श्री.संजय शंकर मोडक यांना कोणत्या कारणास्तव रुम मिळाला इ.अनुषंगिक माहिती मागितली होती. विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथील ओम सिध्दीविनायक सस्थेच्या ११ सभासदांच्या पात्रतेसंबंधीची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.२.२००८ रोजी आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/११/२००८.**

E:\Matte\comisoner -Tiwari\NOVEMBER-08.doc

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२३१/०२**

**श्री. रमाकांत पांडुरंग राणे, ------ अपीलकर्ता**
**सदनिका क्र.५०५, ५ वा मजला,**
**कर्मसंदेश, न्यु जनता सहकारी गृहनिर्माण संस्था म.**
**जनता सोसायटी मार्ग,**
**घाटकोपर,(पूर्व) मुंबई- ४०० ०७७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. रमाकांत पांडुरंग राणे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन. वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.१४.१२.२००७ रोजी अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन योजना, अंतिम भूखंड क्र, २५२, न.भु.क्र. ५७२०, साई जनता सहकारी गृहनिर्माण संस्था, न्यु जनता सहकारी गृहनिर्माण संस्था, जनता सोसायटी मार्ग, घाटकोपर (पूर्व), मुंबई या संस्थेची अनुषंगिक माहिती मागितली होती.

साई जनता सहकारी गृहनिर्मौण संस्था व न्यु जनता सहकारी गृहनिर्माण संस्थेचे प्राधिकरणाने जारी केलेले पुरवणी परिशिष्ट-२ प्राधिकरणातील आदेश दि.२५.९.२००६ अन्वये रद्द करण्यात आलेले आहेत. झोपडीधारकांनी सादर केलेले त्यांच्या वास्तव्याचे पुरावे संबंधित अधिका-यांकडून तपासण्यात येतील. संबंधित अधिका-याचा पुराव्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या पात्रतेचा निर्णय घेण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२६.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेलया उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२२.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२६.२.२००८

रोजी आदेश पारित करुन, अपिलकारास पुरवणी परिशिष्ट-२ बाबतची आवश्यक कागदपत्रे देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना निर्देश देवून अपील खारीज केले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी पुरवणी परिशिष्ट-२ बाबतची उपलब्ध कागदपत्रे दि.१९.३.२००८ रोजी अपिलकारास दिली. उर्वरित कागदपत्राचा विभागात पुन्हा नव्याने शोध घेतला असता ती सापडली नसल्याने पुरविणे शक्य नाही असे दि.१४.५.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन. वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन योजना, अंतिम भूखंड क्र, २५२, न.भु.क्र. ५७२०, साई जनता सहकारी गृहनिर्माण संस्था, न्यु जनता सहकारी गृहनिर्माण संस्था, जनता सोसायटी मार्ग, घाटकोपर (पूर्व), मुंबई या संस्थेची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या पुरवणी परिशिष्ट-२ ची काही कागदपत्र अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१९.३.२००८ च्या पत्राने दिली आहेत. उर्वरित कागदपत्र सापडली नसल्याने ती देता येत नसल्याचे कळविले आहे. याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, श्री.बी.एन.बास्टेवाड यांनी कागदपत्र सापडली नसल्याबाबत जाणिवपूर्वक निर्णय घेऊन हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास कळवावे.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२२९/०२**

**श्री. बी. व्ही. देसाई,** **------ अपीलकर्ता**
**डीकेआर कन्सलटंट प्रा.लि.**
**युनिट नं.२२, रिगल उद्योग भवन,**
**आचार्य दोंदे मार्ग, शिवडी,(प.) मुंबई- ४०० ०१५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा हॉर्टिकल्चर असिस्टंट,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग,**
**हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. बी. व्ही. देसाई, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा हॉर्टिकल्चर असिस्टंट, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे दि.५.१.२००८ रोजी अर्ज करुन, खेळासाठी आरक्षित असलेल्या बी.के.मार्ग, माहीम (प.) येथील देसाई मैदानाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.२.२००८ च्या पत्रान्वये मााहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी हवी असलेली माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२९.२.२००८रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुद्दा क्र. १,२, ३, ४, ७ बाबत दिलेल्या माहितीचे समर्थन करुन, अर्जातील मुद्दा क्र.८ व ९ बाबत कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलकारास देण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी निर्देश देवून दि.२८.३.२००८ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-याच्या निर्देशाप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दि.१८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. जन माहिती अधिकारी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा हॉर्टिकल्चर असिस्टंट, बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग, दादर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, खेळासाठी आरक्षित असलेल्या बी.के.मार्ग, माहीम (प.) येथील देसाई मैदानाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या निर्देशाप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२३२/०२**

**श्री. जान.मो.गुलाम मो.खान,** **------ अपीलकर्ता**
**२७/ए/४६-४७, रोड नं.२,**
**शिवाजीनगर, गोवंडी, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**संचालक, अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ३ रा मजला,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रमुख अभियंता, विकास नियोजन,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ४ था मजला,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. जान मो.गुलाम मो.खान, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियता, (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई, यांच्याकडे दि. ०३.०३.२००८ रोजी अर्ज करुन, परिपत्रक क्र.एएमसी/ईएस/डी/१६८/ (चीफ इंजि.)-१८७६/डीपीसी/जनरल, दि. २५.२.२००४ ची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती.

अर्जातील अनु. क्र.१ व ३ बाबतची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. अनु.क्र.२ बाबतची माहिती वसाहत कार्यालयाशी (एम-पूर्व विभाग) संबंधित असून, तेथे वरिष्ठ वसाहत अधिकारी हे स्वतंत्र माहिती अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहेत. माहितीचा अर्ज संबंधित विभागाकडे करावा. असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१.४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.९.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२५.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रकल्पग्रस्त योजने अंतर्गत पर्यायी जागेचे वाटप करण्याच्या कार्यवाहीबाबतच्या दि.२५.२.२००४ चे धोरणात्मक परिपत्रक मिळण्याबाबतची विनंती जन माहिती अधिका-याकडे केली होती. तसेच, मुख्य नाल्याच्या बाजूला वसलेल्या रफीनगर (गोवंडी) झोपडीच्या प्रकल्पग्रस्त

लोकांच्या पुनर्विकासासाठी जागेचे वाटप करताना झालेल्या कथित विसंगतीबाबत अपिलकाराने स्पष्टीकरण मागितले होते. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास परिपत्रकाची प्रत उपलब्ध करुन दिली. राहिलेल्या दोन मुद्दयांबाबतची माहिती सहाय्यक आयुक्त, एम/पूर्व विभाग यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपिलकारास कळविले. यावर पर्याय म्हणून अपिलकाराने माहिती प्राप्त करण्याकरिता स्वतंत्ररित्या विभाग कार्यालयाकडे अर्ज सादर करावा व दस्तऐवजाचे निरीक्षण करुन शंकानिरसन करावे, असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.६.५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियता, (विकास नियोजन),बृहन्मुंबई महानगरपालिका,फोर्ट, मुंबई,यांच्याकडे अर्ज करुन,परिपत्रक क्र.एएमसी/ईएस/डी/१६८/ (चीफ इंजि.)- १८७६/डीपीसी/जनरल, दि.२५.२.२००४ ची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. मागितलेली माहिती त्रोटक स्वरुपाने, दुष्ट हेतूने, सत्य माहिती भूमिगत करुन अंदाजित, अनुमानित व आक्षेपपूर्ण दिल्याचे अपिलकाराने सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीच्या दस्तऐवजाचे निरीक्षण करण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले आहेत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, एम/पूर्व विभाग, यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावेत. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२३४/०२**

**श्री. अजय मधुसुदन मराठे,** **------ अपीलकर्ता**
**५०४, न्यू सर्वोदया को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**सेक्टर-४, प्लॉट २९ ब,**
**वाशी, नवी मुंबई- ४०० ७०३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग/सहा,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग/सहा,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. अजय मधुसुदन मराठे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि. ३१.८.२००७ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य माहिती आयुक्ताबद्दल किती तक्रारी प्राप्त झाल्या, त्यावर काय कार्यवाही केली, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२०.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माािहती दिली . यामुळे समाधान न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.२५.१.२००८ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती कागदपत्र आठ दिवसात विनाशुल्क द्यावीत असे निर्देशित करुन अपील निकालात काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य माहिती आयुक्ताबद्दल किती तक्रारी प्राप्त झाल्या, त्यावर काय कार्यवाही केली, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. मुख्य माहिती आयुक्त यांचेविरुध्द द्वितीय अपिलाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (७) अन्वये दुस-या अपिलाबाबत राज्य माहिती आयोग यांचा निर्णय बंधनकारक असून, अधिनियमाच्या कलम २३ अनुसार कोणत्याही न्यायालयात या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधातील दावा, अर्ज किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नसल्याने अशा तक्रारी नस्तीबंद करण्यात आल्या आहेत. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या विरुध्दच्या तक्रारीबाबत त्यांचे अभिप्राय मागविण्यात येत आहेत असे नमूद करुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्राच्या प्रती दि.२३.११.२००७ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिल्या. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२३३/०२**

**श्री. वालजीभाई विक्रमभाई गोहील, ------ अपीलकर्ता**
**४०४, ४ था मजला, अनमोल अपार्टमेंट,**
**दत्तमंदिर अपार्टमेंट समोर,**
**मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०९७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक निबंधक सहकारी संस्था,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. ------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. वालजीभाई विक्रमभाई गोहील, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, मुंबई, यांच्याकडे दि. ०५.१२.२००७ रोजी अर्ज करुन, वडारपाडा, रामजीवन को. ऑप. हौ. सोसायटी, नवदुर्ग वेल्फेअर सोसायटी, जयअंबे को.ऑप.हौ.सोसा. सहयाद्रीनगर को.ऑप.हौ.सोसा. धनजीवाडी, मालाड (पूर्व) बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२.१.२००८ च्या पत्रान्वये असे कळविले की, अपिलकाराने मागितलेली माहिती अर्जातील मुद्दा क्र.अ, ब, व क जन माहिती अधिका-याशी संबंधित नसल्याने सदर माहिती सहायक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या कार्यालयशी संपर्क साधावा. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन, जन माहिती अधिका-यानी अपिलकारास कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य पुरविण्यात यावी

असे नमूद करुन, दि.१४.३.२००८ रोजी आदेश पारित केले. अपिलकाराने मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी निर्देश देवूनही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नसल्याामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वडारपाडा, रामजीवन को. ऑप. हौ. सोसायटी, नवदुर्ग वेल्फेअर सोसायटी, जयअंबे को.ऑप.हौ.सोसा. सहयाद्रीनगर को.ऑप.हौ.सोसा. धनजीवाडी, मालाड (पूर्व) बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२३९/०२**

**श्रीमती संगीता गोविंद साहू,** **------ अपीलकर्ता**
**८, शिवराम महाराज चाळ, १ ला मजला,**
**ठक्कर तबेलाजवळ, वडारपाडा, धनाजीवाडी,**
**दत्तमंदिर अपार्टमेंट समोर,**
**मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०९७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अप्पर जिल्हाधिकारी (अति./निष्का.)**
**पश्चिम उपनगर यांचे कार्यालय,**
**७ वा मजला, प्रशासकीय इमारत,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**निवासी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का.)**
**पश्चिम उपनगर यांचे कार्यालय,**
**७ वा मजला, प्रशासकीय इमारत,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती संगीमा गोविंद साहू, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पश्चिम उपनगर, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२६.११.२००७ रोजी अर्ज करुन, झोपडपट्टीच्या प्राधिकरणा अंतर्गत पात्रता निश्चित करण्यासाठी अपिलकाराच्या खोलीचे सर्वेक्षण/पंचनामा करुन, अनुषंगिक माहिती देण्याबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१३.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

"जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) यांनी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड यांना अर्जदार यांच्या मूळ पात्रतेविषसयीच्या अपील अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत अपिलकारास विनाविलंब माहिती कळवावी."

पूर्ण माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पश्चिम उपनगर, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, झोपडपट्टीच्या प्राधिकरणा अंतर्गत पात्रता निश्चित करण्यासाठी अपिलकाराच्या खोलीचे सर्वेक्षण/पंचनामा करुन, अनुषंगिक माहिती देण्याबाबत मागणी केली होती. प्रथम अपिलीय अधिका-यांनी निर्देशित केल्याप्रमाणे अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२२६/०२**

**श्री. अब्दुल गफूर का. हुणशाळ,** **------ अपीलकर्ता**
**हॉटेल प्रेसिडेन्ट, महाराष्ट्र नगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंध्क,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण् भ्वन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपजिल्हाधिकारी (अति/निष्का.)**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री.अब्दुल गफूर का. हुणशाळ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, (अति/निष्का.) , वांद्रे (पूर्व), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि. १४.१.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र नगर/ आंबेडकर नगर, सी.टी.एस. ६२९ वांद्रे (पूर्व), मुंबई एस.आर.ए. योजनेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, (अति/निष्का.) , वांद्रे (पूर्व), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, महाराष्ट्र नगर/ आंबेडकर नगर, सी.टी.एस. ६२९ वांद्रे (पूर्व), मुंबई एस.आर.ए. योजनेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास माहिती उपलब्ण करुन द्यावी. अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम-२० अन्वये दंडात्मक कारवाई कां करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२३०/०२**

**श्री. शिवराम वासुदेव कदम, ------ अपीलकर्ता**
**१/१, ओमसाईनाथ हौसिंग सोसायटी,**
**कोकणी पाडा, कुरार व्हिलेज,**
**मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०९७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,पी /नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदारवाडी,**
**मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (जलकामे),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,पी /नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन, मामलेतदारवाडी,**
**मालाड (पूर्व), मुंबई- ४०० ०६४ ------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. शिवराम वासुदेव कदम, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग, मालाड (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि.२१.८.२००७ रोजी अर्ज करुन, जल आणि मलनिःस्सारण आकार देयक क्र.पीएन३ डब्लू ०८१९९६, जल जोडणी क्र.००२०४७२ मधील श्री.कदम जयसिंग आणि इतर सभासदांची नावे मिळण्याबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.४.२००८ च्या पत्राने असे कळविले की, जन जोडणी क्र. ००२०४७२ ची कागदपत्रे पुन्हा पुन्हा शोध घेऊनही सापडत नाहीत. सदर कागदपत्रे सापडताच योग्य ती माहिती पुरविण्यात येइल. सदर उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन, अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीच्या कागदपत्राचा जाणिवपूर्वक शोध घेऊन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास पाच दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले. माहिती मिळाली

नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १८.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/नॉर्थ विभाग, मालाड (पूर्व), मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, जल आणि मलनिःस्सारण आकार देयक क्र.पीएन३ डब्लू ०८१९९६, जल जोडणी क्र.००२०४७२ मधील श्री.कदम जयसिंग आणि इतर सभासदांची नावे मिळण्याबाबत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीसंबंधीचे कागदपत्र सापडली नसल्याच्या कारणावरुन माहिती देता आली नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कागदपत्र मिळत नसल्याबाबत जाणिवपूर्वक निर्णय घेऊन हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपिलकारास कळवावे.

## आदेश

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२५/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**
**अपील क.२००८/१२६९/०२**

**श्री. मिलिंद शरद मुळे,** **------ अपीलकर्ता**
**२८४/१२, बांदेकर सदन,**
**न. चि.केळकर मार्ग, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी आरोग्य अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण विभाग,**
**डॉ.आंबेडकर रोड, परळ, मुंबई- ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधिक्षक,**
**के.बी.भाभा रुग्णालय इमारत, ७ वा मजला,**
**आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे (प.),४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. मिलिंद शरद मुळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधिक्षक, के.बी.भाभा रुग्णालय इमारत, वांद्रे (प.) मुंबई, यांच्याकडे दि. ७.३.२००८ रोजी अर्ज करुन, नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या रजा रोखीकरणासंबंधीची एकत्रित माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती विविध सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असल्याने अपिलकाराचा अर्ज सर्व संबंधित प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक/ प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांचेकडे पाठवून, अपिलकाराने मागणी केलेली माहिती परस्पर अपिलकारास कळविण्याबाबत दि.२५.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. सदर बाब अपिलकारास अवगत करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी मााहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सार्वजनिक आरोग्य खात्यात, विविध विभाग, संलग्न कार्यालय, उपनगरीय रुग्णालये आणि विशेष रुग्णालये यांच्याशी संबंधित असलेली माहिती देण्याबाबत विविध माहिती अधिका-यांची नियुक्ती केलेली आहे. या सर्व माहिती अधिका-यांना आवश्यक असलेली माहिती योग्य ती शुल्क आकारणी केल्यानंतर अपिलकारास परस्पर देण्याबाबत कळविण्यात आले असल्याचे प्रथम अपिलीय

अधिका-यांनी अपिलकारास दि.२२.४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधिक्षक, के.बी.भाभा रुग्णालय इमारत, वांद्रे (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या रजा रोखीकरणासंबंधीची एकत्रित माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी/प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-यांना दंडित करण्याबाबत अपिलकाराने सुनावणीच्यावेळी विनंती केली. अपिलकाराने मागणी केलेली माहिती सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत विविध विभाग, संलग्न कार्यालये, उपनगरीय रुग्णालये आणि विशेष रुग्णालय यांचेशी संबंधित असल्याने सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित जन माहिती अधिका-याकडे अपिलकाराने माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती मागणे आवश्यक आहे. या परिस्थितीत जन माहिती अधिका-यांना दंडित करण्याची विनंती मान्य करता येत नाही. अर्जावर जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२६/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२४४/०२**

**श्री. महिंद्र जनार्दन चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**८५/२, चाळके चाळ, ताडवाडी,**
**स्वदेशी मिल, सायन, चुनाभट्टी,मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०१२.** **------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. महेंद्र जनार्दन चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.७.२.२००८ रोजी अर्ज करुन, वित्त विभागात कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांच्या नेमणुकाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.४.३.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२८.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, वित्त विभागात कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांच्या

नेमणुकाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. मंत्रालयातील सर्व विभागातील गट-अ ते गट-क संवर्गातील नेमणूका महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येतात. त्यानुसार वित्त विभागात महाराष्ट्र लोकवा विभागामार्फत सामान्य प्रशासन विभागाकडून अधिकारी/ कर्मचा-यांच्या नेमणुका केल्या आहेत. याबाबतची माहिती शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.४.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी वित्त विभागात विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन एकूण किती पदे भरली आहेत याबाबतची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतःमान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२६/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२४३/०२**

**श्री. महिंद्र जनार्दन चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**८५/२, चाळके चाळ, ताडवाडी,**
**स्वदेशी मिल, सायन, चुनाभट्टी,मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप सचिव, (रोस्वरो-१),**
**रोजगार व स्वयंरोजगार विभाग,**
**नवीन प्रशासकीय भवन, १४ वा मजला,**
**मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, (वि.चौ.)**
**अवर सचिव, (रोस्वरो-१),**
**रोजगार व स्वयंरोजगार विभाग,**
**नवीन प्रशासकीय भवन, १४ वा मजला,**
**मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२.** **------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. महिंद्र जनार्दन चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.७.२.२००८ रोजी अर्ज करुन, रोजगार व स्वयंरोजगार विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या नेमणुकाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र.बी, सी, डी, जी व आय हे सामान्य प्रशासन विभागाशी आणि मुद्दा क्र.आय हा उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, वित्त विभाग, गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्याशी संबंधित असल्याने अपिलकाराच्या अर्जाची प्रत पुढील कार्यवाही साठी त्या विभागाकडे पाठवून तसेच अपिलकारास दि.४.३.२००८ च्या पत्राने अवगत करुन उर्वरित मुद्दयाबाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली. संपूर्ण माहिती मिळाली नसल्याचें कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१७.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.३.५.२००८ रोजी

आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव. रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, रोजगार व स्वयंरोजगार विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या नेमणुकाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकारास निश्चित कोणती माहिती पाहिजे हे स्पष्ट होत नाही. अपील अर्जावरुन त्यांना कोणती माहिती मिळाली नाही हे स्पष्ट होत नाही. त्यांनी मागितलेली माहिती ही विविध प्रशासकीय विभाग व त्यांच्या क्षेत्रिय यंत्रणेशी संबंधित असल्याने कोणत्याही एका माहिती अधिका-याकडून उपलब्ध होणार नाही असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२६/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२४६/०२**

**श्री. महिंद्र जनार्दन चव्हाण, ------ अपीलकर्ता**
**८५/२, चाळके चाळ, ताडवाडी,**
**स्वदेशी मिल, सायन, चुनाभट्टी,मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप सचिव, (सेवा),**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, (वि.चौ.)**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. ------- उत्तरवादी.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. महिंद्र जनार्दन चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि. ७.२.२००८ रोजी अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या नेमणूकीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.५.३.२००८ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन दि. ९.४.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या नेमणूकीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी समर्थन केले. सार्वजनिक बांधकाम विभाग (खुद्द) मंत्रालय मधील वर्ग-४ च्या भरतीबाबतची तसेच अपिलकाराच्या पत्रातील मुद्दा क्र.६ व८ बाबतची माहिती शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. सदर संकेतस्थळावर उपलब्ध केलेली महिती देण्याबाबत अपिलकाराने मागणी केली असल्याने आवश्यक ती फी आकारुन अपिलकारास माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी निर्देश दिले. त्यानुसार अपिलकारास दि.५.५.२००८ च्या पत्रान्वये एकूण रु. १२७/- भरण्याबाबत कळवून माहिती तयार ठेवली. परंतु अद्याप अपिलकाराने माहिती नेलेली नाही असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी तयार ठेवली आहे. त्याकरिता आवश्यक ते शुल्क भरुन अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी. जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराने मागणी केलेली माहिती तात्काळ दयावी.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२६/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२४५/०२**

**श्री. महिंद्र जनार्दन चव्हाण, ------ अपीलकर्ता**
**८५/२, चाळके चाळ, ताडवाडी,**
**स्वदेशी मिल, सायन, चुनाभट्टी,मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ ------- उत्तरवादी.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. महिंद्र जनार्दन चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे दि.७.२.२००८ रोजी अर्ज करुन, सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या नेमणूकीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती संदिग्ध स्वरुपाची असून, अपिलकारास निश्चित कोणत्या बाबीच्या अनुषंगाने काय माहिती हवी आहे हे स्पष्ट होत नाही. अर्जात संख्यात्मक विवरणपत्रात माहिती मागितली आहे. त्यामुळे उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलकाराची मागणी अमान्य करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपिलकाराने दि.७.३.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २६.३.२००८ व दि.१९.४.२००८ च्या पत्राने सविस्तर माहिती दिली. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या नेमणूकीबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अर्जावर जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी समर्पक व नियमानुसार उत्तर दिले असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२६/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२५४/०२**

**श्री. रेमंड अलायस नून्स,** **------ अपीलकर्ता**
**फ्लॅट नं.१०४, बिल्डिंग नं.६,**
**दि डिकव्हरी को.ऑप.हौ.सो.लि.**
**दत्तपाडा रोड, टाटा स्पेशल स्टील समोर,**
**बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता (विद्युत),**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**प्रशासकीय इमारत, ३ रा मजला,**
**रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,**
**चेंबूर (पूर्व), मुंबई- ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ,**
**प्रशासकीय इमारत, ३ रा मजला,**
**रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,**
**चेंबूर (पूर्व), मुंबई- ४०० ०७१..** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. रेमंड अलायस न्यून्स, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ, चेंबूर, मुंबई, यांच्याकडे दि. १५.२.२००८ रोजी अर्ज करुन, मुंबई उदवाहन नियम, १९५८ ची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी माहितीपोटी रु.६४/- + टपालशुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत अपिलकारास दि.२५.३.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.५.२००८ च्या पत्राने कळविले की, माहितीपोटी नियमानुसार पैसे भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ, चेंबूर, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुनमुंबई उदवाहन नियम, १९५८ ची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीपोटी रु.६४/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने आवश्यक त्या शुल्काचा भरणा करावा. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास आवश्यक शुल्क प्राप्त झाल्यानंतर माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२६/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२५५/०२**

**श्री. अशोक मारुती करपे,** **------ अपीलकर्ता**
**९०/ ९२/ ९४, तेलगल्ली, विठ्ठलवाडी,**
**काळबादेवी रोड, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,**
**कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई,**
**कलाची वाडी, ९४/९६,**
**भुलेश्वर, मुंबई- ४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई,**
**कलाची वाडी, ९४/९६,**
**भुलेश्वर, मुंबई- ४०० ००२.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. अशोक मारुती करपे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.५.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई, भुलेश्वर, मुंबई, यांच्याकडे दि.१३.२.२००८ रोजी अर्ज करुन, श्री. हनुमान मुकादम नोंदणी क्र.एच-९७३ ची नोंदणी तारीख आणि टोळी क्र.१५२२ च्या नियत वाटपाच्या पत्राच्या प्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.५.२००८ च्या पत्राने मे. श्री. हनुमान मुकादम लोकल सर्विस यांची मंडळात मालक म्हणून नोंदणी केली असून, नोंदणी क्र.एच-९७३ व दि.१.९.२००३ असा आहे. त्यांना टोळी क्र.१५२२ चे नियत वाटप केले असून, नियतवाटप पत्राच्या छायाप्रती वरील पत्रासोबत उपलब्ध करुन दिल्या. दरम्यान अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.११.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार हजर राहिले नाहीत. यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली. वारंवार सुनावणीसाठी बोलावूनही अपिलकार हजर राहिले नाहीत. अपील अर्जाच्या सुनावणीत अपिलकारास स्वारस्य नसल्याचे दिसून येते असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील फेटाळण्यात आले

असल्याचे अपिलकारास दि.५.५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई, भुलेश्वर,, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, श्री. हनुमान मुकादम नोंदणी क्र.एच-९७३ ची नोंदणी तारीख आणि टोळी क्र.१५२२ च्या नियत वाटपाच्या पत्राच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.३१.५.२००८ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२६/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२४२/०२**

**श्री. सुदर्शन सदानंद मंडलिक,** **------ अपीलकर्ता**
**६/१४, ६/१५, उपेंद्र नगर,**
**एस.बी.मार्ग, दादर (प.), मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहाय्यक आयुक्त (बाजार),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महात्मा ज्योतिबा फुले मंडई, १ ला मजला,**
**डी.एन.रोड, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (बाजार),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**महात्मा ज्योतिबा फुले मंडई, १ ला मजला,**
**डी.एन.रोड, मुंबई- ४०० ००१.** **------- उत्तरवादी.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सुदर्शन सदानंद मंडलिक, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (बाजार), बृहन्मुंबई महानगरपालिका, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, डी.एन.रोड, मुंबई, यांच्याकडे दि.२६.३.२००८ रोजी अर्ज करुन, परिपत्रक क्र.एसी/एमकेटी/७७७/ एईएम, दिनांक १३.४.२००६ चे प्रारुप तयार करण्याबाबत कोणी सूचना दिल्या होत्या, याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी माहितीच्या अधिकारातील कलम २ (एफ) नुसार अपिलकाराने मागणी केलेली मााहिती "माहिती" या संज्ञेत बसत नसल्याचे अपिलकारास दि.१९.४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२२.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. अपिलकाराचा मूळ अर्ज पहाता अपिलकाराने विचारलेल्या प्रश्नांना स्पष्टीकरणात्मक/ खुलाशात्मक स्वरुपाची माहिती शासकीय माहिती अधिकारी यांचेकडून मागणे व ती अपिलार्थीस पुरविणे, अधिनियमाची या विषया

संदर्भातील एकंदरित तरतुदी पहाता सुसंगत ठरत नाही. परंतु, अपिलकाराने मागितलेली माहिती, कागदपत्रे उदा. संस्थेची यादी, परवानाधारकांची यादी, न्यायालयीन याचिका संदर्भातील कागदपत्रे व इतर कागदपत्रे अपिलकारास देणे बंधनकाकर आहे. महानगरपालिका मंडईच्या पुनर्विकास प्रस्तावाबाबत परिपत्रक क्र.सआ/बाजार/ ७७७/सअबा, दि.१३.४.२००८, जे अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) यांच्या सहीने निर्गमित केलेले आहेत त्याप्रमाणे त्याची प्रत अपिलकारास देण्यात आलेली आहे असे नमूद करुन दि.४.६.२००८ रोजी आदेश पारित केले. मागितलेली माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (बाजार), बृहन्मुंबई महानगरपालिका, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, डी.एन.रोड, मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, परिपत्रक क्र.एसी/एमकेटी/७७७/ एईएम, दिनांक १३.४.२००६ चे प्रारुप तयार करण्याबाबत कोणी सूचना दिल्या होत्या, याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने माहितीच्या अधिकारात दि.२६.३.२००८ रोजी जन माहिती अधिका-याकडे अर्ज सादर करुन मागितलेली माहिती माहितीच्या अधिकारांतर्गत येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१९.४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. प्रथम अपिलीय अधिका-याच्या निदेशानुसार अपिलकार यांना दि.१३.४.२००८ रोजी परिपत्रकाची प्रत देण्यात आली. राज्य माहिती आयोगासमोरील सुनावणीच्यावेळी मा.माहिती आयुक्त यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे अपिलकार यांना संबंधित नस्तीची छायांकित प्रत देण्यात आली. यावरुन सदर प्रकरणी अधिक कार्यवाहीची आवश्यकता राहिलेली दिसून येत नाही.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२८/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२४१/०२**

**श्री. गुरुदेव द. झेंडे,** **------ अपीलकर्ता**
**११८, शिव व्हिला बिल्डिंग, १ ला रस्ता,**
**चित्रकार धुरंधर मार्ग,**
**खार (प.), मुंबई- ४०० ०५२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग,**
**आर.के.पाटकर मार्ग,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पश्चिम विभाग,**
**आर.के.पाटकर मार्ग,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. गुरुदेव द. झेंडे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/ पश्चिम विभाग, वांद्रे (प.), मुंबई, यांच्याकडे दि.२१.८.२००७ रोजी अर्ज करुन, खार (प.), १५ वा रस्ता, प्लॉट नं.९, सिमरन या इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम झालेले आहे, त्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.),एच/पश्चिम विभाग यांनी दि.५.९.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास असे कळविले की, अपिलकाराने मागणी केलेली बाब इमारत प्रस्ताव खात्याशी संबंधित असल्यामुळे अपिलकाराचा माहितीचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी कार्यकारी अभियंता, (इमारत प्रस्ताव) एच/पश्चिम विभाग यांचेकडे पाठविण्यात आला असल्याचे कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.९.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२२.१.२००८ च्या पत्रान्वये अर्जातील मुद्दा क्र.१ कार्यालयाशी संबंधित नाही. मुद्दा क्र.२, ३ बाबत विहित शुल्क

भरल्यानंतर माहिती देण्यात येईल. उपलब्ध कागदपत्राची पाहणी करावयाची असल्यास कार्यालयीन वेळेत दुय्यम अभियंता (इमारत) यांचेशी संपर्क करावा असे कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच, अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/ पश्चिम विभाग, वांद्रे (प.) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, खार (प.), १५ वा रस्ता, प्लॉट नं.९, सिमरन या इमारतीमध्ये अनधिकृत बांधकाम झालेले आहे, त्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. पोलीस संरक्षणात अनधिकृत बांधकाम पाडण्याची कारवाई सदर प्रकरणी केली असल्याचे दिसते. परंतु अपिलकारास याबाबत माहिती कळविण्यात आलेली दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अनधिकृत बांधकाम पाडल्याबाबत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२८/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०५४/०२**

**श्री. मनिष राजाराम घाटगे,** **------ अपीलकर्ता**
**अमृत नगर, चकाला नाका,**
**अंधेरी- कुर्ला मार्ग,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०६९.** **------- उत्तरवादी.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. मनिष राजाराम घाटगे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ पूर्व विभाग, अंधेरी (पूर्व), मुंबई, यांच्याकडे दि. २८ऑगस्ट, २००७ रोजी अर्ज करुन, माहितीच्या अधिकारात अनधिकृत बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या खात्याने अधिनियमानुसार केलेल्या कारवाईबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागणी केलेली माहिती ही दिर्घ कालावधीतील अतिव्यापक स्वरुपाची असून, सार्वजनिक उपक्रमाचे मनुष्यबळ ती माहिती संकलित/ वितरीत करण्याच्या कामी वापरणे अप्रस्तुत ठरेल. एखाद्या विवक्षित पत्त्यावरील अनधिकृत बांधकामाची माहिती/ नोटीस वेगळा अर्ज करुन मागितल्यास अपिलकारास देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.१५.१२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे

व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २२.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी यापैकी कोणीही हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ पूर्व विभाग, अंधेरी (पूर्व) मुंबई, यांच्याकडे अर्ज करुन, माहितीच्या अधिकारात अनधिकृत बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या खात्याने अधिनियमानुसार केलेल्या कारवाईबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती देण्यात आली असल्यामुळे याप्रकरणी केलेले द्वितीय अपील मागे घेत असल्याचे अपिलकाराने दि. २२.१०.२००८ रोजी आयोगास कळविले आहे. यावरुन सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२८/११/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१२९१/०२**

**श्री. होरिलाल भगु यादव,** **------ अपीलकर्ता**
**रुम नं.४/१, भगु यादव चाळ,**
**दत्त मंदिर व्हिलेज रोड,**
**भांडूप (पूर्व), मुंबई- ४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई २, पूर्व उपनगरे.** **------- उत्तरवादी.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. होरिलाल भगु यादव, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.६.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई-२, पूर्व उपनगरे, यांच्याकडे दि.१०.१२.२००७ रोजी अर्ज करुन, सह विभागीय निबंधकांकडे दि.२३.११.२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मााहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. जन माहिती तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई-२, पूर्व उपनगरे, यांनी अपिलकाराने मागितलेली माहिती १५ दिवसाचे आत देण्यात यावी असे नमूद करुन दि.११.३.२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २५.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच उत्तरवादी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई-२, पूर्व उपनगरे, यांच्याकडे अर्ज करुन, विभागीय निबंधकांकडे दि. २३.११.२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने श्री.दत्तकृपा सहकारी पतपेढी मर्या. श्रीनाथ पांडे चाळ, भांडूप (प.) मुंबई यांचेकडून रु.५०,०००/-इतके कर्ज घेतले. सदर कर्जाची परतफेड अपिलकाराने विहित मुदतीत केली नाही. यामुळे पतपेढीने अपिलकारास सहकारी कलम जी-४९, कलम १०१, कलम ९१ द्वारे कर्जदाराच्या पगारातून अथवा घरातील मालमत्तेवर जप्ती करण्यांत येईल अशी नोटीस दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दियसून येते. याबाबत अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडे तक्रार दाखल केली होती. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत सहकारी पतपेढया अंतर्भूत नसल्याने सहकारी पतपेढींना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही. सबब मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त ,बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२८/११/२००८.**